म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 93०८


मल वर्मा

# मार्क्सवाद

?

REFBK-0011491

# मार्क्सवाद म्हणजे काय ?



कार्ल मार्क्स ( १८१८-१८८३ )

# मार्क्सवाद म्हणजे काय ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 33980 वि: निबंध
क्रमांक ... नों. दि: 27/5/62

## एमिल बर्न्स

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 11017
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0011491
REFBK-0011491

मार्क्सवाद म्हणजे ... पे विवरण
या पुस्त... ई.

अनुवादिका—सरला कारखानीस

*

प्रकाशक—जबलपुर प्रकाशन गृह
१९, नया बाजार, जबलपुर

*

मुद्रक—ना० ग० शास्त्री ललित
ललित प्रेस, पत्थरगली, वाराणसी–१

*

किमत – रु० १·२५

प्रथमावृत्ति – १९६१

सर्वाधिकार सुरक्षित

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 33960 वि: [illegible]
क्रमांक 9388 नों: दि: [illegible]

# प्रस्तावना

ऐमिल बर्न्स यांनीं लिहिलेल्या मार्क्सवाद म्हणजे काय. ( व्हॉट इज मार्क्सिझम ) या जगप्रसिद्ध पुस्तकाचा सुबोध अनुवाद केल्याबद्दल सौ. सरला कारखानीस या अभिनंदनास पात्र आहेत.

ऐमिल बर्न्स यांचे हें पुस्तक जरीं मुळांत इंग्रजीमध्यें प्रसिद्ध झालें असलें तरीं त्याची जगांतील बहुतेक प्रमुख भाषांत भाषांतरें झालेलीं आहेत. हिंदी, बंगाली, तेलगु, तामीळ, मल्याळम वगैरे अनेक भारतीय भाषांमध्येंहि हें पुस्तक उपलब्ध आहे.

मार्क्सवादावरील एक सुबोध आणि लोकप्रिय पुस्तक अशी मान्यता या पुस्तकाला गेली पंचवीस वर्षें जगभर मिळाली आहे. लक्षावधि तरुण कार्यकर्त्यांना मार्क्सवादाचा प्रथम परिचय याच पुस्तकानें झाला आहे असें म्हटलें तर त्यांत मुळींच अतिशयोक्ती होणार नाहीं.

मार्क्सवादाचा अधिक सविस्तर व मूलगामी परिचय करून घेण्यासाठीं मार्क्सवादाच्या आद्य प्रमाणग्रंथांचा-म्हणजे मार्क्स, एँगल्स, लेनिन, स्तालिन, माओ यांच्या मूळग्रंथांचा अभ्यास करणें आवश्यक आहे, यांत शंकाच नाहीं. पण तसा अभ्यास करण्याची प्रेरणा देण्याचे-त्यासाठीं आवश्यक ती पूर्वतयारी करण्याचें कार्य ऐमिल बर्न्स यांच्या प्रस्तुत पुस्तकानें गेली पंचवीस वर्षें अत्यंत प्रभावीपणानें केलें आहे.

वास्तविक या ग्रंथाचा मराठी अनुवाद यापूर्वींच कित्येक वर्षें व्हावयाला हवा होता व तसा तो न झाल्यामुळें केवळ मराठी जाणणाऱ्या शेकडों कार्यकर्त्यांची व सामान्य मराठी वाचकांची मोठी हानी झाली आहे.

आतांपर्यंत राहून गेलेली ही उणीव भरून काढण्याचें काम सौ. सरला बाईनीं पुढाकार घेऊन तडीस नेलें याबद्दल मराठी वाचक त्यांना खचित धन्यवाद देतील.

ऐमिल बर्न्स यांच्या पुस्तकांत मार्क्सवादाचा सर्वांगीण परिचय करून देण्यांत आलेला आहे. विषयानुक्रमणिकेकडे वरवर नजर टाकल्यासहि ही गोष्ट स्पष्ट होईल.

**मार्क्सवाद हा एकांगी नाहीं, तें जीवतांचे एक सर्वस्पर्शी तत्वज्ञान आहे, ती एक जीवनदृष्टी आहे.** मार्क्सवाद म्हणजे केवळ राज्यक्रांतीचा लढा नव्हे, केवळ वर्गसंघर्ष नव्हे, केवळ आर्थिक लढा नव्हे, केवळ भौतिकवाद नव्हे, केवळ विरोध-विकास नव्हे. केवळ अमुक किंवा केवळ तमूक असें मार्क्सवादाचें वर्णन करणें किंवा तशी समजूत करून घेणें हें चुकीचेंच नव्हे तर घातकहि आहे. किंबहुना, मार्क्सवाद म्हणजे केवळ हें किंवा तें अशी समजूत प्रसृत करून मार्क्सवादाबद्दल गैरसमज पसरविणें, त्याची बदनामी करणें हा त्याच्या विरोधकांचा नेहमीचाच धंदा आहे. कम्यूनिस्टांबद्दल खोट्या कंड्या पिकविणें हा जसा भांडवली प्रचारकांचा नेहमीचाच उद्योग असतो त्याचप्रमाणें मार्क्सवादाबद्दलच्या विकृत एकांगी कल्पना जनतेमध्यें पसारविणें, हेंहि त्यांचें एक आवडते तंत्र असते.

भारतांमध्येंहि मार्क्सवादाच्या विरोधकांनीं या तंत्राचा भरपूर अवलंब सतत केलेला आहे. जगांतील व खुद्द भारतांतील कम्यूनिस्ट चळवळीचा जोर जसजसा वाढत चालला तसतसा विरोधकांचा अपप्रचारहि वाढत चालला आहे. या प्रचारांत पूर्वी म. गांधींपासून अगदी दीडदमडीच्या भाडोत्री संपादकांपर्यंत सर्वांनीं भाग घेतला आहे. आजहि आचार्य विनोबा भाव्यांपासून-पंतप्रधान पं० नेहरूपासून मसानी-जयप्रकाशापर्यंत याच तंत्राचा अवलंब करीत आहेत.

म्हणून मार्क्सवादाच्या संपूर्ण भूमिकेची शास्त्रीय मांडणी करून ती सुबोध आणि सोप्या भाषेंत जनतेपर्यंत पोंचविणें हें अत्यंत महत्वाचें कार्य ठरते. प्रस्तुत पुस्तकानें तें कार्य होण्यासारखें आहे.

## पुस्तकाचें वैशिष्ट्य

मार्क्सवादाची शास्त्रीय दृष्टि, त्याची मूलभूत तात्विक भूमिका, विरोध-विकास, भौतिकतावाद, ऐतिहासिक घटनांची शास्त्रीय संगति, परिवर्तनाचे मूल-सिद्धांत इतिहासक्रमांतील वेगवेगळया अवस्था इत्यादि प्रश्नांबाबत अत्यंत संक्षिप्त पण तितकेंच सुबोध विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे.

भांडवलशाहीच्या उदयास्ताची मीमांसा या पुस्तकांत अधिक विस्तारानें येणें साहाजिक आहे. भांडवलशाहीचा-ह्रास आणि समाजवादाचा विकास यांचे शास्त्रीय विवेचन हा अर्थातच या पुस्तकाचा गाभा आहे. इतिहासाची अर्थसंगति लावणें येवढाच मार्क्सवादाचा उद्देश नाहीं, इतिहासक्रमाला क्रांतिकारक कलाटणी देणें, हें खरें महत्वाचें कार्य आहे, ही मार्क्सवादाची शिकवण आहे. या पुस्तकांतील विवेचनाची दृष्टि अशी आहे.

## आंधळा पोथीवाद नव्हे

**मार्क्सवाद म्हणजे केवळ आंधळा पोथीवाद नव्हे. परंपरागत प्रमाणग्रंथांची किंवा वचनांची पोपटपंची म्हणजे मार्क्सवाद नव्हे;** तें एक जिवंत व विकासशील तत्वज्ञान आहे, याची साक्ष या ग्रंथातील विवेचनावरून येईल. गेल्या शंभर वर्षात बदलत्या परिस्थितीस अनुसरून मार्क्सवादाचा विकास कसकसा होत गेला, याचा चलत्‌चित्रपट येथें थोडक्यांत बघावयास मिळतो. मूलभूत तात्विक बैठक कायम ठेवून बदलत्या परिस्थितीला अनुरूप अशी नवी विचारसंपदा तयार करणें, हें विकासशील मार्क्सवादाचें कार्य सतत चालूच असते. मार्क्स, लेनिन, स्तालिन, माओ या विचारवंतांनी हें कार्य आपआपल्या कालखंडात

कसकसें पार पाडलें याची धावती नोंद या पुस्तकांत मिळते. मार्क्स-वादाच्या या विकासशील परंपरेमुळेंच तो आजहि जिवंत आणि अगदी आद्ययावत वाटतो.

१०० वर्षांपूर्वी मार्क्सच्या काळांत मार्क्सवाद कदाचित बरोबर असेल, पण आज तो जीर्ण व शिळापाका झाला आहे, या आक्षेपाला चोख उत्तर या पुस्तकांत मिळते. मार्क्सच्या काळांत मार्क्सवाद जितका खरा होता तितकाच नंतर लेनिनच्या काळांतहि तो खरा होता. म्हणूनच लेनिनवाद म्हणून तो पुढे आला, टिकला व मान्यता पावला. नंतरच्या काळांत स्तालिन, माओ, ख्रुश्चोव वगैरे विचारवंतांनीं त्यांत वेळोवेळीं परिस्थित्युनुरूप भर घातली, आणि तो सतत विकास पावत गेला.

## विकासशील तत्वज्ञान

मार्क्सवादाचा हा ताजेपणा केवळ कालक्रमाच्या दृष्टीनें खरा आहे असें नव्हें, तर तो देशकाळाच्या दृष्टीनेहि खरा आहे. मूलभूत तात्विक बैठक व दृष्टी कायम ठेवून देश-काल-परिस्थितीप्रमाणें मार्क्सवाद विकास पावतो. मार्क्सवादाची मूलतत्वें विशिष्ट काळखंडाला किंवा देशाला लागू करण्यांतच मार्क्सवादाची खरी कसोटी लागते, ही गोष्ट मार्क्सवाद्यांनीं पुनः पुन्हा आग्रहानें सांगितली आहे. मार्क्सवादाची मूलतत्वें आणि देशकाल-परिस्थितीची वैशिष्ट्यें या दोहोंची योग्य सांगड घालणें हें खऱ्या मार्क्सवाद्यांचे कार्य आहे. केवळ मूलभूत तत्वें घट्ट धरून देश-काल-परिस्थितीकडे दुर्लक्ष करणें हें चुकीचें आहे; त्याचप्रमाणें केवळ देश-काल-परिस्थितीची वैशिष्ट्येंच लक्षांत घेउन मूलभूत तात्विक बैठक गमावणें आंधळेपणाचें आहे, असा दुहेरी इषारा मार्क्सवाद्यांनीं वारंवार दिलेला आहे.

## अनुभवाची कसोटी

मार्क्सवादाचें खरें सामर्थ्य त्याच्या सत्यनिष्ठेंत आहे, अशा

आशयाचें एक लेनिनचें वचन आहे. सत्याच्या-वास्तवाच्या भक्क बैठकीवर मार्क्सवाद ठामपणें उभा असल्यामुळें तो विजयी होतो. म्हणून वास्तवाची पुनः पुन्हा तपासणी करण्याबाबत मार्क्सवाद सतत जागरूक असतो. मार्क्सवादाच्या खरेपणाची ग्वाही प्रत्यक्ष अनुभवावरूनच मिळते. म्हणूनच प्रत्यक्ष अनुभवाचा पडताळा पहाणें तदनुसार बदलत जाणें यांतूनच मार्क्सवादाचा विकास होतो. खुद्द मार्क्सच्या प्रदीर्घ चिंतनांत या विकासशीलतेचा प्रत्यय पदोपदीं येतो. मार्क्स व त्याच्या सच्च्या अनुयायांनीं मार्क्सवादांत सतत नवी भर घातलेली म्हणूनच दिसते.

मार्क्सवाद ही एक जागतिक विचारधारा आहे, समग्र जीवनदृष्टि आहे हें तर खरेंच. पण देश-काल-परिस्थितीप्रमाणें त्याचा आविष्कार मूलतत्वांची बैठक कायम ठेवून पण वेगवेगळा होतो. म्हणूनच मार्क्सवादाची तात्विक बैठक एकच असूनहि प्रत्येक कालखंडात व प्रत्येक देशांत त्याचा अविष्कार वेगवेगळया रीतीनें होतो. म्हणूनच रशिया, चीन, पूर्वयूरोप, पश्चिमी भांडवली यूरोप, भारत, अरब राष्ट्रगट, अग्नेय आशिया, लॅटिन अमेरिका या देशांत व भूभागांत मार्क्सवादी चळवळीनें विशिष्ट भूमिका घेतलेल्या दिसतात.

भारतीय मार्क्सवादी चळवळीनेंहि आपला मार्ग व कार्यक्रम निश्चित करण्याच्या प्रयत्नांत महत्वाचे विचारमंथन केलें आहे, व तसें करतांना मार्क्सवादाच्या एकूण विचार संपदेंतहि भर घातली आहे.

मार्क्सवाद म्हणजे काय हें सांगतांना त्याचा विकास कसकसा होत गेला, हें अलिकडील इतिहासाच्या संदर्भांत स्पष्ट करीत जाणें हें या पुस्तकाचें एक खास वैशिष्ट्य समजलें पाहिजे. त्या दृष्टीनें अगदीं थेट १९५०-५२ पर्यंतच्या घटनांची नोंद या पुस्तकाच्या अखेरच्या प्रकरणांत घेतलेली दिसतें. त्यानंतरहि जागतिक कम्युनिस्ट चळवळीच्या व मार्क्सवादी विचार-

धारेच्या विकासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या घटना घडल्या पण या पुस्तकाची शेवटची आवृत्ती ७–८ वर्षांपूर्वी निघालेली असल्यामुळें त्या घटनांचीं नोंद या पुस्तकांत आढळणार नाहीं. या सर्व घटनांची यथायोग्य नोंद घेऊन विवेचनाचें सूत्र थेट १९६० पर्यंत आणून भिडविण्यासाठीं पुस्तकाची नवी आवृत्ति निघणें आवश्यक आहे.

तरीसुद्धां, मार्क्सवादाचें मूलभूत स्वरूप आणि इतिहासाची दिशा समजावून घेण्यासाठीं आणि समाजवादी आंदोलनाच्या प्रगतीला हातभार लावण्याची प्रेरणा मिळण्यासाठीं या पुस्तकाचा उपयोग होईल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | जगाबद्दलचा शास्त्रीय दृष्टिकोन | १ |
| २. | समाजाच्या विकासाचे नियम | ४ |
| ३. | भांडवलदारी समाज | १९ |
| ४. | साम्राज्यवादी अवस्थेंतील भांडवलशाही | ३४ |
| ५. | वर्ग-संघर्ष आणि राज्यसत्ता | ४६ |
| ६. | समाजवादी समाज | ६० |
| ७. | निसर्गासंबंधी मार्क्सवादी दृष्टिकोन | ७७ |
| ८. | कार्याला मार्गदर्शन करणारे तत्त्वज्ञान | ८९ |


....

अनुक्रम....३३९८५.... दि: ....
क्रमांक ....९३८५.... नों. दि: ....
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११८५९

## प्रकरण १ लें

# जगाबद्दलचा शास्त्रीय दृष्टिकोन

मार्क्सवाद हा आपण रहातो या जगाबद्दलचा, आणि या जगाचा भाग असलेल्या मानवी समाजाबद्दलचा सर्वसाधारण सिद्धांत होय. गेल्या शतकाच्या मध्य व उत्तर भागांत, कार्ल मार्क्सनें ( १८१८-१८८३ ) व फ्रेडरिक एंगल्सनें ( १८२०-१८९५ मिळून हा सिद्धांत विकसित केला; तो मार्क्सच्या नांवानें ओळखला जातो.

मानवी समाज आज आहे असाच कां आहे, तो कां बदलतो, आणि भविष्यकाळांत मानवजातीला आणखी कोणते बदल पहावयास मिळणार आहेत ?,--या प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढण्यास त्यांनी प्रारंभ केला. त्यासाठीं केलेल्या अभ्यासामुळें ते अशा निष्कर्षाला येऊन पोहोंचले कीं, बाह्य निसर्गांतील बदलांप्रमाणेंच हे बदलहि योगायोगानें घडत नाहींत, तर ते कांहीं विशिष्ट नियमांनुसार घडतात; आणि म्हणून, मानवाच्या प्रत्यक्ष अनुभवांवर आधारलेला असा समाजाबद्दलचा शास्त्रीय सिद्धांत शोधून काढणें शक्य आहे. हा सिद्धांत, धर्मश्रद्धा, वंशप्रेम व वीरपूजा, व्यक्तिगत कल अगर मनोराज्यवादी स्वप्नें यांच्यावर आधारलेल्या समाजाबद्दलच्या ज्या कल्पना जगापुढें मांडल्या जात असत ( आणि अजुनहि जातात ) त्यांच्या अगदीं विरुद्ध असेल.

ही सर्वसाधारण कल्पना मार्क्सनें तो ज्या समाजांत रहात होता त्याला--आणि मुख्यतः भांडवलदारी ब्रिटनला--लागू केली, आणि भांडवलशाहीचा आर्थिक सिद्धांत प्रस्थापित केला. या सिद्धांताबद्दलच

मार्क्सची विशेष प्रसिद्धी झाली. तरीसुद्धां, त्याचें नेहमींच आग्रहपूर्वक सांगणें असे कीं, त्याच्या आर्थिक सिद्धांतापासून त्याच्या ऐतिहासिक व सामाजिक सिद्धांतांना निराळे काढतां येणार नाहीं. कांहीं एका मर्यादेपर्यंतच वेतन व नफा यांचा केवळ आर्थिक प्रश्न म्हणून विचार करतां येतो; परंतु ज्यांना प्रत्यक्ष जीवनाचा अभ्यास करावयाचा आहे, केवळ अमूर्त कल्पनांचा नाहीं, अशा विद्यार्थ्यांना लवकरच समजून येते कीं, मालक व कामगार यांचा विचार केला तरच वेतन व नफा यांचें संपूर्ण आकलन होऊं शकते. तसेंच मालक व कामगार यांचा विचार करतांना समाजाच्या ज्या ऐतिहासिक अवस्थेंत ते रहात असतील तिचाहि अभ्यास करावा लागतो.

इतर सर्व शास्त्रांप्रमाणेंच, समाजाच्या विकासासंबंधीचा शास्त्रीय दृष्टिकोन अनुभवावर, आणि इतिहासाच्या व आपल्या सभोंवतालच्या जगाच्या वास्तविक सत्यावर आधारलेला असतो. म्हणून मार्क्सवाद हा परिपूर्ण झालेला अगर पूर्णपणें तयार करण्यांत आलेला सिद्धांत नाहीं. इतिहासाचीं दालनें उघडलीं जातात, माणसाचे अनुभव वाढत जातात, त्याबरोबर मार्क्सवादाचा सतत विकास होत जातो आणि उजेडांत आलेल्या नव्या वास्तविक सत्यांना तो लागू केला जातो. अशा विकासांत भर घालण्याचें सर्वांत महत्त्वाचें कार्य मार्क्स व एंगल्स यांच्या मृत्यूनंतर व्ही. आय्. लेनिननें ( १८७०–१९२४ ) केलें; आणि लेनिनच्या मृत्यूनंतर, रशियांत नव्या समाजवादी समाजाची उभारणी करण्याचें काम पुढें नेणाऱ्या जोसेफ स्तालिननें केलें.

समाजाचा अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोनांतून केल्यामुळें ज्ञान प्राप्त होतें, आणि ज्याप्रमाणें शास्त्रीय ज्ञान बाह्य जग बदलण्यासाठीं वापरतां येते त्याप्रमाणें हें ज्ञान समाज बदलण्यासाठीं वापरतां येते. परंतु त्यावरून हेंहि सिद्ध होतें कीं, समाजाच्या गतीचें नियंत्रण करणारे नियम आणि बाह्य जगाला लागू होणारे नियम एकाच प्रकारचे असतात. मानव व सर्व चराचर वस्तू यांना सार्वत्रिक रीतीनें लागू होणारे हे नियम

म्हणजेच मार्क्सवादी तत्त्वज्ञान अगर जगासंबंधीचा मार्क्सवादी दृष्टिकोन होय.

पुढील प्रकरणांत, आज ज्यांच्याबद्दल विशेष जिज्ञासा आहे अशा विषयासंबंधीचे मार्क्सवादी सिद्धांत दिले आहेत. परंतु विद्यार्थ्यांनी प्रथमपासूनच लक्ष्यांत ठेवावे कीं, मार्क्सवादाला तो सत्य आहे म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे; जीवनाशीं असंबंधित असलेल्या अमूर्त नैतिक कल्पनांच्या आधारावर त्यानें मान्यता मिळविलेली नाहीं. आणि तो सत्य आहे म्हणून, आजच्या जगांत अनेकांना जीं दुःखें व ज्या यातना सहन कराव्या लागतात त्यांतून मानवजातीला कायमचें मुक्त करण्यासाठीं, आणि अधिक उच्च प्रकारच्या समाजांत सर्व स्त्री-पुरुषांना स्वतःचा पूर्ण विकास करून घेतां यावा म्हणून मदतीसाठीं मार्क्सवादाचा उपयोग करतां येईल आणि केला जावा.

........

प्रकरण २ रें

# समाजाच्या विकासाचे नियम

मानवजातीचा इतिहास म्हणजे जणूं कांहीं राष्ट्रांमधील युद्धांची आणि राजे, सेनापति व मुत्सद्दी यांच्या पराक्रमांची यादीच होय असें भासविण्यांत येते. त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तिसाठीं त्यांनीं देश जिंकले अगर त्यांच्या नैतिक अगर अनैतिक दृष्टिकोनामुळें त्यांनीं विशिष्ट धोरणांचा अवलंब केला, अशा व्यक्तिगत मार्गांनीं या पराक्रमी व्यक्तींचे हेतु कधीं कधीं वर्णन करण्यांत येतात; तर कधीं कधीं ते राष्ट्राच्या सन्मानासाठीं अगर प्रतिष्ठेसाठीं किंवा धार्मिक हेतुनें कार्य करतात, असें सांगण्यांत येते.

इतिहाससंबंधीच्या अशा दृष्टिकोनानें मार्क्सवादाचें समाधान होत नाहीं.

पहिल्या प्रथम मार्क्सवादाचें हें म्हणणें असतें कीं, इतिहासाच्या खऱ्या शास्त्रानें लोकांसंबंधी विचार केला पाहिजे आणि जेव्हां व्यक्ति स्वतःपेक्षां फारच मोठ्या घटनेचें—उदाहरणार्थ, जनतेच्या एखाद्या चळवळीचें—प्रतिनिधित्व करतात तेव्हढ्यापुरताच त्यांचा विचार केला पाहिजे.

स्पष्टीकरणासाठीं इंग्लंडच्या इतिहासांतील क्रॉमवेलचें उदाहरण घेऊं या. मार्क्सवादाच्या दृष्टीनें क्रॉमवेलला जें महत्त्व आहे तें त्याच्या वैयक्तिक दृष्टिकोनामुळें अगर कृतीमुळें नाहीं, तर इंग्लिश लोकांच्या एका विभागानें केलेल्या चळवळींत त्यानें बजावलेल्या कामगिरीमुळें

आहे. त्यानें व त्याच्या पुढाकाराखालील चळवळीनें सरंजामशाहीचें कोट पाडले आणि भांडवलशाहीच्या विस्तृत विकासाचा मार्ग ब्रिटनमध्यें मोकळा केला. त्यानें केलेल्या युद्धांची जंत्री, त्याचा धार्मिक दृष्टिकोन अगर त्यानें रचलेली कारस्थानें महत्त्वाची नाहींत. ब्रिटनमधील उत्पादनाच्या व विभाजनाच्या विकासांतील त्याच्या कार्याचा अभ्यास, सरंजामशाही राजेशाहीविरुद्ध तेव्हांच व ब्रिटनमध्येंच लढा कां निर्माण झाला याचें ज्ञान, त्यावेळीं प्रत्यक्षपणें घडून आलेल्या बदलांचा अभ्यास—यांना महत्त्व आहे; इतिहास-शास्त्राचा हाच आधार आहे. अशा अभ्यासांतून ( आणि इतर देशांच्या व कालखंडांच्या अभ्यासांतून ) प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग करून सामान्य सिद्धांत—म्हणजे समाजाच्या विकासाचे नियम मांडता येतात; रसायन-शास्त्राच्या अगर इतर कोणत्याहि शास्त्राच्या नियमांइतकेंच हे नियम सत्य असतात. आणि एकदां ते आपल्याला माहीत झाले कीं, कोणत्याहि शास्त्रीय नियमांचा जसा आपण उपयोग करतो तसा या नियमांचा उपयोग करून जें पुढें घडण्याची शक्यता आहे त्याचें भविष्य तर आपण सांगू शकतोच, पण तें निश्चितपणानें घडावेंच म्हणून कार्यहि करू शकतो.

तेव्हां, सर्व मानवी इतिहासांत अंतर्भूत असलेल्या नैसर्गिक नियमांचा माग काढण्यासाठीं मार्क्सवाद इतिहासाच्या अभ्यासाकडे वळतो आणि त्यासाठीं तो समाजाकडे लक्ष्य देतो, व्यक्तींच्याकडे देत नाहीं. अशा रीतीनें केलेल्या निरीक्षणांत त्याला आढळून येते कीं, ( प्राथमिक साम्यवादी समाजव्यवस्थेच्या नंतरच्या अवस्थांतील ) समाजांत निरनिराळे विभाग असतात; त्यांतील कांहीं समाजाला एका दिशेनें ओढीत असतात, कांहीं दुसऱ्या दिशेनें—व्यक्तीशः नव्हें, तर वर्ग म्हणून.

हे वर्ग म्हणजे काय ? सोप्या शब्दांत सांगायचे म्हणजे. एकाच पद्धतीनें उपजिविका चालविणारे समाजाचे विभाग म्हणजे वर्ग. सरंजामदारी समाजांत राजा आणि सरंजामदारी सरदार "भूदासा" कडून

कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचे कर ( प्रत्यक्ष सेवाचाकरी अगर वस्तूंच्या रुपांत ) वसूल करून उपजीविका करीत असत; हे भूदास, मुख्यतः शेतांवर काम करून, प्रत्यक्ष उत्पादनाचें काम करीत असत. म्हणजे, त्या समाजांत, सरंजामदारी सरदार हा एक वर्ग होता; त्यांचे वर्ग या नात्यानें हितसंबंध होते; भूदासाच्यां श्रमांतून जास्तीतं जास्त उकळण्याची त्यांना इच्छा असे; स्वतःची जमीन व त्यावर काम करणारे भूदास यांची वाढ व्हावी असे त्या सर्वांना वाटत असे. उलट पक्षीं भूदास हाहि वर्ग होता; त्यांचे वर्गीय हितसंबंध होते. आपण निर्माण केलेल्या उत्पादनांतील मोठा हिस्सा मालकाला देण्याऐवजीं स्वतःसाठीं व स्वतःच्या कुटुंबासाठीं ठेवावा, असें त्यांना वाटत असे; त्यानां स्वतः साठीं काम करण्याचें स्वातंत्र्य पाहिजे होतें; मालकाकडून होणाऱ्या कठोर जाचांतून त्यांना स्वतःची सुटका करून घ्यावयाची होती—आणि हेच त्यांचे मालक त्यांना लागू करण्यासाठीं कायदे करीत व न्यायदानहि तेच करीत, त्यामुळें भूदासांची स्वातंत्र्याची इच्छाहि फार मोठी होती. भूदासांची परिस्थिति व भावना व्यक्त करतांना एक इंग्लिश लेखकानें त्यांच्या शब्दांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे; भूदास म्हणतोः "मी खूप कष्ट करतो; पहाटे बैल घेऊन शेतावर जातो आणि बैल जुंपून ताबडतोब कामाला लागतो. हिवाळा कितीहि कडक असला, बर्फ पडत असलें, तरी मालकाच्या धास्तीमुळें मला घरीं रहाण्याचें धैर्य होत नाहीं. दररोज एक एकरापेक्षा अधिक जमीन मला नांगरावीच लागते".

अशा परिस्थितीमुळें प्रत्येक सरंजामदारी राष्ट्रांत भूस्वामी व भूदास यांच्यांत सतत संघर्ष चालू असे; कधीं कधीं हा संघर्ष एखाद्या व्यक्तिविरुद्ध असे, तर कधीं कधीं भूदासांचा एखादा गट त्यांच्या मालकाविरुद्ध उठाव करीत असे; कधीं कधीं संघर्ष फारच मोठ्या प्रमाणावर होई आणि जीवनाची स्थिति सुधारण्यासाठीं खूप मोठ्या संख्येनें भूदास बंड करीत. १३८१ सालीं इंग्लंडमध्यें जॉन बाल व वॅट टेऊर यांच्या पुढाकाराखालीं झालेलें बंड अशाच प्रकारचें होतें. जर्मनी, रशिया व इतरहि अनेक देशांतून

अशाच तऱ्हेची भूदासांची अगर शेतकऱ्यांचीं बंडें झालीं होतीं आणि लहान प्रमाणावरचे संघर्ष तर सर्वंकडे सतत चालतच असत.

भूदासांना त्यांच्या स्वामीच्या शेतावर काम सक्तीनें करावेंच लागत असे. याशिवाय इतरहि नाना प्रकारचे कर वस्तूंच्या रुपानें द्यावे लागत—म्हणजे उदा. त्यांच्या शेतावरील धान्यांतील हिस्सा त्यांना द्यावा लागत असे शिवाय त्यांनीं व त्यांच्या कुटुंबियांनी तयार केलेल्या हस्तकारागिरिच्या वस्तूहि द्याव्या लागत. या समाजांत, आणखी कांहीं खास उत्पादक होते—उदा. शस्त्रें व उत्पादनाचीं साधनें तयार करणारे कारागिर; आणि व्यापारीहि होते; हे व्यापारी वरकड उत्पादन विकत घेत असत आणि इतर प्रदेशांतील व देशांतील उत्पादनाबरोबर त्यांचा व्यापार करीत. व्यापार पुढें वाढत गेला आणि भूदासांजवळ शिल्लक उरणाऱ्या वरकड उत्पादना-पेक्षां आणि त्यांच्या मालकांना देऊन राहिलेल्या मालापेक्षां अधिक उत्पा-दनाची व्यापाऱ्यांना गरज भासूं लागली. आणि म्हणून मग त्यांनी बाजारांत विकण्यासाठीं वस्तूचे उत्पादन संघटित करण्यास प्रारंभ केला; त्यासाठीं त्यांनीं सरजामदारी मालकांच्या पाशांतून मुक्त झालेल्या अगर पळून आलेल्या भूदासांना पूर्ण वेळ कामाला ठेवले. स्वतंत्र झालेल्या कांहीं भूदासांनी नगरांतून बस्तान बसविलें आणि ते कापड, धातूंची भांडी व इतर वस्तू तयार करणारे स्वतंत्र कारागिर बनले. अशा रीतीनें, हळुं, हळुं, शेंकडो वर्षांच्या कालखंडांत स्वतंत्र कारागिरांनी व मजूरी देऊन काम करून घेणाऱ्या मालकांनीं, बाजारांत विक्रीसाठीं तयार केलेलें उत्पादन, स्थानिक उपयोगासाठीं निर्माण होणाऱ्या सरंजामदारी उत्पादनाच्या गाभ्यांत अस्तित्वांत आलें. कालावधिनंतर, स्वतंत्र कारागिरहि कामगारांना कामावर ठेवणारे मालक बनले आणि रोजमजूरीसाठीं काम करणारे "शिकावू कामगार" (ज्यांना त्या काळीं 'जर्नमेन" म्हणत असत) त्यांच्याकडे खपूं लागले. अशा रीतीनें, १६ व्या शतकापासून एक नवा वर्ग अस्तित्वांत येऊं लागला, औद्योगिक भांडवलदारांचा वर्ग आणि त्याच्या जोडीला "सावलीप्रमाणें" औद्योगिक

कामगार वर्गहि अस्तित्वांत येऊं लागला होता. ग्रामीण विभागांतहि जुनी सरंजामदारी बंधने तुटलीं; सक्तीच्या वेठबिगारीच्या जागीं कर आले; अनेक भूदासांचें परिवर्तन आपापल्या शेतांवर काम करणाऱ्या स्वतंत्र शेतकऱ्यांत झालें; आणि स्वतःच्या शेतावर लागणाऱ्या श्रमशक्तिसाठीं जमीनमालक मजुरी देऊं लागले. याच पद्धतीनें, रोजमजुरी कमाविणाऱ्या शेतमजुराच्या जोडीला भांडवलदारी शेतकरी अस्तित्वांत आला.

परंतु नगरांत व खेड्यांत भांडवलदारी वर्गाची वाढ होतांना सरंजामदारी सरदारांचा पहिला राज्यकर्ता वर्ग आपोआप नष्ट झाला नाहीं. उलट, राजेशाही, जुनी जमीनदारी सरदारशाही व चर्च यांनीं नव्या भांडवलशाहीला स्वतःच्या हितासाठीं वापरण्याची पराकाष्ठा केली. स्वतंत्र झालेले अगर नगरांत पळून आलेले भूदास मालकांना सरंजामदारी कर ( वेठबिगार, वस्तू अगर पैसे ) देण्याच्या कटकटींतूनहि मुक्त झाले होते. परंतु या भूदासांचे वशंज जेव्हां पुढें कांहींसे धनवान झाले तेव्हां त्यांना आढळून आले कीं खरोखरी ते स्वतंत्र नव्हतें—राजा व सरंजामदारी सरदार त्यांच्याकडून अनेक प्रकारचे कर वसूल करीत असत, त्यांच्या व्यापारावर बंधने घालीत आणि त्यांच्या कारागिरी उत्पादनाच्या मुक्त विकासांत अडथळे आणीत.

राजा व जुने जमीनदारी सरदार यांना हे सर्व करतां येई कारण त्यांचें राज्य-यंत्रणेवर——म्हणजे सैन्य, न्यायाधिश व तुरुंग यांच्यावर——नियंत्रण होतें आणि कायदेहि तेच करीत असत. आणि म्हणून, भांडवलदार वर्गाच्या विकासाबरोबर नव्या प्रकारचे वर्ग——लढेहि विकास पावले. राजेशाही व सरंजामदारी जमीनदार यांच्याविरुद्ध भांडवलदारांना लढा करावा लागला; हा लढा अनेक शतकांपर्यंत चालू राहिला. तुलनात्मक दृष्टीनें मागासलेल्या देशांत अजूनहि तो चालू आहे; परंतु, कांही देशांत, उदा. ब्रिटन व फ्रान्समध्यें, तो पूर्ण झाला आहे.

## हा लढा कसा पूर्ण झाला ?

भांडवलदार वर्गाने सशस्त्र क्रांतिच्या मार्गानें पूर्वीच्या सरंजामदारी राज्यकर्त्यांच्या हातांतून सत्ता काढून घेतली तेव्हां ह्या लढ्यांचा शेवट झाला. इतर देशांच्या मानानें ब्रिटनमध्यें ही परिस्थिति फार लौकर परिपक्व झाली; तेथें उगवत्या भांडवलदार वर्गानें चालविलेल्या करविरोधी व व्यापारावरील बंधनाविरुद्धच्या संघर्षाचा उत्कर्ष बिंदू १७ व्याशतकाच्या मध्यावर गांठला गेला. या बंधनांमुळें भांडवलदारी पद्धतीच्या उत्पादनांत अडथळे येत होते. हीं बंधनें शांततेच्या मार्गानें दूर करण्याचे भांडवलदार वर्गानें प्रयत्न केले-त्यांनीं राजाकडे अर्ज-विनंत्या केल्या, कर देण्यास नकार दिला, परंतु राज्ययंत्रणेविरुद्ध त्यांना म्हणण्यासारखे विजय मिळविता आले नाहींत. तेव्हां त्यांना शस्त्रांचा सामना शस्त्रांनीं करावा लागला; राजाविरुद्ध, अनियंत्रित करांविद्ध, व्यापारावरील बंधनाविरुद्ध, आणि सरंजामदारी पाश तोडण्याचे प्रयत्न करणाऱ्यांवर राजाच्या न्यायाधिशांनीं लादलेल्या दंडाविरुद्ध व कारावासाविरुद्ध त्यांनीं जनतेचा उठाव घडवून आणला. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, भांडवलदारांना सशस्त्र क्रांति घडवून आणावी लागली; राजाविरुद्ध व पिळवणुकीच्या जुन्या पद्धतींविरुद्ध सशस्त्र लढा करण्यासाठीं त्यांना जनतेच्या अग्रभागी रहावें लागले; आधींच्या राज्यकर्त्यांचा लष्करी साधनांनीं पराभव करावा लागला. इतकें सर्व केल्यानंतरच, भांडवलदार वर्गाला सत्ताधारी वर्ग होतां आलें, भांडवलशाही विकासाच्या आड येणारे सर्व अडथळे दूर करतां आले आणि त्यासाठीं लागणारे कायदे करतां आलें.

हें अगदीं खरें आहे कीं, बहुतेक सर्व इतिहासाच्या पुस्तकांतून इंग्लंड-मधील या भांडवलदारी क्रांतिचें वर्णन, रोमन कॅथॉलिक धार्मिक वृत्तीचा, हूकूमशहा, व कारस्थानी राजा पहिला चार्लस याच्या विरुद्ध झालेली लढाई, असें केलें जातें आणि ही लढाई लढणारा क्रॉमवेल हा एक अत्यंत माननीय कॅथॉलिक विरोधक व ब्रिटिश स्वातंत्र्याचीं उच्च ध्येयें जतन कारणारा होत, असें सांगण्यांत येतें. थोडक्यांत म्हणजे तो

एक नैतिक व धार्मिक लढा होता, असें भासविण्यांत येतें. परंतु, मार्क्सवाद व्यक्तींचाच विचार करीत नाहीं, त्यांच्या पलिकडचें पहातो; इतकेंच नव्हे तर लढ्याच्या घोषणांच्याहि पलिकडचे पहातो. जुन्या सरंजामदारी राज्यकर्त्योच्या हातांतून सत्ता काढून घेण्यासाठीं उगवत्या भांडवलदार वर्गानें केलेला संघर्ष हें त्या लढ्याचें मर्म मार्क्सवाद ओळखतो; आणि खरोखरीच इतिहासाला नवें वळण देणारा, असा तो संघर्ष होता; या क्रांतीनंतर आणि १६८९ मध्यें तिची पुढची पायरी ओलांडल्यानंतर इंग्लंडच्या भांडवलदार वर्गानें राज्यसत्तेंत महत्त्वाची भागिदारी मिळविली.

इंग्लंडमध्यें भांडवलदारी क्रांति फार सुरवातीच्या अवस्थेंत झाल्यामुळें भांडवलदारांना निर्णायक व संपूर्ण विजय मिळाला नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, जुने भांडवलदारी संबंध बव्हंशी नष्ट केले गेले तरी, जमीन-मालकांचा वर्ग ( नगरांतील नवीन भारती झालेल्या श्रीमंतांसहित ) बऱ्याच मर्यादेपर्यंत जीवंत राहिला आणि त्यांचेंच पुढें भांडवलदारी जमीनदारांत पर्यवसान झालें; पुढील दोन शतकांत त्यांचा पैसेवाल्यांच्या हितसंबंधांशीं मिलाफ झाला आणि राज्यसत्तेच्या नियंत्रणांत त्यांनीं मोठी भागिदारी मिळविली.

परंतु फ्रान्समध्यें या सर्व घडामोडी नंतरच्या काळांत झाल्या; तिथें १७८९ पर्यंत भांडवलदारी क्रांति घडून आली नाहीं; आणि ती झाली तेव्हां तिनें फार मोठ्या प्रमाणावर दूरगामी बदल घडवून आणले. परंतु, मार्क्सवादी विचारांप्रमाणें याचें कारण, रूसोप्रभृति विचारवंतांनीं मानवाचे हक्क जाहीर करणारीं पुस्तकें लिहिलीं अगर त्या क्रांतीची लोकप्रिय घोषणा "स्वातंत्र्य-समता-बंधुत्व" ही होती, हें नाहीं. ज्याप्रमाणें क्रॉमवेलच्या क्रांतीचें मर्म वर्ग-संघर्षांत आहे, त्याच्या धार्मिक घोषणांत नाहीं, त्याचप्रमाणें फ्रेंच-क्रांतीचें मर्म वर्ग संबंधांत आहे--तिच्या निशाणावर अंकित झालेल्या अस्पष्ट नीति-तत्त्वांत नाहीं.

अशा काळखंडाबद्दल मार्क्सनें म्हटलें आहे : 'एखाद्या व्यक्तीचें

मूल्यमापन ज्याप्रमाणें आपण तिच्या स्वतःबद्दलच्या मतांवरून करीत नाहीं, त्याप्रमाणें कोणत्याहि क्रांतीसंबंधीचें मूल्यमापन आपण तिच्या जाणीवेच्या आधारावर ठरवित नाहीं."

क्रांतीकारक कालखंडाच्या आकलानासाठीं, सत्तेसाठीं झगडणारे वर्ग, जुन्या वर्गाच्या हातून सत्ता काढून घेत असलेला नवा वर्ग आपण पाहिला पाहिजे; जरी कळत अगर नकळत या नव्या वर्गाचे पुढारी वर्ग-हित अगर वर्ग-सत्ता यांच्याशीं संबंधित नसलेल्या अमूर्त तत्त्वांसाठीं अगर प्रश्नांसाठीं लढत असल्याचें सांगत असले तरीसुद्धां आपण त्यांचें खरें स्वरूप ओळखलें पाहिजे.

झगडणाऱ्या वर्गामधील संघर्ष ही मानवी समाजाच्या विकासाची मुख्य प्रेरक शक्ति असते, असें इतिहासाकडे पहाणाऱ्या मार्क्सवादी दृष्टिकोनाचें म्हणणें आहे, परंतु, जीवनाला आवश्यक लागणाऱ्या वस्तूंचें उत्पादन करण्यासाठीं वापरांत असलेल्या उत्पादन-शक्तींच्या विकासाच्या अवस्थेवर समाजांतील वर्ग-विभागणी आणि नव्या वर्गांचा उदय अवलंबून असतो. बाष्प व विद्युत् शक्तीवर चालणाऱ्या यंत्रांच्या शोधांमुळें उत्पादनाची खूपच वरची अवस्था निर्माण झाली; पण या शोधांचें महत्त्व इतकेंच नाहीं. त्यांच्यामुळें, चरखा व हातमाग चालवून कापड तयार करणाऱ्या कोष्टयाचा नाश झाला; कारण यंत्राच्या सहाय्यानें काम करणारा कामगार एक दिवसांत जितकें कापड तयार करूं लागला तितकें हातमागावर एक आठवड्यांतहि तयार होत नसे; त्यामुळें चढाओढींत कोष्टी टिकूं शकला नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, उत्पादनाच्या साधनांचा मालक असलेला आणि त्यांच्या सहाय्यानें काम करून स्वतः कापड तयार कारणारा कोष्टी जाऊन त्याच्या जागीं दोन नवे वर्ग अस्तित्वांत आलें. एक नव्या यंत्रांचा मालक असलेला पण स्वतः त्यांच्यावर काम न करणारा भांडवलदार वर्ग आणि दुसरा, उत्पादनाच्या कोणत्याहि साधनांचा मालक नसलेला पण ( मजुरी घेऊन ) त्यांच्यावर मालकांकरितां काम करणारा औद्योगिक कामगार वर्ग.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र
अनुक्र. 339/6

हा बदल नकळत झाला; त्याची योजना कोणीहि आंखली नव्हती. कांहीं लोकांना नवें ज्ञान प्राप्त झालें, तें त्यांनीं स्वतःच्या फायद्यासाठीं उत्पादनाच्या क्षेत्रांत वापरलें. त्याचे सामाजिक परिणाम काय होतील याची त्यांना कल्पना नव्हती; अगर तसे परिणाम व्हावेत अशी त्यांची इच्छाहि नव्हती. मानवी समाजांत घडून आलेले सर्व बदल असेच घडून आले, असें मार्क्सचें म्हणणें आहे. माणूस सतत आपले ज्ञान वाढवित गेला, तें त्याने उत्पादनासाठीं वापरलें आणि परिणामीं महान सामाजिक बदल घडवून आणले. या सामाजिक बदलांमुळें वर्ग-संघर्ष निर्माण झाले; या संघर्षांना—धर्म, राजकरण, न्याय इत्यादि तत्त्वांच्या व संस्थांच्या लढ्याचें स्वरूप प्राप्त झालें; कारण त्यावेळीं अस्तित्वांत असलेलीं तत्त्वें व संस्था उत्पादनाच्या जुन्या पद्धतींतून आणि जुन्या वर्ग-संबंधांतून निर्माण झालेल्या होत्या.

हीं तत्त्वें व या संस्था कशामुळें अस्तित्वांत आल्या होत्या, आणि त्यांचा अस्त कशामुळें झाला ?—या प्रश्नाचें उत्तर देतांना मार्क्सनें दाखवून दिलें आहे कीं, माणसांच्या प्रत्यक्ष व्यवहारांतूनच सर्वकडे व सर्वकाळीं तत्वें व संस्था उदयास आल्या. पहिली गोष्ट होती—अन्न, वस्त्र, आसरा या जीवनाच्या आवश्यक वस्तूंचें उत्पादन. त्याला अनुसरुन इतिहासाच्या कालक्रमांत एकामागून एक असे सामाजिक समवाय अस्तित्वांत आले; जसे, आदि जमातींचा समाज, गुलामगिरीवर आधारलेला समाज, सरंजामदारी समाज व आधुनिक भांडवलदारी समाज. या प्रत्येक समाजांतील सभासदांच्या विभागांचे परस्पर-संबंध उत्पादनाच्या पद्धतीवर अवलंबून होते. माणसांनीं प्रथम विवाह-संस्था, धर्म-संस्था इत्यादि संबंधी विचार केला नाहीं; त्या त्या समाज गटाच्या चालीरीतींतून त्या तयार झाल्या; संस्था, कायदे, नैतिक व इतर कल्पना आधींच्या चालीरीतीतून साकार झाल्या आणि चालीरीती सरळ सरळ उत्पादनाच्या पद्धतीतून निर्माण झाल्या होत्या.

आणि म्हणून, ज्यावेळीं उत्पादनाची पद्धत बदलली—उदाहरणार्थ,

सरंजामशाही जाऊन भांडवलशाही आली--त्यावेळीं संस्था व तत्त्वेंहि बदलचीं. एका अवस्थेंत जें नैतिक मानलें जाई तें दुसऱ्या अवस्थेंत अनैतिक ठरलें आणि त्याच्या उलट, जें एका अवस्थेंत अनैतिक मानलें जाई. तें नंतर नैतिक समजलें जाऊं लागलें. आणि ज्या वेळीं हें भौतिक बदल घडून येत होते--म्हणजे उत्पादनाच्या पद्धतींत बदल घडत होते--त्यावेळीं स्वाभाविकपणेंच तात्त्विक संघर्ष चालू असत, अस्तित्वांत असलेल्या संस्थाविरुद्ध बंड उभारलें जाई.

भांडवलदारी पद्धतीचें उत्पादन प्रत्यक्षपणें सुरु होतांच सरंजामदारी संबंधाविरुद्ध संघर्ष निर्माण झाला; कारण या नव्या उत्पादन पद्धतींत भांडवलाला व्यवहारांत अग्रस्थान मिळवायचें होतें. म्हणून मग नव्या, विरोधी तत्त्वांचा उदय झाला; राजाच्या "दैवी" हक्कांचें तत्त्व जाऊन त्याच्या जागीं, "प्रतिनिधित्व नाहीं, तर कर नाहीं", हें तत्त्व आले; व्यापार-स्वातंत्र्याचा हक्क मागण्यांत येऊं लागला आणि वैयक्तिक हक्कांना अभिव्यक्ति देणाऱ्या व मध्यवर्ति नियंत्रणाला विरोध करणाऱ्या धार्मिक कल्पना पुढें आल्या. या अमूर्त तत्त्वांसाठीं व धार्मिक भावनासाठीं स्वतंत्र व्यक्ति मरण पत्करीत होत्या, अशा स्वरूपांत पुढें आलेली ही घटना म्हणजे वास्तवांत उगवती भांडवलशाही व मावळता सरंजामशाही यांच्यांतील संघर्ष होता; त्यांतील तात्त्विक संघर्ष दुय्यम होता.

आणि याच कारणासाठीं मार्क्सवादी विचारांचे लोक समाजाच्या संघटनेसाठीं अमूर्त "तत्त्वें" पुढें मांडात नाहींत; मनोराज्यवादीमात्र मांडतात. मार्क्सवादाचें म्हणणें असतें कीं, मानवी विचारांत पुढें आलेलीं अशी सर्व "तत्त्वें" म्हणजे विशिष्ट काळीं व विशिष्ट जागीं प्रत्यक्षपणें अस्तिवांत असलेल्या समाज-संघटनेचीच प्रतिबिंबें असतात आणि म्हणून तीं सर्वकाळीं व सर्वजागीं लागू होत नाहींत, व होऊं शकणार नाहींत. शिवाय जीं तत्त्वें अक्षय वाटतात, त्यांचा अर्थहि समाजाच्या निरनिराळया अवस्थांत एकच नसतो; उदाहरणार्थ. मानवाच्या समानतेचें

तत्त्व घ्या. ग्रीक नगर राज्यांत समान हक्कांचें तत्त्व गुलामांना लागू नव्हतें" महान फ्रेन्च क्रांतींतील "स्वातंत्र्य-समता-बंधुत्वा" चा अर्थ होता, उगवत्या भांडवलदार वर्गाला व्यापार-स्वातंत्र्याचा हक्क, भांडवलदार वर्गाला सरंजामी मालकांबरोबर समानता आणि या वर्गातील व्यक्तींचें परस्पराशीं बंधुत्व--वर्ग-बंधुत्व; म्हणजेच सरंजामी जुलूम व नियंत्रणें यांविरुद्ध एकमेकांना बंधुभावाची मदत. यां तत्त्व-त्रयींपैकीं कोणतेंहि तत्त्व फ्रेंच साम्राज्यांतील गुलामांना, किंबहुना खुद्द फ्रांसमधील लोकांच्या गरीब विभागांना लागू नव्हतें.

म्हणूनच आपण असा निष्कर्ष काढूं शकतो कीं, बहुतेक सर्व तत्त्वें आणि विशेषतः समाज-संघटनेशीं संबंधित असलेलीं तत्त्वें "वर्ग-तत्त्वें" असतात; तीं त्या समाजातील सत्ताधारी वर्गाचीं तत्त्वें असतात; आणि तो वर्ग प्रचार-साधनांची मालकी, शिक्षणाचें नियंत्रण आणि विरोधी विचारांना न्याय-कोर्टामार्फत, बडतर्फी करुन व इतर मार्गांनीं चिरडून टाकण्याचें त्यांचें सामर्थ्य यांच्या जोरावर आपलीं तत्त्वें बाकीच्या समाजावर लादीत असतो. याचा अर्थ असा नव्हें कीं, सत्ताधारी वर्ग स्वतःशीं म्हणतो : "हें एक तत्त्व आहे. हें अर्थातच खरें नाहीं, पण आम्हीं त्याच्यावर सर्वांना विश्वास ठेवायला भाग पाडूं; निदान कोणालाहि जाहीर रीतीनें त्याला विरोध करूं देणार नाहीं" असें होत नाहीं; उलट, अशीं तत्त्वें सर्वसाधारणपणें, सत्ताधारी पुढें आणीत नाहीं; तीं प्रत्यक्ष जीवनांतून वर येतात. उदा. सरंजामदारी सरदाराची अगर उमरावपद प्राप्त झालेल्या उद्योगपतीची प्रत्यक्ष शक्ति हीच, "अमीर-उमराव" इतरांपेक्षां श्रेष्ठ असतात, या विचारांचा भौतिक पाया असतो परंतु एकदां हे विचार निर्माण झाले आणि दृढमूल झाले कीं, ते सर्वांनीं मानलेच पाहिजेत अशी व्यवस्था करणें अधिकार गाजविणाऱ्या वर्गाला महत्त्वाचें वाटतें, कारण लोकांनी ते मानले नाहींत तर ते त्यांना अनुसरून वागणार नाहींत--( उदा. ते राजाचा दैवी हक्क मानणार नाहींत आणि राजाचे डोकें उडविण्यासहि मागेंपुढें पहाणार नाहींत ) म्हणून; सर्वकाळांतील, व फक्त अमेरिकेंतीलच

नव्हें तर सर्व देशांतील सत्ताधारी वर्ग "भयंकर विचारां" चा फैलाव होऊं नये, म्हणून जें करतां येईल तें सर्व करतात.

परंतु प्रश्न असा विचारला जाईल कीं, तत्त्वांना व विचारांना दुय्यम स्थान असतें आणि उत्पादन प्रकारांतील भौतिक बदल जर प्रथम दर्जाची महत्त्वाची घटना असते तर "भयंकर विचारां" चा उदय होतोच कसा? थोडक्यांत म्हणजे, उत्पादनाचा नवा प्रकार अस्तित्वांत येण्यापूर्वी लोक त्याच्याबद्दल विचार कसे करुं लागतात?

उत्तर असें आहे कीं, उत्पादनाचे नवे प्रकार अस्तित्वांत येण्याची परिस्थिति निर्माण झाल्याशिवाय लोक विचार करुं लागत नाहींत. परन्तु परिस्थिति निर्माण झाल्यानंतर जुनी परिस्थिति आणि उत्पादनाच्या नव्या शक्ति यांच्यांतील संघर्षामुळें लोकांना विचार करावाच लागतो.

उदाहरणार्थ, मोलमजुरी करणाऱ्यांकडून उत्पादनाची प्रत्यक्ष वाढ होतांच आणि नफा मिळविण्यासाठीं उत्पादन विकण्याची आवश्यकता निर्माण होतांच, प्रारंभीच्या भांडवलदारांचा सरंजामी व्यापारीनियंत्रणाविरुद्ध तीव्र संघर्ष निर्माण झाला. त्यांतूनच व्यापारस्वातंत्र्य, कर देणाऱ्यांना ते ठरविण्याचा हक्क, इत्यादि विचारांचा जन्म झाला. तेव्हां भांडवलदारी समाज-पद्धति अस्तित्वांत आलेली नव्हती. परंतु भांडवलदारी समाजाच्या अस्तित्वाची परिस्थिति तयार झाली होती; आणि तिच्यांतूनच भांडवलदारी विचारांचा जन्म झाला.

समाजवादी विचारहि असेच जन्माला येतात. जेव्हां मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांचा सर्वत्र विस्तार झाला आणि सतत येणाऱ्या अति-उत्पादनाच्या अरिष्टामुळें भांडवलशाही सामाजिक प्रगतींत अडथळें आणते हें सर्वांना दिसून आलें तेव्हां समाजवादी समाजाच्या अभ्युदयाला योग्य अशी परिस्थिति निर्माण झाली आणि तेव्हांच समाजवादाबद्दलच्या मनोराज्यवादी कल्पना जाऊन त्यांच्या जागीं समाजवादाचें शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान निर्माण झालें.

परंतु, विचारांचा जन्म भौतिक परिस्थितींतूनच होत असला तरी, एकदां अस्तित्वांत आलें म्हणजे ते मानवाच्या कार्यावर प्रभाव गाजवितात आणि त्यामुळें परिस्थितीवरहि त्यांचा प्रभाव पडतो. उत्पादनाच्या जुन्या पद्धतीवर आधारलेले विचार नव्या परिस्थितींत जुनेपुराणे होतात; ते माणसाची प्रगति रोंखून धरतात आणि म्हणूनच प्रत्येक कालखंडांतील सत्ताधारी वर्ग ते समाजांत अधिकाधिक रुजवण्याचा प्रयत्न करतो. उत्पादनाच्या नव्या परिस्थितींतून उदयास येणारे विचार प्रगतिशील असतात कारण ते समाजाचें नव्या पद्धतीकडे स्थित्यंतर करण्याच्या कार्याला उत्तेजन देतात; आणि म्हणूनच सत्ताधारी वर्ग त्यांना धोकादायक समजतो आणि यामुळेंच, नागरिकांची फार मोठी संख्या अर्धपोटी असतांना, गव्हाच्या किंमती उतरूं नयेत म्हणून धान्य जाळून टाकणारी समाजपद्धती वाईट आहे, असें सांगणारी विचारधारा त्यांना "धोकादायकच" वाटते कारण या विचारसरणींतून ज्या समाजपद्धतींत उत्पादन उपभोगासाठीं असतें, नफ्यासाठीं नसतें, अशा समाजपद्धतीबद्दलचे विचार तयार होतात; या विचारांतून समाजवादी व साम्यवादी पक्षांच्या संघटना उदयास येतात आणि त्या नव्या समाजपद्धतीकडे समाजाला लौकरांत लौकर नेण्यासाठीं कार्य करूं लागतात.

यावरून हें समजून येईल कीं, ("ऐतिहासिक भौतिकवाद," या नांवानें प्रसिद्ध असलेला), समाजविकासासंबंधीचा मार्क्सवादी सिद्धांत भौतिकवादी "प्रारब्धवाद" नाहीं; माणसाच्या सर्व कृति सभोंवतालच्या भौतिक परिस्थितीप्रमाणेंच होत असतात, असें तो समजत नाहीं; उलट, माणसाचें कार्य आणि त्याच्यामुळें घडून येणारे भौतिक बदल कांहीं अंशीं त्याच्या भोंवतालच्या भौतिक जगाचे परिपाक असतात आणि कांहीं अंशीं या भौतिक परिस्थितीवर प्रभुत्व मिळविणाऱ्या त्याच्या ज्ञानाचे परिपाक असतात. परंतु, हें ज्ञानहि त्याला भौतिक जगाच्या अनुभवांतूनच मिळत असल्यामुळें भौतिक जगाच्या परिस्थितीला प्रथम क्रमांक दिला जातो. भौतिक जगाचा अनुभव

माणसाला निष्क्रिय बसून, अमूर्त मार्गानें मिळत नाहीं; तर जीवनाला आवश्यक लागणाऱ्या वस्तूंचें उत्पादन करीत असतांना मिळतो. त्याचे ज्ञान जसें वाढत जातें, तो उत्पादनाच्या नव्या पद्धति जेव्हां शोधून काढतो, व वापरांत आणतो, तेव्हां सामाजिक संघटनेचे जुने प्रकार भारभूत होतात, ते उत्पादनाच्या नव्या पद्धतींच्या पूर्ण विकासांत अडथळे आणतात. पिळला जाणारा वर्ग हें सर्व जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवांतून शिकतो आणि तो प्रथम, जुन्या प्रकारच्या समाज-संघटनेनें निर्माण केलेल्या विशिष्ट अन्यायांविरुद्ध, विशिष्ट बंधनांविरुद्ध लढा उभारतो. परंतु, पुढें तो अपरिहार्यपणें समाजपद्धति बदलण्यासाठीं सत्ताधारी वर्गाविरुद्ध सार्वत्रिक लढ्यांत ओढला जातो.

जुन्या उत्पादन पद्धतींतून नव्या उत्पादन पद्धतींचा विकास होण्याचा क्रम, कांहीं एका मर्यादेपर्यंत अजाणतां असतो, योजनाहीन असतो; त्याच-प्रमाणें, जुनी उत्पादन पद्धत टिकवून धरणाऱ्या जुन्या समाज संघटनां-विरुद्धचा लढाहि सुरवातीला तसाच असतो. परंतु, अशी एक अवस्था येतेच कीं जेव्हां, नव्या उत्पादन शक्तींच्या पूर्ण वापरांत जुने वर्गसंबंध अडथळे आणीत आहेत हें स्पष्टपणें दिसूं लागतें; आणि याच अवस्थेंत, "भविष्यकाळचा भाग्यविधाता असलेला वर्ग" जाणीवपूर्वक कार्य करूं लागतो.

आतां उत्पादन-शक्तींचा विकास करण्याची क्रिया अजाण अगर योजनाहीन रहाण्याची आवश्यकता उरलेली नाहीं. मानवानें पुरेसा अनुभव, सामाजिक स्थित्यंतरांबद्दलचें पुरेसें ज्ञान मिळविलें आहे; तो आतां पुढील अवस्थेकडे जाणीवपूर्वक व योजनाबद्ध रीतीनें जाऊं शकतो आणि जिच्यांत उत्पादन जाणीवपूर्वक आणि योजना-बद्ध असेल अशा समाजाची स्थापना करूं शकतो. अशा अवस्थेबद्दल एंगल्स म्हणतो :

"आतांपर्यंत इतिहासावर प्रभुत्व चालविणाऱ्या भौतिक बाह्य शक्ती या अवस्थेंत मानवाच्या नियंत्रणाखालीं येतील. आणि या क्षणापासून माणूस पूर्ण जाणीवपूर्वक स्वतःचा इतिहास घडवूं लागेल."

.........

प्रकरण ३ रें

# भांडवलदारी समाज

ब्रिटनमध्यें सरंजामशाहीच्या जागीं प्रस्थापित झालेल्या, आणि गेल्या शतकांत जगभर फैलावत गेलेल्या, उत्पादनाच्या नव्या पद्धतीचा—भांडवलशाहीचा—अभ्यास करण्यांत मार्क्सच्या जीवनांतील बरीच वर्षें खर्च झालीं. त्याच्या अभ्यासाचा मुख्य उद्देश भांडवलदारी समाजाच्या "गतीचे नियम" शोधून काढणें, हा होता. भांडवलशाही नेहमींच अस्तित्वांत नव्हती, तिचा हळुं हळूं उदय झाला, १८ व्या शतकाच्या अखेरीस, "औद्योगिक क्रांती"च्या काळांत तिचें जें स्वरूप होतें तेंच पुढें मार्क्सच्या काळांत राहिलें नाहीं. मार्क्सचा उद्देश्य त्याच्या काळांतील भांडवलदारी उत्पादनाच्या पद्धतीचें केवळ वर्णन करण्याचा नव्हता, तर तिचें विश्लेशण करून ती कां व कोणत्या दिशेनें बदलत होती हें दाखविण्याचा होता. विषयाकडे पहाण्याचा हा दृष्टिकोन नवा होता. अर्थशास्त्रवरील इतर लेखकांनीं भांडवलशाहीं जशी दिसत होती तसेंच तिचें वर्णन केलें आणि जणं काहीं ती स्थिर व शाश्वत पद्धति आहे असें मानलें; मार्क्सच्या दृष्टीनें मात्र इतिहासांतील उत्पादनाच्या इतर पद्धतीं-प्रणाणें ही पद्धतीहि बदलत होती. आणि म्हणून त्याच्या अभ्यासाच्या परिणामीं त्यानें केवळ भांडवलशाहीचें वर्णन केलें नाहीं, तर शास्त्रीय भविष्य वर्तविलें. कारण भांडवलशाहीचा विकास खरोखरीच कोणत्या दिशेनें होत होता हें त्याला समजून आलें होतें.

सरंजामशाहींतील वैयक्तिक उत्पादनांतून भांडवलदारी उत्पादनाचा जन्म झाला. स्थानिक वापरासाठीं उत्पादन हें सरंजामदारी उत्पादनाचें

मुख्य लक्षण होतें; त्या वेळीं भूदास अन्न, वस्त्र व इतर वस्तू स्वतःसाठीं व त्यांच्या भूस्वामीसाठीं तयार करीत. पुढें वरकड उत्पादन होऊं लागताच—म्हणजे, त्या त्या गटाला लागणाऱ्या जिन्नसांपेक्षां अधिक उत्पादन होऊं लागतांच— त्यांची देशांतील इतर विभागांत तयार झालेल्या अगर दुसऱ्या देशांतून आणलेल्या वस्तूंबरोबर अदलाबदल होऊं लागली. तरीसुद्धां उत्पादनाचा मुख्य भाग उत्पादक गटाच्या व त्याच्यावर सरंजामदारी हक्क सांगणाऱ्या भूस्वामीच्या उपभोगासाठींच असे.

जेव्हां सरंजामदारी घटकांचा नाश होऊं लागला तेव्हांच उत्पादनाच्या या प्रकाराची जागा नफ्यासाठी होणाऱ्या उत्पादनानें घेतली; भांडवलदारी उत्पादनाचीं मुख्य निदर्शक खूण "नफ्यासाठीं उत्पादन" हीच असतें या पद्धतीच्या उत्पादनासाठीं दोन गोष्टींची आवश्यकता असते : पहिली ही कीं, ज्यांच्या जवळ ( माग, सूत काढण्याचीं यंत्रे. इ. ) उत्पादनाचीं साधनें विकत घेण्याइतकी संपत्ति आहे अशा व्यक्ति; आणि दुसरी ही कीं, ज्यांच्या जवळ स्वतःचीं उत्पादनाचीं साधनें नाहींत, म्हणजे जिचा उपयोग करून जीवन जगतां येईल अशी साधन सामुग्री नाहीं, असे लोक. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे, उत्पादनाच्या साधनांचे मालक असलेले "भांडवलदार" असायला पाहिजेत आणि भांडवलदारांच्या मालकीच्या यंत्रांवर काम केलें तरच ज्यांना उपजीवीका करतां येते, असे कामगार असावयास पाहिजेत.

या तऱ्हेच्या उत्पादनांत कामगारांनीं केलेलें उत्पादन प्रत्यक्ष त्यांच्यासाठीं नव्हतें अगर त्यांच्या नव्या "स्वामी"च्या म्हणजे भांडवलदारांच्या वैयक्तिक उपयोगासाठींहि नव्हतें, तर तें भांडवलदारांनीं पैसे घेऊन विकण्यासाठीं होतें. ( अशा रीतीनें बाजारांत विकण्यासाठीं तयार करण्यांत येणाऱ्या वतूंना "क्रय-वस्तू" म्हणतात ) या क्रय-वस्तूंच्या उत्पादनाबद्दल कामगारांना रोजमजूरी आणि भांडवलदारांना नफा मिळूं लागला;—गिऱ्हाईकांनीं वस्तुंची किंमत दिल्यानंतर आणि

त्यांतून कामगारांची मजुरी कच्च्या मालाची किंमत व उत्पादनाचा इतर खर्च भांडवलदारानें भागविल्यानंतर त्याच्याजवळ राहणारी ही रक्कम म्हणजे त्याचा नफा.

भांडवलदारांना नफा कसा मिळवितां येतो ? नफ्याचा उगम कशांतून होतो ? या प्रश्नाचें उत्तर शोधण्यसाठीं अर्थशास्त्राचे विद्वान अनेक वर्षें प्रयत्न करीत होते.

अखेरीस त्याचें उत्तर मार्क्सने शोधून काढलें.

मार्क्सनें सांगितलें कीं : उत्पादनाच्या मूल्यापेक्षां अधिक किंमतीला तें बाजारांत विकल्यामुळें नफा होऊं शकणार नाहीं; कारण त्याचा अर्थ सर्व भांडवलदार सदासर्वदा एकमेकाला फसवितात असा होईल; आणि अशा वेळीं एकाला 'नफा' झाल्यास दुसऱ्याला नुकसान होईल; म्हणजे नफानुकसान यांची गोळाबेरीज होऊन भांडवलदार वर्गाला सर्वसाधारण नफा उरणारच नाहीं. याचाच अर्थ असा कीं, नफा वस्तुंच्या विक्रींतून ( म्हणजे वस्तू अधिक किंमतीला विकल्यामुळें ) निर्माण होत नसून तो उत्पादन जेव्हां बाजारांत विक्रीसाठीं येते तेव्हांच त्याच्यांत अंतर्भूत असला पाहिजे; तो वस्तू निर्माण होत असतांनाच निर्माण होत असला पाहिजे.

आणि म्हणून नफ्याचा उगम शोधण्यासाठीं, उत्पादनाच्या क्रियेचा अभ्यास करून तिच्यांतील नफा निर्माण करणारा घटक—म्हणजे स्व-मूल्यापेक्षां अधिक मूल्य भांडवलदारांना मिळवून देणारा घटक-शोधून काढला पाहिजे.

त्यासाठीं प्रथम "मूल्य" म्हणजे काय ? या प्रश्नाचें बरोबर उत्तर दिलें पाहिजे. सर्वसाधारण भाषेंत "मूल्य" या शब्दाचे दोन निरनिराळे अर्थ होऊं शकतात. मूल्य म्हणजे कोणालाहि वस्तुच्या उपयोगामुळें वाटतें तें—जसे, तहानेल्या माणसाला पेय 'मूल्यवान" वाटतें; किंवा एखाद्या व्यक्तीला विशिष्ट वस्तुबद्दल "भावनात्मक" मूल्य वाटतें. हा झाला एक अर्थ; पण नेहमींच्या प्रचारांत दुसराहि एक अर्थ



दा. क्र. 99859

आहे—कोणत्याहि विक्रेत्याकडून कोणत्याहि गिऱ्हाईकाला बाजारांत वस्तू ज्या किंमतीला विकली जाते तें तिचें मूल्य यालाच "विनिमय मूल्य" म्हणतात. मार्क्सनें याबद्दलच विवेचन केलें.

हें खरें आहे कीं, भांडवलदारी समाजांतसुद्धां विशिष्ट तऱ्हेच्या वस्तू विशिष्ट गिऱ्हाईकांसाठींच तयार होऊं शकतात आणि त्यांची खास किंमतहि ठरविली जाऊं शकते. पण मार्क्स नित्याच्या भांडवलदारी उत्पादनाबद्दल विचार करीत होता. ज्या उत्पादन पद्धतींत सर्व प्रकारचा, कोट्यावधि टनांचा माल, बाजारांत येणाऱ्या सर्वसाधारण गिऱ्हाईकासाठीं तयार केला जातो तिचा मार्क्सनें अभ्यास केला आणि बाजारांत वस्तूंचें नित्याचें "विनिमय मूल्य" कसें ठरतें ?—म्हणजे उदाहरणार्थ, एक वार कापडाची किंमत एका टांचणीच्या किंमती पेक्षां कमी कां नसतें ?—या प्रश्नाचें उत्तर शोधून काढलें.

विनिमय मूल्य पैशांनीं मोजलें जातें; प्रत्येक वस्तुचें "मूल्य" अमुक अमुक रक्कमेइतकें असतें. परंतु भिन्न भिन्न वस्तुंच्या मूल्यांची पैशांच्या सहाय्यानें अगर प्रत्यक्ष अदलाबदलीनें तुलना करणें कसें शक्य होतें ? मार्क्सनें सांगितलें कीं, सर्व क्रय-वस्तुंत कांहींतरी सारखें-एकचं-( कॉमन ) असलें पाहिजे; तें कांहीं वस्तुंत अधिक प्रमाणावर तर कांहींत कमी प्रमाणावर असतें म्हणूनच त्यांची तुलना होऊं शकतें. हा समान घटक म्हणजे रंग, वजन अगर कोणताहि इतर गुणधर्म असूं शकणार नाहीं, किंवा वस्तुंचें "उपयुक्तता मूल्य" हि असूं शकणार नाहीं; कारण, उदाहरणार्थ, माणसाच्या जीवनाला अन्न मोटारीपेक्षां कितीतरी अधिक उपयोगी असतें पण त्याचें मूल्य मोटारीपेक्षां कितीतरी कमी असतें. सर्व वस्तुंत एकच घटक समान असतो आणि तो म्हणजे मानवी श्रम, कारण सर्व वस्तू मानवी श्रमांनींच निर्माण होतात. एखाद्या वस्तुच्या उत्पादनासाठीं अधिक मानवीं श्रम खर्च झालें असतील तर त्या वस्तुचें विनिमय मूल्य अधिक असतें; आणि श्रम म्हणजे श्रम-काळ. तेव्हां वस्तुच्या

निर्मितीसाठीं खर्ची पडलेल्या "श्रम-काळा" वरून तिचें विनिमय-मूल्य ठरत असतें.

परंतु हा श्रमकाळ प्रत्येक कामगाराला लागणारा वैयक्तिक वेळ नसतो. जेव्हां वस्तू बाजारांत विकल्या अगर विकत घेतल्या जातात तेव्हां त्यांच्या विनियम मूल्याच्या सरासरीवरून किंमती ठरतात; विशिष्ट वजनाच्यां व प्रकाराच्या एक वार कापडाचे विनिमय मूल्य, त्याच्या उत्पादनासाठीं लागलेल्या, "सामाजिक, सरासरी, श्रमकाळा" वरून ठरत असतें. म्हणजे सामाजिक दृष्टीनें आवश्यक लागणाऱ्या श्रमकाळा-वरून ठरत असतें

भांडवलदारी उत्पादन-पद्धतींत तयार होणाऱ्या वस्तूंचें विनिमय मूल्य सर्वसाधारणपणें या आधारावर ठरत असते; तेव्हां पुढचा प्रश्न असा कीं, प्रत्यक्ष्यपणें या वस्तू निर्माण करणाऱ्या कामगाराची मजूरी कशाच्या आधारावर ठरविली जाते ? याचें उत्तर शोधतांना मार्क्सनें हा प्रश्न उपस्थित केला कीं, भांडवलदारी उत्पादन पद्धतींत माणसाच्या श्रम करण्याच्या शक्तीचेंहि बाजारांत विनिमय मूल्य ठरत असतें; म्हणून दुसऱ्या वस्तू व ही श्रमशक्ति यांच्यांत समान घटक कोणता आहे !

हा समान घटक आणि इतर कोणत्याही वस्तूचें विनिमय मूल्य ठरविणारा घटक एकच आणि तो म्हणजे, त्याच्या उत्पादनासाठीं लागणारा 'श्रम-काळ'. तेव्हां, श्रमशक्ति निर्माण करण्यासाठीं लागलेला श्रम काळ, म्हणजे काय ? असा पुढचा प्रश्न उपस्थित होतो. त्याचें उत्तर कामगाराला जीवंत रहाण्यासाठीं लागणाऱ्या अन्न, वस्त्र आसरा व इतर वस्तूंच्या निर्मितींत खर्च होणारा "सामाजिक, आवश्यक, सरासरी श्रम-काळ", असें आहे. भांडवलदारी समाजांत कामगाराबरोबर कामगाराच्या कुटुंबाचाहि समावेश होतो. म्हणजे कामगार व त्याचें कुटुंब यांना जगण्यासाठीं आवश्यक असलेल्या वस्तूंच्या निर्मितासाठीं लागणाऱ्या श्रमकाळावरून, कामगाराच्या श्रमशक्तीचें विनिमय-मूल्य ठरत असतें; ही श्रमशक्ति कामगार मजूरी घेऊन भांडवलदाराला बाजारांत विकतो.

परंतु, आधुनिक भांडवलदारी समाजांत, कामगाराच्या श्रमशक्तीच्या निर्मितासाठीं, दिवसाचे चारच तास काम लागत असले तरी काम करण्याची कामगाराची शक्ति आठ, दहा तास अगर जास्त वेळ टिकूं शकते. आणि म्हणून, दिवसाच्या पहिल्या चार तासांच्या कामांत, त्याच्या श्रमांतून, त्याला मिळणाऱ्या मजूरी इतकें उत्पादन होतें; दिवसाच्या पुढील तासांत तो "वरकड मूल्य" निर्माण करतो आणि भांडवलदार तें गिळंकृत करतो. भांडवलदाराच्या नफ्याचा उगम हाच आहे—**स्वतःच्या जीवनसाठीं लागणाऱ्या मूल्यापेक्षां म्हणजे कामगाराला मिळणाऱ्या मजूरीपेक्षां, कामगार जें अधिक मूल्य निर्माण करतो, तोच भांडवलदाराचा नफा.**

मूल्य व वरकड मूल्य यासंबंधीच्या मार्क्सच्या शिकवणीचा हा सारांश अधिक काटेतोल पद्धतीनें सांगण्याची आवश्यकता आहे; परंतु जागेच्या अभावीं तें करतां येणार नाहीं; तरी काहीं कल्पनांसंबंधी थोडेसें स्पष्टीकरण देतां येईल.

**"विनिमय मूल्य"** या शब्द-प्रयोगाचा उपयोग सर्वत्र करण्यांत आलेला आहे; कारण सर्व विश्लेषण त्यावरच आधारलेलें आहे. परंतु प्रत्यक्ष जीवनांत वस्तू विनिमय-मूल्याइतक्याच किंमतीला विकल्या जातात असें नाहीं. भौतिक वस्तू काय किंवा मानवी श्रम शक्ति काय बाजारांत त्यांची किंमत कधीं त्यांच्या विनिमय मूल्यापेक्षां अधिक असते, तर कधीं कमी. एखाद्या वेळीं बाजारांत एखादें उत्पादन जादा प्रमाणांत आलेलें असले तर त्याची किंमत विनिमय मूल्यापेक्षां कितीतरी कमी होइल आणि ज्या वेळीं त्याची कमतरता असेल तेव्हां किंमत पुष्कळच अधिक होईल. किंमतींचा हा चढ-उतार "मागणी व पुरवठा" यांच्या परिस्थितीवर अवलंबून असतो, त्यामुळें अनेक भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञांना वाटते कीं, मागणी व पुरवठा यावरूनच वस्तूंच्या किंमती ठरत असतात. परंतु थोडा खोलवर विचार केला कीं दिसून येते की, मागणी व पुरवठा

यांत फरक झाल्यास किंमतींत जो चढउतार होतो तो एक निश्चित पातळीच्या भोंवती होतो. किंमतींची ती पातळी कोणती असेल, एक पेनी असेल कीं शंभर पौंड असेल, हें काहीं मागणी व पुरवठ्यावरून ठरत नाहीं; ती वस्तूच्या निर्मितीसाठीं खर्ची पडलेल्या श्रमकाळावरून ठरते.

श्रम शक्तीची प्रत्यक्ष किंमत, म्हणजे कामगारांना प्रत्यक्षपणें मिळणारी मजूरी, मागणी-पुरवठ्यानुसार कांहीं अंशीं वरखालीं होते; त्याचप्रमाणें इतरहि परिस्थितीचा तिच्यावर परिणाम होतो; उदाहरणार्थ, कामगार संघटनांच्या ताकदीचा तिच्यावर परिणाम होतो. तरीसुद्धां सर्वसाधारणपणें भांडवलदारी समाजांत, श्रमशक्तींची किंमत म्हणजे कामगारांची मजूरी—एक विशिष्ट पातळीभोंवतीच वरखालीं होत असतें; ती कामगारांच्या उपजिवीकेची पातळी असतें; हें विधान करतांना कामगारांच्या वेतनश्रेणी निरनिराळ्या असतात हें नजरेआड केलेले नाहीं, परंतु हें रहाणीमानहि पूर्वीच्या कामगार चळवळीतून मिळालेल्या यशामुळें ठरलेले असतें; जगण्यास आवश्यक असलेल्या किमान दर्ज्याच्या वरचा दर्ज्या कामगारांच्या कांहीं गटांनीं चळवळीच्या जोरावरच प्राप्त करून घेतलेला असतो.

निरनिराळ्या दर्ज्याच्या कामगारांची श्रमशक्ति मात्र एकसारखी नसतें; एखाद्या वाकबगार इंजिनिरच्या एका तासाच्या कामानें अकुशल कामगाराच्या एका तासाच्या कामापेक्षां निश्चितपणें अधिक मूल्य निर्माण होतें. मार्क्सनें दाखवून दिलें आहे कीं, वस्तू बाजारांत विकल्या जातात तेव्हां हे सर्व फरक लक्ष्यांत घेतले जातात; अधिक कुशल कामगाराचें एका तासांचें उत्पादन आणि अकुशल कामगाराचें एका तासाचे उत्पादन यांच्यांत एक निश्चित संबंध तेथें नोंदला जात असतो.

## मूल्यांतील हा फरक कसा निर्माण होतो ?

मार्क्सनें उत्तर दिलें आहे : कुशलता नैतिकदृष्ट्या अकुशलतेपेक्षां वरच्या दर्ज्याची असते, अशा तऱ्हेच्या कोणत्याहि "तात्त्विक" कल्पनेमुळें

हा फरक पडत नाहीं; कुशल कामगारांच्या श्रमशक्तीचें विनिमय मूल्य अकुशल कामगारांच्या श्रमशक्तीच्या विनिमय मूल्यांपेक्षां अधिक असते याचें कारण आणि आगबोटीची किंमत होडीपेक्षां जास्त असतें याचें कारण एकच; त्याला तयार करण्यासाठीं अधिक मानवी श्रम खर्ची पडलेले असतात. कुशल कामगाराच्या शिक्षणासाठीं आणि त्याचें कौशल्य टिकविण्यासाठीं आवश्यक असलेल्या रहाणीमानासाठीं अधिक श्रमकाळ लागत असतो.

दुसरा मुद्दा असा कीं, पूर्वीपेक्षां श्रमांचा ताण वाढविल्यास त्याचा परिणाम श्रमकाळ वाढविल्याप्रमाणेंच होतो; आठ तासांच्या ताण वाढविलेल्या श्रमांतून पूर्वीच्या श्रमांच्या दहा अगर बारा तासांच्या श्रमांइतकें मूल्य निर्माण होत असतें.

**नफ्याचा उगम दाखविण्यासाठीं मार्क्सनें केलेल्या या विश्लेषणाचें महत्त्व कशांत आहे? भांडवलदारी कालखंडांतील वर्ग-लढ्यांचें मर्म त्यांवरून समजून येतें, हें त्यांचें महत्त्व आहे.** प्रत्येक कारखान्यांत अगर गिरणींत कामगाराला मिळणारी मजूरी तो जितकें मूल्य निर्माण करतो तितकी नसते; ती निम्या उत्पादन-मूल्यांइतकी अगर त्यापेक्षां कमी असते. कामाच्या राहिलेल्या दिवसांत ( म्हणजे त्याला मिळणाऱ्या मजूरीइतके काम त्यानें केल्यानंतर ), त्यानें निर्माण केलेलें सर्व मूल्य मालक आपल्या खिशांत टाकीत असतो. आणि म्हणून कामगाराकडून काढून घेण्याची ही रक्कम वाढविण्याचा मालक सतत प्रयत्न करीत असतो. तो त्यासाठीं अनेक मार्गांचा अवलंब करतो; उदा. तो वेतन कपात लादतो; याचा अर्थ असा कीं कामगार स्वतःसाठीं पूर्वीपेक्षा कमी वेळ काम करतो आणि मालकासाठीं अधिक वेळ काम करतो. हाच परिणाम काम-वाढीमुळें किंवा "कामाचा वेग" अगर कामाचा ताण वाढविल्यामुळें होतो; कामगार आपल्यासाठीं कमी वेळ काम करूं लागतो आणि मालकासाठीं अधिक वेळ काम करूं लागतो. हाच परिणाम कामाचे तास वाढविल्यामुळें होतो; मालकासाठीं

होणाऱ्या कामाच्या तासांचें प्रमाण वाढूं लागतें. याच्या उलट कामगार, वेतनवाढ, कामाचा कमी तासांचा दिवस यांचीं मागणी करतो, कामवाढीला विरोध करतो आणि आपली परिस्थिती सुधारण्यासाठीं लढा देतो.

आणि म्हणून भांडवलदार व कामगार यांच्यांत सतत संघर्ष चालूं रहातो व जोंपर्यंत उत्पादनाची भांडवलदारी पद्धत अस्तित्त्वांत असतें तोंपर्यंत त्याचा शेवट होऊ शकत नाहीं. एखादा कामगार अगर कामगारांचा गट आणि त्यांचा मालक यांच्यांत लढ्याचा आरंभ होउन पुढें त्याचा विस्तार वाढत जातो. एका बाजूला कामगार संघटना, ( ट्रेड युनियन्स ) आणि दुसऱ्या बाजूला मालक-संघ, आपापल्या वर्गांचे मोठे विभाग एकमेकां विरुद्ध लढण्या साठीं उभे करतात. या वेळेपर्यंत कामगारांच्या राजकीय संघटनाहि निर्माण होतात आणि जशी जशी त्यांची वाढ होत जाते त्या प्रमाणांत ते सर्व औद्योगिक गटांना व जनतेच्या समुदायाना भांडवलदार वर्गाविरुद्ध लढण्यासाठीं तयार करतात. या लढ्यांचा उत्कर्षबिंदू म्हणजे क्रांति; भांडवलदार वर्गाच्या सत्तेचें उच्चाटन, आणि ज्या समाजांत कामगारांना दुसऱ्या वर्गासाठीं दिवसाच्या कांहीं भागांत काम करावें लागत नाहीं अशी उत्पादन पद्धती असलेल्या समाजाची स्थापना, असा या क्रांतिचा अर्थ असतो. या प्रश्नाची अधिक चर्चा पुढील प्रकरणांत केलेली आहे. इथें ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्याची आवश्यकता आहे कीं, **भांडवलदारी समाजांतील वर्गलढ्याचें कारण भांडवलदारी उत्पादनाची विशिष्ट पद्धत-हेंच आहे; या पद्धतींत दोन वर्गाचें हितसंबंध परस्पर-विरोधी असतात आणि उत्पादनांत त्यांचा परस्परांशीं सतत संघर्ष येत असतो.**

मजूरी व नफा यांचें विवरण केल्यानंतर आतां आपण भांडवलाबद्दल विचार करूं या. पहिली गोष्ट ही कीं उत्पादन करतांना कामगारांनी निर्माण केलेलें सर्वच्या सर्व वरकड मूल्य त्यांच्या मालकाजवळ रहात नाहीं. तो जणूं कांहीं एकप्रकारचा निधी असतो, त्यांतून भांडवलदारांचे

निरनिराळे गट आपापले हिस्से काढून घेत असतात; जमीनमालक खंड घेतो, बँक व्याज घेते, अडत्या "व्यापारी नफा" घेतो, आणि मग शिल्लक रहातो तो औद्योगिक भांडवलदाराचा नफा. या खुलाशामुळें, अर्थातच् पूर्वीच्या स्पष्टीकरणाला बाधा येत नाहीं; याचा अर्थ इतकाच कीं भांडवलदारांच्या निरनिराळया विभागांत, नफ्याच्या वाटणीसाठीं एक दुय्यम संघर्ष चालू असतो. मात्र कामगारांकडून अधिकाधिक काढून घेण्याबद्दल त्या सर्वांची पूर्णपणें एकवाक्यता असते.

## आंतां, भांडवल म्हणजे काय ?

यंत्रें, इमारती, कच्चा माल, जळण आणि उत्पादनासाठीं लागणारी इतर सर्व सामुग्री हे भांडवलाचें भौतिक प्रकार आहेत; उत्पादनासाठीं लागणाऱ्या मजूरीच्या पैशांचाहि त्यांत समावेश होतो.

परंतु, सर्वच यंत्रें, इमारती इत्यादि; किंबहुना पैसा म्हणजे सुद्धां भांडवल नव्हें. उदाहरणार्थ; आयर्लंडच्या पश्चिम किनाऱ्यावरील एखाद्या शेतकऱ्याचें रहातें घर, त्याभोंवतालचें लहानसे अंगण, त्याच्या जवळच्या गाई-कोंबड्या, एखादी होडी किंवा त्याच्या जवळ असलेला थोडासा पैसा सुद्धां—तो शेतकरी स्वतःच त्यांचा मालक असेल आणि इतर कोणाचा नसेल, तर त्याची मालमत्ता भांडवल नाहीं. सोविएत युनियनमधील शेतकरी आज असाच आहे. Surplus

( कोणच्याहि स्वरूपांतील ) मालमत्ता ज्यावेळीं वरकड मूल्य उत्पादन करण्यासाठीं वापरली जाते त्या वेळींच फक्त आर्थिक दृष्ट्या तिला भांडवल म्हणतात; त्याचा अर्थ असा कीं मालमत्तेचा उपयोग करून जेव्हां कामगारांना कामावर ठेवलें जाते आणि कामगार उत्पादन करीत असतांना वरकड मूल्य निर्माण करतात तेव्हांच त्या मालमत्तेला भांडवलाचें स्वरूप येतें.

## अशा भांडवलाचें उगमस्थान कोणतें ?

इतिहासाच्या अभ्यासकांना माहित आहे कीं, भांडवलाचा प्रारंभीचा संचय मुख्यतः उघड उघड लुटालूट करूनच झालेला आहे. साहसी

लोकांनीं अमेरिका, भारत व आफ्रिकेंतील सोनें, चांदी व इतर मूल्यवान धनसंपत्ति फार मोठ्या प्रमाणावर लुटली. परंतु लुटालूट करून भांडवल जमा करण्याचा हा केवळ एक मार्ग झाला. खुद्द ब्रिटनमध्यें "कुंपण कायद्या"च्या नांवाखालीं सामाजिक मालकीची अफाट जमीन भांडवलदारी शेतकऱ्यांच्या साठीं चोरण्यांत आली. आणि असें करतांन त्यांनी शेतकऱ्यांचें उपजीवकेचें साधन हिसकावून घेतलें आणि अशा रीतीनें त्यांना कामगार बनविलें; आतां त्याच्या जवळ नव्या मालकांच्या फायद्यासाठीं त्यांच्याच जवळून काढून घेतलेल्या जमिनीवर राबण्याखेरीज चरितार्थाचा दुसरा मार्ग उरला नाहीं. मार्क्सनें सांगितलें कीं : भांडवलाचा उगम ("प्राथमिक संचय") **असाच झाला; काटकसरी लोकांनीं आपल्या लहानशा मिळकतींतून "शिल्लक" टाकून भांडवल जमविल्याच्या दंतकथेचा मार्क्सनें** 'भांडवलांत" चांगलाच परामर्श घेतला आहे; त्यांतील एक उतारा पुढें दिला आहे :

'पुराणांत आदि-मानवाच्या पहिल्या मूळ पतनाला जें स्थान आहे तेंच अर्थशास्त्रांत या प्राथमिक धनसंचयाला आहे. आदमनें तें फळ खाल्ले आणि मानवजातीचा अधःपात झाला; ......तसेंच..........फार फार वर्षांपूर्वी पृथ्वीच्या पाठीवर दोन प्रकारची माणसें रहात होतीं; पहिल्या प्रकारचीं हुशार, कामसू व विशेषतः काटकसरी होती; आणि दुसऱ्या प्रकारचीं आळशी बदमाश व चैनींत पैशाची उधळपट्टी करणारी होती......अखेरीस पहिल्या प्रकारच्या शहाण्यांच्या जवळ पैसा सांठला आणि दुसऱ्या प्रकारच्या लोकांवर अशी पाळी आली कीं त्यांना स्वतःला विकून पोट जाळण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नाहीं. आणि या आदि कालांतील या मूळ पापांतूनच बहुसंख्य लोकांचें दारिद्र्य जन्माला आलें; त्यामुळेंच या राबणाऱ्यांना स्वतःला विकण्याखेरीज जगण्याचें साधन उरलेलें नाहीं; आणि अगदीं थोड्यां श्रीमंत लोकांनी जरी काम करण्याचें कधींच सोडून दिलें आहे तरी त्यांची संपत्तिमात्र सतत वाढत जात आहे."

[ भांडवल, खंड १ला, प्रक. २६ ]

परंतु प्राथमिक संचयाइतकींच भांडवलाची पातळी नंतर राहिलेली नाहीं; तें अफाट प्रमाणावर वाढलें आहे. प्रथम भांडवलाचा संचय प्रत्यक्ष्यपणें लुटालूट करुन झाला असला तरी त्यानंतर त्याच्यांत ही जी विलक्षण वाढ झाली आहे ती कशी झाली ?

मार्क्सनें उत्तर दिलें : अप्रत्यक्ष लुटालूटीनें, कामगारांना त्यांच्या जीवनाला लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाच्या काळापेक्षां अधिक काळ काम करायला लावून, त्या काळांतील मूल्य—"वरकड मूल्य—" भांडवलदार लुबाडून घेतात. या वरकड मूल्यांतील एक हिस्सा भांडवलदार स्वतःच्या उपभोगासाठीं वापरतो, शिल्लक राहिलेली संपत्ति नवें भांडवल म्हणून वापरलें जातें; म्हणजे तें तो आपल्या पहिल्या भांडवलांत मिळवितो; मग तो अधिक कामगारांना कामावर ठेवूं शकतो आणि उत्पादनाच्या नंतरच्या फेऱ्यांत अधिक वरकड मूल्याचा मालक बनतो; याचा अर्थ त्याचें भांडवल आणखी वाढतें—आणि असेंच अनंतापर्यंत चालूं रहातें.

किंबहुना असेंच अनंतापर्यंत चालूं राहिलें असतें पण रहात नाहीं, कारण इतर आर्थिक व सामाजिक नियमांचाहि प्रभाव पडावयास लागतो, भांडवलदारी उत्पादन पद्धतीमधून अनेक प्रकारचे अडथळे उत्पन्न होतात आणि ते त्या उत्पादनाच्या संथ विकासाला खीळ घालतात.

भांडवलाच्या विकासाला खीळ घालणारी आणि कित्येकदां आधीं सांठविलेल्या भांडवलाचा हिस्साहि धुळीला मिळविणारी आर्थिक अरिष्टें येतात. (कम्युनिष्ट जाहीरनाम्यांत) मार्क्सनें या अरिष्टासंबंधी म्हटलें आहे : "या आर्थिक आरिष्टांत अशी एक साथ येते कीं जी पूर्वीच्या काळीं अगदी असंभवनीयच वाटली असती—ती साथ म्हणजे अति-उत्पादनाची होय." सरंजामदारी समाजांत गव्हाचें पिक अमाप आलें तर सर्वांना पोटभर खायला मिळत असे; भांडवलदारी समाजांत गव्हाचें पिक फार आलें तर अनेक कामगारांना बेकारीमुळें भूकें मरण्याची

पाळी येते; कारण सर्व गहूं विकला जात नाहीं, त्यामुळें पुढच्या वर्षी कमी गव्हाची लागवड करायची असते, आणि म्हणून शेतावरच्या अनेक कामगारांना बेकार करण्यांत येते.

भांडवलशाहींतील आर्थिक अरिष्टें आतां सर्वांच्या परिचयाची झालेली आहेत. अति-उत्पादन झालें म्हणजे मग उत्पादनांत काट करण्यांत येते, त्यामुळें कामगार बेकार होतात; वेकार कामगार म्हणजे बाजारांत मालाची मागणी कमी होते. म्हणून मग आणखी कारखाने बंद पडतात; नवे कारखानें उघडले जात नाहींत आणि जुन्यांचाहि नाश केला जातो; इंगलंडच्या इशान्य किनाऱ्यावरील जहाजे बांधण्याचा गोद्या किंवा लँकेशायरच्या गिरण्यांत गहू व इतर पदार्थ जाळण्यांत येतात; त्याच वेळीं बेकारांच्या घरांत उपासमार व आजारीपणाचें थैमान चालू असते. असा हा मूर्खाचा बाजार चालू होतो, पण अखेरीस उत्पादनाचा साठा कमी होतो, पुन्हां उत्पादन सुरुं होतें, व्यापार वाढतो, पुन्हां रोजगार मिळूं लागतो, एक दोन वर्षे सर्वत्र तेजी येते, वाढत्या वैभवाचा आभास निर्माण होतो; आणि तितक्यांत पुन्हां अति-उत्पादनाची परिस्थिति निर्माण होते, अरिष्ट येतें आणि पुन्हां एकदां पूर्वीप्रमाणेंच हें चक्र फिरूं लागतें.

या अरिष्टांचें कारण काय? मार्क्स म्हणतो : भांडवलाचा प्रत्येक विभाग अधिकाधिक नफा कमाविण्यासाठीं उत्पादन वाढवितो, अधिक उत्पादन करून, अधिक विक्री करण्याचा प्रयत्न करतो. भांडवलदारी उत्पादनाचा हा नियम आहे कीं, ज्याच्या जवळ अधिक भांडवल तो अधिक उत्पादन करतो. पण त्याच बरोबर, अधिक भांडवल गुंतविलें गेलें कीं कमी कामगारांना कामावर घेतलें जातें; कामगारांच्या जागीं यंत्रें काम करुं लागतात, ( उद्योगधंद्यांत "रॅशनालायझेशन" सुरुं होतें ). याचा अर्थ असा कीं, अधिक भांडवल, अधिक उत्पादन पण कमी रोजगार व त्यामुळें मालाला मागणीहि कमी.

भांडवलाचा विस्तार आणि कामगारांकडून मालाच्या मागणीचा तुलनात्मक संकोच हेंच अरिष्टांचें प्रमुख कारण आहे. परंतु अरिष्ट कोणत्या क्षणीं येईल आणि कोणत्या तऱ्हेने येईल हें विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून रहाते. उदाहरणार्थ, १९५० पासून अमेरिकेंत शस्त्रास्त्राचें अफाट उत्पादन सुरूं झालें आहे--भांडवलदारी नित्याच्या उत्पादनापेक्षां सरकारी "मागणी" बरहुकूम होणारें हें उत्पादन निराळया स्वरुपाचें आहे, पण त्यामुळें आर्थिक अरिष्ट स्थगित झालें आहें; तें लपविलें गेलें आहे.

याशिवाय, भांडवलशाहीच्या विकासांत आणखी एक महत्त्वाचा घटक असतो, तो म्हणजे चढाओढ. भांडवलदारी पद्धतींतील प्रत्येक घटकांप्रमाणें याचेहि दुहेरी परिणाम घडत असतात. आपला माल अधिक प्रमाणावर विकण्यासाठीं चढाओढ करणारे भांडवलदार उत्पादनाची किंमत कमी करण्यासाठीं धडपडूं लागतात; प्रथम ते कामगारांवर, प्रत्यक्ष अगर [ काम-वाढ, रॅशनालायझेशन इत्यादि ] अप्रत्यक्ष प्रकारची, वेतन-कपात लादतात. त्याच वेळीं ज्यांना पुरेसें भांडवल मिळालेलें असतें असें भांडवलदार तांत्रिक सुधारणा घडवून आणतात, कमी कामगारांना कामावर ठेवतात आणि अशा रीतीनें एकूण वेतनांत घट करून बाजारांतील मालाच्या मागणींतहि घट निर्माण करतात.

तरीदेखील, तांत्रिक सुधारणा करणाऱ्या कारखान्यांना काहीं काळपर्यंत नफ्याचा दर खूप अधिक मिळतो—त्यानंतर चढाओढ करणारे सर्वच भांडवलदार त्याचें अनुकरण करतात आणि सर्वकडेच कामगारांची बेकारी वाढते. परंतु सर्वच भांडवलदार या चढाओढींत टिकूं शकत नाहींत. कारखाने जसे मोठे होत जातात तसे त्यांच्या आधुनिकीकरणासाठीं भांडवलहि फार मोठ्या प्रमाणावर लागू लागतें आणि अशा कंपन्या फार थोड्या असतात. बाकीच्या सर्व कंपन्या चढाओढींत हार खातात, त्यांचे कारखाने मोठे भांडवलदार हातांत घेतात अगर ते बंद पडतात,

"अशा रीतीनें, उद्योगधंद्यांच्या प्रत्येक शाखेतील स्वतंत्र कंपन्यांची [कारखाने वगैरे चालविणाऱ्या भांडवलदारांच्या गटांची] संख्या कमी कमी होत जाते; मोठे मोठे ट्रस्ट स्थापन होतात आणि ते त्या-त्या धंद्यावर प्रभुत्व गाजवूं लागतात. अशा रीतीनें भांडवलदारी चढाओढींतून त्याचा अगदीं विरोधी पर्याय—भांडवलदारी मक्तेदारी निर्माण होते. भांडवलदारी मक्तेदारीचें खास व विशिष्ट गुणधर्म असतात; त्यांची चर्चा पुढील प्रकरणात करण्यांत येईल.

........

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलमत.
अनुक्रम 33960 वि: 
क्रमांक 9396 नों दि 90145

प्रकरण ४ थें

# साम्राज्यवादी अवस्थेंतील भांडवलशाही

सर्वसाधारणपणें साम्राज्यशाही म्हणजे राज्य-विस्ताराचें धोरण, साम्राज्य निर्माण करण्यासाठीं मागासलेले देश जिंकणें. आपल्या देशाचें निशाण जगाच्या विस्तृत भागावर फडकलेलें पहाण्याच्या इच्छेंत या धोरणाचें सर्वांना दर्शन होतें, परंतु त्याला आर्थिक कारणेंहि असतात, हेंहि सर्वांना माहित आहे. उदा. पुष्कळदां असें म्हटलें जातें कीं, बाजारपेठा, कच्चा माल व अन्नधान्य, अगर वाढत्या लोकसंख्येसाठीं वसतिस्थान मिळविण्यासाठीं साम्राज्यें स्थापन केलीं जातात.

परंतु, परदेशांतहि बाजारपेठ मिळवितां येते, आणि परदेशांतून कच्चा माल व अन्नधान्येंहि आणतां येतात. वसतिस्थानाच्या गरजेबद्दल सांगायचें तर भांडवलशाहीमुळेंच लोकांना स्वदेश सोडून परदेशांत जाऊन रहाण्याची आवश्यकता निर्माण होते. तेव्हां साम्राज्यवाढीचे खरे हेतू या पेक्षां दुसरे असले पाहिजेत; ते कोणते ?

साम्राज्यशाहीबद्दलचें पहिलें मार्क्सवादी विश्लेषण **लेनिननें** केलें. लेनिननें दाखवून दिलें कीं, **साम्राज्यशाहीचें खास वैशिष्ट्य** म्हणजे **भांडवलाची निर्यात.** जिंकलेल्या देशांत भांडवल पाठविणें, आणि तेथें तयार माल पाठविणें, यांत फरक आहे. भांडवल निर्यातीची ही नवी प्रथा खुद्द भांडवलशाहीमध्यें घडून आलेल्या बदलांचें प्रतीक असतें. आणि म्हणून लेनिननें साम्राज्यशाहीचें वर्णन **भांडवलशाहीची एक खास अवस्था** असें केलें. ज्या वेळीं प्रमुख भांडवलदारी देशांत

मक्तेदारी फार मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित झालेली असते त्या वेळची ही अवस्था असते.

औद्योगिक भांडवलशाहीच्या प्रारंभीच्या दिवसांत कारखाने, खाणी, वगैरे उद्योगधंदे फारच लहान होते. ते एखाद्या कुटुंबाच्या अगर भागीदारांच्या लहानशा गटाच्या मालकीचे असत; हे गट लहान प्रमाणावर लागणारें भांडवल उभे करूं शकत असत. परंतु पुढें होत गेलेल्या तांत्रिक प्रगतीबरोबर अधिक भांडवलाची आवश्यकता निर्माण झाली; त्या वेळीं हस्तोद्योगांना कारखानदारी उत्पादनानें मारून काढल्यामुळें बाजारपेठ वाढत होती आणि त्यामुळें उद्योगधंदे जोरानें विस्तार पावत गेले. रेल्वे व आगबोटी चालू होतांच प्रथम लोखंडाचे व पुढें पोलादाचे उद्योग वाढूं लागले आणि कारखाने अधिकाधिक मोठे बनू लागले. धंदा कोणताहि असला तरी कारखाना जितका मोठा तितका आर्थिक दृष्ट्या तो अधिक फायद्याचा, अधिक नफा देणारा ठरूं लागला आणि जोरानें वाढूं लागला. लहान कारखाने चढाओढींत मागें पडून बंद झाले अगर मोठ्या प्रतिस्पर्ध्यांनी ते स्वतःच्या ताब्यांत घेतले.

अशा रीतीनें, दुहेरी क्रिया सुरू झाली; उत्पादन मोठ्मोठ्या कारखान्यांतून केंद्रित होऊं लागलें आणि त्याच वेळीं त्यांच्या मालकांची संख्या लहान, लहान होऊं लागली. मार्क्सच्या कालांतहि, उत्पादन व भांडवल केंद्रित होण्याची ही क्रिया मार्क्सच्या नजरेस आली होती आणि त्यानें तिच्याकडे लक्ष्य दिलें होतें. त्याने इशारा दिला होता कीं, याचा अपरिहार्य परिणाम म्हणून भांडवलदारांत चालणाऱ्या स्वतंत्र चढाओढीच्या जागीं मक्तेदारी येईल आणि त्यामुळें भांडवलदारी उत्पादनांत अंतर्भूत असलेल्या अडचणी फारच तीव्र स्वरूप धारण करतील.

२० व्या शतकाच्या प्रारंभीं, अर्थशास्त्रावरील लेखकांनीं ( आणि विशेषतः ब्रिटन-मध्यें जे० ए० हॉबसन यांनीं ) अनेक धंद्यांतून प्रस्थापित झालेल्या मक्तेदारीची नोंद घेण्यास सुरवात केली. १९१५ सालीं, पहिलें

महायुद्ध चालू असतानां, लेनिननें **"भांडवलशाहीची सर्वांत विकसित अवस्था-साम्राज्यशाही"** हा ग्रंथ लिहिला; त्यांत त्यानें मक्तेदारींसंबंधीं ज्ञात असलेली विविध माहिती एकत्रित मांडली आणि मक्तेदीरीच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वरूपासंबंधीचे निष्कर्ष काढले. मार्क्सच्या मृत्यूनंतर झालेल्या घडामोडींचा अभ्यास करून त्यानें मार्क्सनें काढलेल्या निष्कर्षांचा अधिक विस्तार व विकास केला. सन् १९०० पर्यंत प्रस्थापित झालेल्या भांडवलशाहीच्या सर्वांत उच्च, म्हणजे साम्राज्यशाही अवस्थेची, **पांच प्रमुख आर्थिक वैशिष्ट्यें** लेनिननें पुढीलप्रमाणें सांगितली :

**(१) उत्पादन व भांडवल यांचें इतके केंद्रिकरण झालें आहें कीं, त्यांतून मक्तेदाऱ्या निर्माण झाल्या आहेत** आणि आर्थिक जीवनावर त्यांचा फार मोठा परिणाम झाला आहे.

प्रत्येक भांडवलदारी देशांत ही अवस्था निर्माण झाली आहे. पण जर्मनींत व अमेरिकेंत ती सर्वांत अधिक प्रमाणांत अस्तित्वांत आली आहे. इतर सर्वकडेहि ह्या क्रियेचा विकास चालू आहे; ( ब्रिटनमधील प्रत्येकी १० कोटींवर भांडवल असलेलीं इंपेरियल केमिकल इंडस्ट्रिज व युनिलिव्हर ही त्याचीं उदाहरणें आहेत ). या कालांत प्रत्येक धंद्यांतील व्यापाराचा मोठा भाग कोणत्यातरी मूठभर मोठ्या कंपन्यांच्या ताब्यांत असतो; त्यांचेंहि एकमेकांशीं किंमती ठरविण्याबद्दल वगैरे करार झालेले असतात आणि अशा रतीनें प्रत्येक धंद्यांत एक संयुक्तमक्तेदारी निर्माण होते.

**(२) बँक भांडवल औद्योगिक भांडवलांत मिसळून गेलें असून, प्रत्येक देशांत "भांडवल पुरवठा" करणाऱ्यांची म्हणजे बँक भांडवलवाल्यांचो, अधिसत्ता स्थापन झाली आहे.** आणि देशाच्या जीवनाच्या सर्व नाड्या त्यांच्या हातांत केंद्रित झाल्या आहेत.

या मुद्याचें थांडेसें विवेचन करू या. सुरवातीच्या काळांत औद्योगिक भांडवलदार बँकवाल्यापेक्षां निराळें होते; त्या वेळीं बँकमालक भांडवलदारांना धंद्यासाठी पैसे देत असत आणि त्यांना मिळणाऱ्या फायद्याचा

हिस्सा व्याजाच्या रूपानें घेत असले तरी उद्योगधंद्यात त्यांचें प्रत्यक्ष हितसंबंध गुंतलेले नसत; परंतु पुढें जेव्हां उद्योगधंद्याच्या वाढीबरोबर शेअर्स देऊन कंपन्या निघूं लागल्या, तेव्हां बँकमालक कंपन्यांचे शेअर्स घेऊन उद्योगधंद्यांत शिरले; आणि श्रीमंत भांडवलदार बँकांचे शेअर्स घेऊं लागले. अशा प्रकारें अत्यंत श्रीमंत भांडवलदार-बँकमालक, उद्योगपति बनले. एकाच गटाच्या हातांत नफा व औद्योगिक सूत्रें गेल्यामुळें त्यांचे सामर्थ्य भरमसाट वाढले, ( विशेषतः ब्रिटनमध्यें तर बडे जमीनदार सुद्धां या गटांत विलीन झाले ). ज्या धंद्यांशी बँकेचा असा संबंध असेल त्याला कर्ज देऊन, आणि ज्या कंपन्या त्यांच्या धंद्याकडून माल घेतील त्यांनाच कर्ज देण्याचा करार करून, बँका आपल्या गटांतील धंद्यांना मदत करूं लागल्या. अशा रीतीनें या बँक-भांडवलदारांची संपत्ति वेगानें वाढली आणि एका मागून दुसऱ्या धंद्यावर त्यांनीं आपलें नियंत्रण बसविलें; आणि मग त्यांच्या आवाजाला सत्ताधाऱ्यांकडूनहि मान मिळूं लागला हें सांगायलाच नको.

आतां अनेक उद्योगधंद्यांतील डायरेक्टर्स बँकेचेहि डायरेक्टर्स असतात, यावरून बँक-भांडवलाच्या या मिलनावर स्पष्ट प्रकाश पडतो. पण याचा अर्थ असा नसतो कीं, या सर्व उद्योगधंद्यांची मालकी बँकाच्याकडे असते. मुद्दा हा आहे कीं, बँकेच्या क्षेत्रांतील बडी धेंडेंच उद्योगधंद्याच्या व व्यापाराच्या क्षेत्रांतील बड्या व्यक्ती बनतात; उदा. पुन्हा ब्रिटीश भांडवलशाहीमध्यें ज्यांच्या भांडवलाचा प्रवाह प्रभावी आहे त्या श्रीमंत व्यक्तींचा गट हा एकच आहे. "बड़े पांच" या नांवाने पुढें प्रसिद्धीस आलेले बँक-डायरेक्टर्स आणि बँक ऑफ इंग्लंड यांच्याकडे १८७० मध्यें, १५७ इतर कंपन्यांची डायरेक्टरशिप होती; १९१३ मध्यें ती ३२९ ची कंपन्यांची झाली आणि १९३९ मध्यें त्यांच्या हातीं ११५० कंपन्यांची डायरेक्टर-शिप आली. या आकड्यांचें खरे महत्व लक्ष्यांत येण्यासाठीं ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, त्यांच्यांत युनिलिव्हर व इंपेरियल केमिकल इंडस्ट्रिज अशा बड्या

कंपन्यांचाहि समावेश होता आणि या कंपन्यांनींच खुद्द अनेक लहान लहान कंपन्या गिळंकृत केलेल्या होत्या.

**( ३ ) या काळांत वस्तूंच्या निर्यातीखेरीज, परदेशांत भांडवलाच्या निर्यातीचें महत्व वाढूं लागलें.**

भांडवलशाहीच्या प्रारंभीच्या काळांत, ब्रिटनमधून इतर देशांत कापड व इतर तयार जिन्नस निर्यात होत असत, आणि त्यांच्या बदली ब्रिटनमध्यें तेथील स्थानिक जिन्नस आयात होत; अशा रीतीनें तयार मालाच्या बदली ब्रिटन आपल्या उद्योगधंद्याना लागणारा कच्चा माल व अन्न मिळवित असे. परंतु पुढें ५० वर्षांनंतर बँक-भांडवलाचा प्रभाव वाढूं लागला; आणि त्याचे लक्ष्य व्यापाराऐवजीं भांडवल निर्यात करून त्यावर वर्षानुवर्षे व्याज मिळविण्यावर केन्द्रित झालें. परदेशी सरकारांना अगर कंपन्यांना भांडवल देऊन, अगर ब्रिटिश अधिपत्याखालील देशांत रेल्वे, गोद्या व खाणी काढून, त्यासाठी लागणाऱ्या मालाचा पुरवठा, त्यांच्याशीं संबंधित असलेल्या कंपन्यांकडून बँका करवूं लागल्या. अशा रीतींनें बँक-भांडवलाच्या दोन्ही शाखा अमाप नफा मिळवूं लागल्या. आणि त्यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या मालाची नाकेबंदी केली.

**( ४ ) भांडवलदारांचे आंतरराष्ट्रीय मक्तेदारी संघ स्थापन झाले आणि त्यांनीं आपापसांत जगाची वांटणी करून घेतली.**

हा प्रकार पोलाद, तेल इत्यादि धंद्यांतून प्रामुख्यानें अस्तित्वांत आला; निरनिराळया देशांतील मक्तेदारी गटांनीं एकूण परदेशी व्यापारांतील आपापले हिस्से ठरवून घेतले, पुष्कळदां बाजारपेठांची वाटणी करण्यांत आली व किंमतीहि निश्चित ठरविण्यांत आल्या (अशा स्वरूपाच्या त्यांच्या करारांच्या मर्यादांची चर्चा पुढें करण्यांत आलेली आहे ).

**( ५ ) बड्या भांडवलदारांनी जगाचा भौगोलिक प्रदेशहि संपूर्णपणें वांटून घेतला.** ( १८७६ मध्यें आफ्रिकेचा फक्त ११ टक्के भाग युरोपियन राष्ट्रांच्या ताब्यांत होता; १९०० मध्यें ९० टक्के भाग त्यांनी पादाक्रांत केला ).

अशा रीतीनें जगाची वाटणी झाल्यामुळें नवे नवे प्रदेश जिंकून घेणें त्यानंतर सोपे राहिले नाहीं. सर्वांत श्रीमंत सत्तांनाहि आपल्या अधिकाराखालील प्रदेश वाढवितांना दुसऱ्या बँक-भांडवलदारांच्या प्रदेशावर आक्रमण करावें लागूं लागले; म्हणजे जगाची फेरवाटणी करण्यासाठीं मोठी युद्धें करूनच सत्ता वाढविता येऊं लागली.

याबाबतींत लेनिननें मांडलेला एक विशेष महत्वाचा मुद्दा आजच्या राजकारणावर पूर्ण प्रकाश टाकणारा आहे. लेनिननें सांगितले कीं, वसाहती जिंकून साम्राज्य-विस्तार करतांनाच, युरोपांतील स्वतंत्र राष्ट्रें जिंकून आपल्या काबूंत आणण्यासाठींहि या बड्या बँक-भांडवलदारांची धडपड चालू झाली. नाझींच्या कालखंडांत जर्मन भांडवलदारांनीं याच मार्गांचा अवलंब केल्याचें आपल्याला माहीतच आहे.

लेनिननें काढलेल्या या निष्कर्षांतील सत्य आतां अनुभवानें सिद्ध झालेलें आहे; त्याच्या आधारावर त्यानें पुढें सांगितले कीं, **भांडवलशाहीच्या साम्राज्यवादी अवस्थेंत, अधिक तीव्र स्वरूपाचीं आर्थिक अरिष्टें आणि जागतिक प्रमाणावरील युद्धें यांचा उद्भव होतो; त्याच बरोबर कामगार क्रांत्या, व साम्राज्यवादी शोषणाविरुद्ध वसाहत व निम-वसाहत राष्ट्रांतील जनतेचे उठावहि तीव्र स्वरूप धारण करतात.**

या काळांत, मूठभर लोकांच्या लहान गटांच्या हातांत, भांडवल केंद्रित होतांच. या गटांनीं राज्य यंत्रणेवरहि अधिकाधिक ताबा मिळविला; आणि त्यामुळें निरनिराळ्या राष्ट्रांच्या सरकारांचीं धोरणें या गटांच्या हिताशीं निगडीत झाली. या मुळेंच, प्रत्येक देशांतील बँक भांडवलदार गटाला परकीय प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध व्यापारी नियंत्रणें वगैरे बसविणें आणि अखेरीस युद्ध पुकारून त्यांना दाबण्याचा प्रयत्न करणें शक्य होऊं लागलें.

निरनिराळ्या प्रतिस्पर्धी गटांत हा संघर्ष अपरिहार्यपणें कां निर्माण

होतो ? त्यांना परस्परांत जगाची वांटणी करून घेण्याचा करार करणें कां जमत नाहीं ? या प्रश्नाचेंहि लेनिननें उत्तर दिलें आहे.

निरनिराळ्या देशांतील मक्तेदारी गट जगाच्या बाजारपेठा वाटून घेण्यासाठीं करार करतात, असें वर म्हटलें आहे; त्यावरून चढाओढ संपूर्णपणें नष्ट होऊन, भांडवलदाराचे आंतरराष्ट्रीय हितसंबंध कायमचे एक होतात, असा आभास निर्माण होण्याचा संभव आहे. परंतु लेनिननें अशीं उदाहरणें देऊन दाखवून दिले कीं, असे आंतरराष्ट्रीय करार कधींच फार काळ टिकत नाहींत. समजा, १९०५ सालीं इंग्लंड, अमेरिका, जर्मनी व फ्रान्स या राष्ट्रांनी जगाच्या बाजारपेठांच्या वाटणी-संबंधी करार केला; तर हा करार त्या वेळच्या उत्पादनाच्या परिस्थितीला अनुरूप असा असेल. परंतु विषम विकास हा भांडवलदारी उत्पादनाचा एक प्रमुख नियम आहे, त्यामुळें यापैकीं कोणत्याहि राष्ट्रांतील गटाचें उत्पादन सामर्थ्य वाढले कीं, पहिला करार त्यांना असमाधानकारक वाटू लागतो आणि ते तो धुडकावून लावतात. इतर गटांनीं जर ताबडतोब माघार घेतली नाहीं तर पुन्हां बाजारपेठेसाठीं तीव्र संघर्ष सुरू होतो. सर्व करारांचा शेवट वास्तविक असाच होतो; अशा रीतीनें आंतरराष्ट्रीय करार हे निरनिराळ्या देशांतील बँक-भांडवलदारांत सतत चालणाऱ्या व्यापारी युद्धांतील मध्यंतरीचे शांतता-तह ठरतात.

परंतु केवळ आर्थिक युद्धानें प्रश्न सुटत नाहीं. म्हणून, बँक-भांडवलदार प्रथम आपापल्या राष्ट्रांतील राज्यसत्तेच्या सहायानें, प्रतिस्पर्ध्याविरुद्ध व्यापारी जकाती बसवतात, आयातीवर नियंत्रण बसवून घेतात, दुसऱ्या देशाबरोबर स्वहिताचे करार घडवून आणण्याचे प्रयत्न करतात आणि अखेरीस युद्धाची तयारी करतात, अशा युद्धांत विजय मिळाल्यास आपल्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध तात्पुरता वरचढपणा प्रस्थापित करण्याची त्यांची मनीशा असते.

प्रत्येक देशांतील बँक-भांडवलदारांच्या हातांत संपत्तीचे केंद्रीकरण होतांच त्याचा परिणाम जागतिक स्वरूपाची युद्धें, बड्या राष्ट्रांमध्यें

घनघोर लढाया निर्माण होण्यांत झाला; अशारीतीनें उत्पादनाचें व भांडवलांचे केन्द्रिकरण या दिसायला पूर्णपणें आर्थिक स्वरूपाच्या प्रक्रियेंतून सामाजिकदृष्टया महाभयंकर अशा युद्धापर्यंत आपण ओढले गेलों आहोंत

युद्धाकडे पाहण्याचा मार्क्सवादी दृष्टीकोन शुद्ध शांततावादी नाहीं. स्वांतत्र्यासाठीं लढणाऱ्या परतंत्रराष्ट्रांतील जनतेला चिरडणाऱ्या साम्राज्यवादी युद्धांचामार्क्सवाद धिक्कार करतो, या युद्धांना मार्क्सवाद अन्याययुद्ध समजतो, कारण त्यामुळे मानवजातीच्या प्रगतींत बांध घातला जात असतो, परंतु साम्राज्यवाद्यांचा प्रतिकार करण्यासाठीं अगर स्वातंत्र्यासाठों चालणाऱ्या जनतेच्या युद्धांना मार्क्सवाद न्याय्य समजतो, त्याच प्रमाणें शोषण नष्ट करण्यासाठीं चालणाऱ्या देशांतर्गत मानवी युद्धांनाहि तो पाठिंबा देतो, कारण शोषण करणाऱ्यांचा पराभव करून जनतेनें विजय मिळविला तरच युद्धें कायमची बंद पाडण्यांसारखी परिस्थिति उत्पन्न होउं शकते, असे मार्क्सवादाचे म्हणणें आहे.

एखाद्या साम्राज्यवादी देशाच्या सरकारनें जर अन्यायाने युद्ध सुरूं केले असेल तर त्याला सर्वशक्तिनुसार विरोध करणें हें त्या देशांतील कामगार वर्गाचे कर्तव्य आहे; आणि कामगार-वर्गाची ताकत चांगली संघटित व भक्कम असेल तर त्यानें या काळांत आपल्या सरकारचा पराभव करून सत्ता हातांत घेतली पाहिजे, युद्धाचा शेवट केला पाहिजे, आणि समाजवादाकडे जाण्याचा मार्ग मोकळा केला पाहिजे.

प्रतिस्पर्धी साम्राज्यवादी गटांमधील चढाओढीमुळे सर्वसाधारण परिस्थिति अधिकच विकोपाला जाते. तांत्रिक रॅशनलायझेशनच्या-म्हणजे कामगारानां बेकार करणाऱ्या यंत्राच्या साहायानें फार मोठ्या प्रमाणावर काम वाढ केली जाते. उत्पादन खर्च कमी कारण्यासाठीं बाजारपेठ मिळविण्यासाठी किंवा टिकविण्यासाठीं पगार-कपात लादण्यांत येते. शेती मालाला मक्तेदार भांडवलदार गट कमी किंमती ठरवून देतात. युद्धाच्या तयारीसाठीं व शस्त्रास्त्रांच्या निर्मितीसाठीं समाज कल्याण

कार्यावरील खर्च एकदम कमी करण्यांत येतो. **अधिक तीव्र व अधिक दीर्घ मुदतीची आर्थिक अरिष्टें येउं लागतात.** या कारणांमुळे वर्ग-लढे व वसाहती राष्ट्रांचें स्वातंत्र्यलढेहि अधिक तीव्र होतात; **भांडवल-शाहीची साम्राज्यवादी अवस्था हा केवळ युद्धांचाच नव्हे तर क्रांत्यांचाहि कालखंड ठरतो.**

साम्राज्यशाहीच्या अवस्थेंतील भांडवलशाहीचें आणखी एक वैशिष्ट्य लेनिननें शोधून काढलें, तें हें कीं, या काळांत **साम्राज्यशाही राष्ट्रांतील मक्तेदारी गट मागासलेल्या राष्ट्रांकडून सर्वसामान्य सरासरी नफ्यापेक्षा अतिरिक्त नफा; अधिक नफा, मिळवूं लागतात.** त्याला कारणें अनेक आहेत : पहिले हें कीं वसाहत देश मागासलेले असल्या-मुळें तेथील राहणीमान कमी दर्ज्याचे असते, त्यामुळें कमी वेतनावर तेथील कामगारांना राबवून घेता येतें. दुसरें कारण हें कीं, साम्राज्य-वादी सत्तांनी व भांडवलदारांनीं त्यांना अत्यंत निघृणपणानें बिकट अवस्थेंत दडपलेले असते, त्यामुळें त्यांच्यात तावडतोब प्रतिकाराची ताकत नसते. तिसरें कारण हें कीं, यंत्रोत्पन्न माल व हस्तोत्पन्न माल यांचा विनिमय होतांना यंत्रोत्पन्न मालाला अमर्यादपणें अधिक नफा मिळवितां येतो. (येथे केवळ पैशाच्या दृष्टीनें विचार केलेला नाहीं, तर विनिमय होणाऱ्या प्रत्यक्ष वस्तूंच्या दृष्टीनें विचार अभिप्रेत आहे.) कारण कोणत्याहि उत्पादनाचें विनिमय मूल्य त्याच्या उत्पादनाला लागलेल्या सामाजिक आवश्यक श्रमावरून ठरत असते. म्हणून ब्रिटन-मध्यें १ वार कापड तयार करण्याला जितकें सामाजिक आवश्यक श्रम खर्ची पडतात त्याच्या १० अगर १२ पट श्रम भागावर तितकेंच कापड तयार करायला लागतात. म्हणजे हिंदुस्थानांतील १ वार कापडाची व ब्रिटनमधील १ वार कापडाची अदलाबदल केल्यास ब्रिटिश मालाला त्याच्या उत्पादनाच्या किंमतीपेक्षां किती तरी अधिक किंमत मिळतें. या किंमतीच्या बदलीं भारतांतील कच्चा माल अगर इतर वस्तूं ब्रिटनमध्यें नेल्या जातात तेव्हां त्या १ वार कापडाच्या किंमती-पेक्षा कितीतरी

अधिक किंमतीच्या असतात. दोन्हीं देशांत यंत्रें असलीं तरी तंत्र ज्ञानामुळें असाच फरक पडतो आणि परिणामीं पुढारलेल्या देशाला मोठ्या प्रमाणावर नफा मिळतो. असा हा ज्यादा नफा केवळ कापडावरच नव्हे तर सर्व पदार्थांवर मिळत राहतो आणि बँक-भांडवलदार गट अमाप नफा कमवतात; उदा.—एलरमननें ६० कोटी रूपयांची व यूलनें साडेतीस कोटी रुपयांची मालमत्ता या नफ्यांतूनच जमविली आहे.

**वसाहत देशांतून उकळल्या जाणाऱ्या या अतिरिक्त नफ्याचा कामगार चळवळींशीं एक खास संबंध आहे. मार्क्सने प्रथमच** निदर्शनास आणले होतें कीं, ब्रिटिश भांडवलदारांनी प्रथम जगभर यंत्रोत्पन्न माल विकल्या मुळें मिळविलेल्या कोट्यावधि रूपयांच्या संपत्तीमधून कामगार वर्गाच्या एका विभागाच्या, कुशल व तंत्रविशारद कामगारांच्या, मागण्या त्यांना पुरवता आल्या. त्यामुळें इतर देशांच्या मानानें ब्रिटनमधील इंजिनिअर्स व कुशल कापड कामगारांना खूपच अधिक वेतन मिळू लागलें; या परिस्थितींत वसाहतीच्या पिळवणूकींत आपलेंहि हित आहे असे ते मानूं लागले. लेनिननें दाखवून दिलें कीं, कोणतंहि राष्ट्र साम्राज्यवादीं झाले कीं त्याच्या बाबतींत हीच घटना घडत असते. सवलती असलेले कामगारांचे विभाग, विशेषतः त्यांचे पुढारी "संधिसाधू" बनूं लागतात, म्हणजे बहुसंख्य कामगारांची परिस्थिति नजरेआड करून ते आपल्या विभागाच्या हितासाठीं भांडवलदारांबरोबर करार करू लागतात. साम्राज्यशाही अवस्थेची वाढ होऊं लागली तशीं ही प्रवृत्ति वाढू लागली. त्यामुळें कामगार व साम्राज्यवादी चळवळीचे पुढारी विभाग त्यांच्या देशाच्या बँक-भांडवलदार गटाच्या साम्राज्यवादी हितसंबंधाशीं पूर्णपणें एकरूप होऊन गेले. पहिल्या महायुद्धाच्या काळांत ( फक्त रशियांतील बोल्शेविकच "मार्क्सवादी" राहिले बाकी ) युरोपांतील सर्वकडील अधिकृत कामगार चळवळी आपापल्या देशांच्या साम्राज्यवाद्यांच्या बरोबर युद्धांत सामील झाल्या आणि भांडवलदारांचा पराभव करून सत्ता हातांत घेण्याची युद्धामुळें निर्माण झालेली संधी त्यांनी वाया घालविली.

सत्ताधारी वर्गाबरोबर स्वहित संलग्न करण्याच्या ह्या अनेक देशांतील कामगार चळवळीच्या पुढाऱ्यांच्या "संधिसाधू" दृष्टिकोनामुळें १९१४–१८ च्या पहिल्या महायुद्धानंतर मार्क्सवादाप्रमाणें चालणाऱ्या आणि कामगार चळवळीला मार्क्सवादा-कडे ओढण्यासाठी कार्य करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करणें आवश्यक झालें.

**या साम्राज्यशाही अवस्थेंत वसाहत देशांतील स्वातंत्र्यलढे अधिक तीव्र व विस्तृत होतात.** वसाहत देशाचे पारतंत्र्य व तेथे झालेला भांडवलाचा शिरकाव यामुळें तेथील उत्पादनाच्या जुन्या पद्धति नष्ट होतात आणि त्यामुळें हजारों लोकांच्या उपजीविकेचा आधार उखडला जातो. लँकेशायरच्या कापडाच्या चढाओढीनें भारतांतील कोष्टी मारला गेला; आणि कारागिरांना परत शेतीवर जाण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नाहीं, त्यामुळें शेतीवर जगणाऱ्याची संख्या भलतीच वाढली. त्याचप्रमाणें साम्राज्यशाही व्यवस्थेंत जनतेवरचे करांचे बोजेहि असह्य होण्यांइतकें वाढतात; कारण भांडवलावरील नफा, आणि साम्राज्य सत्तेच्या लष्करी व मुलकी नोकरशाहीचा खर्च, याच उत्पन्नांतून वजा होत राहतो; अशारीतीनें शेतकऱ्यांवर दुहेरी शोषण लादलें जाते आणि त्यांच्या मालाच्या किंमती साम्राज्यवादीमक्तेदार सर्वांत खालच्या पातळीवर आणून ठेवतात. याचे पर्यवसान दारिद्र्य व उपासमारीचें राज्य जनतेवर लादण्यांत होते आणि ठिकठिकाणीं शेतकऱ्यांचें उठाव होऊं लागतात. शहरांतून औद्योगिक उत्पादन अत्यंत भयानक परिस्थितींत होत असते; कामगार संघटनांत अडथळे आणण्यांत येतात, शक्य असेल तेथें त्या दडपल्या जातात, मध्यम वर्ग-विशेषतः "बुद्धी-जीवी" मध्यवर्ग साम्राज्य सत्तेच्या बंधनांचा तिरस्कार करूं लागतो. उगवत्या देशीं भांडवलदारांच्या प्रगतिशील खांचखळगे त्यांनां समजून येतात. अशा रितीनें स्वातंत्र्यासाठीं व्यापक संग्राम सुरू होतो. अशाच क्रमानें प्रत्येक वसाहत देशांत निरनिराळया परिस्थितींत घडामोडी होत राहतात.

भांडवलशाही शोषणामधून अपरिहार्यपणें असेच लढे निर्माण होणार आणि साम्राज्यवादी गटांच्या पराभवानंतर त्यांचा शेवट होणार, हें मार्क्सवादी दृष्टिकोनाच्या लोकांना पक्के ठाऊक असते, आणि म्हणून साम्राज्यवादी देशांतील बडे भांडवलदार हे आपले व वसाहती जनतेचे एकच शत्रू आहेत हें ते ओळखतात.

बड्या राष्ट्रांतील बँक-भांडवलदारी गटांतील संघर्षाच्या परिपाकांतून निर्माण झालेल्या पहिल्या महायुद्धापासून **भांडवलशाहीवरील सार्वत्रिक अरिष्टाला प्रारंभ झाला.** १९१७ मध्यें लेनिन व स्तालिनच्या पुढाकाराखालीं रशियांतील बोल्शेविक पार्टीनें भांडवलदार जमीनदारांची सत्ता उलथून पाडली आणि इतिहासांतील पहिल्या समाजवादी राज्याच्या उभारणीस आरंभ केला. त्या वेळेपासून, जगाची दोन भागांत विभागणी झाली; त्यांतील समाजवादी विभागाचें सामर्थ्य व प्रभाव दिवसे दिवस वाढत जात आहे आणि साम्राज्यशाही अवस्थेतील भांडवलदारी विभागांतील अंतर्विरोधामुळें भांडवलदारी समाजव्यवस्थेचा राजकीय व आर्थिक पाया ढासळत चालला आहें.

.........

प्रकरण ५ वें

# वर्ग-संघर्ष आणि राज्यसत्ता

दुसऱ्या प्रकरणांत वर्ग-संघर्षाबद्दलचा मार्क्सचा सिद्धांत स्पष्ट करण्यांत आला आहे. ज्या उत्पादन पद्धतींतून समाजाची दोन वर्गामध्यें विभागणी होते तिच्यांतून वर्ग-संघर्षाचा उगम होतो; त्यांतील एक वर्ग ( म्हणजे गुलाम, भूदास व कामगार ) प्रत्यक्षपणें उत्पादन करतो आणि ( गुलामांचा मालक, भूस्वामी व भांडवलदार यांचा ) दुसरा वर्ग उत्पादनाचें कार्य न करतां त्यांतील एका हिश्याचा उपभोग घेतो. प्रत्येक कालखंडात या दोन वर्गाखेरीज आणखीहि इतर वर्ग असतात. मागासलेल्या ( वसाहत अगर निम-वसाहत ) देशांत आजहि सरंजामदारी जमीनदार व शेतकरी असतात—ते जवळजवळ भूदासासारखेच असतात, आणि त्यांच्याच जोडीला ( परकीय भांडवलदारांशिवाय ) उगवता देशी भांडवलदार वर्ग आणि मोठा होत जाणारा कामगार वर्ग असतो.

या वर्गांत चालणाऱ्या संघर्षामुळें समाजांत पुढच्या पातळीवरचें उत्पादन सुरु होण्यांस मदत होते. यशस्वी क्रांति नंतर वरच्या पातळीवरचा उत्पादन प्रकार अस्तित्वांत येतो अगर त्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होतो. क्रॉमवेलच्या क्रांतीनंतर आणि १६८९ च्या "गौरवशाली क्रांतीनंतर" ब्रिटन मध्यें भांडवलशाहीच्या विकासाचा मार्ग खुला झाला. फ्रांन्समध्यें ही १७८९ च्या महान क्रांतीनंतर आणि त्यानंतरच्या इतर क्रांत्यानीं हीच कामगिरी पार पाडली. परंतु अशा सर्वसाधारण पद्धतीनें वस्तुस्थितीचें वर्णन करून मार्क्सचें समाधान झालें नाही; त्यानें त्याच्या काळांतील लढ्यांचा खोलवर अभ्यास, वर्गावर्गामध्यें चालणाऱ्या संघर्षाचे नियम शोधून काढण्याच्या हेतूनें केला.

याचा अर्थ त्यानें लढ्याचें तांत्रिक बारकावे शोधून काढलें असा नाहीं मार्क्सचें असे म्हणणें होते कीं, सामाजिक विकासाच्या आकलनासाठी नव्या उत्पादन-प्रकाराचा विकास करणाऱ्या क्रांतीमधील वर्ग शक्तींचें विश्लेषण होणें आवश्यक असतें; युरोपांतील अनेक देशांत १८४८ मध्यें जे उठाव झाले त्यांची छाननी करून मार्क्सनें त्यांची कांही सर्वसाधारण वैशिष्ट्यें शोधून काढली.

कांतीमध्यें दिसून येणारी हीं **सर्वसाधारण वैशिष्ट्यें ( अगर नियम ) काय असतात ?** पहिला हा कीं, **नव्या उत्पादन पद्धतींत सत्तेवर येऊं पाहणाऱ्या वर्गाकडेच नेहमीं क्रांतीचें नेतृत्व असते. परंतु वर्ग एकटा क्रांती करीत नाहीं.** उदाहरणार्थ :—१७८९ च्या महान् फ्रेंच क्रांतीमध्यें उगवत्या भांडवलदार वर्गाच्या जोडीला सरंजामदारी समाजांतील उत्पादक असलेला शेतकरी, लहान व्यापारी, स्वतंत्र कारागिर आणि भविष्यकाळांतील कामगार वर्गाचे पूर्वजही होते. जुन्या जमान्याच्या सत्ताधारी वर्गाविरुद्ध जनतेच्या या वर्व विभांगांनी, त्यांचे एकमेकांचे हितसंबंध निरनिराळे असतांहि, क्रांतीच्या लढ्यांत भाग घेतला; कारण जुनीं राजवट म्हणजे दडपशाही आणि जीवनाची बिकट व अधिकाधिक बिकट होत जाणारी परिस्थिति हें त्यांना समजून चुकलें होते.

अनेक युरोपियन देशांत या नंतरच्या काळांत झालेल्या सरंजामदारी राजेशाही उखडून टाकून, भांडवलदारी उत्पादनाचा मार्ग मोकळा करणाऱ्या क्रांत्यामध्येंहि असाच प्रकार घडला. पूर्वीच्या राज्यकर्त्या विरुद्ध जनतेचे इतर सर्व विभाग संघटित झालें. आणि प्रारंभीच्या काळांत नेहमीच क्रांतींचे पुढारीपण नव्या सत्ताधारी वर्गाकडे, म्हणजे उगवत्या भांडवलदारी वर्गाकडे होतें. क्रांतीच्या क्रमांत, विशेषतः ज्या ठिकाणी कामगार वर्गानें विकासाची विशिष्ट अवस्था गांठलेली होती तेथें, नवे दोस्तीचे संबंध जोडले गेले. स्वहितासाठी लढ्यांत उतरलेले कामगारांचे विभाग क्रांतीनंतर आपल्या मागण्या पुढे मांडू लागले, परंतु नवा सत्ताधारी भांडवलदार वर्ग त्या पूर्ण करण्यास तयार नव्हता. अशा

परिस्थितींत कामगार वर्ग आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठीं झगडूं लागला. आणि भांडवलदार वर्गानें कामगारा विरुद्ध मदत मिळविण्या-साठीं अधिक प्रतिगामी वर्गाबरोबर संगनमत केलें. क्रॉमवेलच्या काळां-तही असेच्र कांहींसे घडले होते आणि फ्रांन्समध्यें १८४८ पर्यंत अनेकदां असे घडत राहिले.

१८४८ च्या जूनमध्यें पॅरिसच्या कामगारांनी आपल्या नव्या हक्काचें संरक्षण करण्याचे प्रयत्न केले, परंतु फेब्रुआरी क्रांतीनंतर सत्तेवर आलेल्या नव्या भांडवलदारी सरकारनें त्यांचा पराभव केला. त्याच वेळीं मार्क्सनें भाकित केले कीं, पॅरिसच्या कामगारांची आतां इतकी तयारी झालेली आहे कीं, पुढील वेळी क्रांतीच्या काळांत भाडवलदारांच्या केवळ मागें राहण्याऐवजीं ते क्रांतीचा पुढाकार घेतील. आणि १८७१ मध्यें खरोखरीच तसें घडले; त्यावेळीं कामगारांच्या पुढाकाराखालीं पॅरिसमध्यें कम्युनची स्थापना झाली आणि १० आठवडे पॅरिस शहर त्यांच्या ताब्यांत राहिले. यावेळीं इतिहासांत प्रथमच कामगारांनी क्रांतीचे नेतृत्व केले, याचा अर्थ ते एकटे लढले, असा होत नाहीं,— ज्यांनी फ्रांन्सला युद्धाच्या खाईत ढकललें होते आणि जे कामगारांचा पराजय व भूकमार यांचा फायदा घेऊन स्वतः अधिक श्रीमंत होऊं पहात होते, असे मोठे जमीनदार व भांडवलदार यांच्या सरकारा विरुद्ध त्यांनीं उठाव केला होता. आणि हे मोठे जमीनदार व भांडवलदार यांच्या विरुद्ध कामगारांच्या जोडीनें, सरकारनें कर्ज व व्याज स्थगित करण्यास नकार देऊन ज्यांचा विनाश जवळ आणला होता असे छोटे दुकानदार, जर्मनीच्या युद्धांत जय झाल्यामुळें व सरकारनें जर्मनीबरो-बर केलेल्या करारामुळें चिडलेले सर्व वर्गातील देशभक्त, इतकेच नव्हे तर सरकार पुन्हा अनियंत्रित राजेशाहीची स्थापना करील अशी भीती वाटणारे भांडवलदारी लोकशाहीवादीहि लढ्यांत उभे राहिले. पॅरिसच्या कामगारांचा मुख्य कमकुवतपणा त्यांनी स्वतःच्या जोडीला शेतकऱ्या-नांहि लढ्यांत ओढले नाहीं, हाच राहिला.



फ्रेडरिक एंगेल्स ( १८२०-१८९५ )

तरीसुद्धां मुख्य मुद्दा यावरूनहि सिद्ध होतो तो हाच कीं, प्रस्थापित सत्ताधारी वर्गाचे उच्चाटन करून सत्तेवर येणाऱ्या वर्गाचीच क्रांति नसते, तर प्रस्थापित सत्ताधारी वर्गाकडून दडपल्या गेलेल्या व खुंटित झालेल्या सर्व वर्गांची क्रांती असते. क्रांतीच्या एका विशिष्ट अवस्थेंत सरंजामदारी राजेशाही व जमीनदार यांच्या विरुद्ध भांडवलदार क्रांतीचें नेतृत्व करतात, परंतु ज्यावेळी कामगार वर्ग पुढे येतो तेव्हां तो क्रांतीत सामील होणाऱ्या सर्व विभागांचे नेतृत्व करतो. याचाच अर्थ असा कीं, इतिहासानें दाखविलें आहे कीं प्रत्येक क्रांतीत समाजाचे विस्तृत विभाग मुख्य शत्रु विरुद्ध संयुक्त मोर्चा उभारतात. बडे जमीनदार व भांडवलदारांच्या विरुद्धच्या लढ्यांत अशा संयुक्त मोर्च्यांचे पुढारीपण कामगारवर्ग स्वीकारतो ही त्यांतील नवी बाब आहे.

उत्पादनांत असलेल्या विरोधी हितसंबंधामुळें वर्गावर्गांत सतत संघर्ष चालू असतो; नवीं उत्पादन पद्धति अस्तित्वांत आणणारा नवा वर्ग सत्तेवर येण्यांसाठीं होणारी क्रांति ही या संघर्षाचा सर्वांत उच्च बिंदू असतो. औद्योगिक भांडवलशाहीच्या प्राथमिक अवस्थेंत संघर्ष तुरळक प्रमाणावर चालतात, आणि तेहि बहुधा एखाद्या कारखान्यांतील वेतन व परिस्थिति याबद्दल असतात "परंतु उद्योग धंद्यांच्या विकासाबरोबर कामगारांची केवळ संख्याच वाढत नाहीं; त्यांचे केंद्रिकरणहि होते, त्यांचें सामर्थ्य वाढूं लागतें आणि या वाढणाऱ्या सामर्थ्याबद्दलची त्यांची जाणीवहि वाढूं लागते." ( मार्क्स-कम्युनिस्ट जाहिरनामा, १८४८ ) कामगार ट्रेड युनियन संघटन स्थापन करतात; त्यातून राष्ट्र-व्यापी आंदोलन चालविण्यास समर्थ असलेल्या बलाढ्य संघटना तयार होतात; गिऱ्हाईक या नात्यानें स्वतःच्या हिताचें रक्षण करण्यांसाठीं कामगार सहकारी संस्था स्थापन करतात. आणि त्यानंतरच्या अवस्थेंत ते आपला स्वतःचा राजकीय पक्ष उभारतात. हा पक्ष त्यांच्या वर्गहिताचे प्रतिनिधित्व करतो आणि त्यासाठीं लढतो.

### हा लढा कसा चालविला जातो ?

**मार्क्सनें म्हटल्याप्रमाणें, कामगार वर्गाच्या पक्षाचें ध्येय,**

**सत्ताधारी भांडवलदार वर्गाचे उच्चाटन करणारी क्रांति संघटित करण्याची तयारी करणें, आणि नव्या प्रकारच्या उत्पादन पद्धतीची, म्हणजे समाजवादाच्या संघटनेची उभारणी करणें, हें असते.**

या तयारीच्या कार्यांत कामगारवर्गाच्या सर्व तऱ्हेच्या संघटनांना, विशेषतः ट्रेड युनियन संघटनांना, मदत करणें आणि अशा रीतीनें कामगार वर्गाचे सामर्थ्य व "त्या सामर्थ्याची जाणीव" वाढविणें, याचा प्रामुख्यानें समावेश असतो. त्याच प्रमाणें वेतन-वाढ, कामाच्या परिस्थितींत सुधारणा, इत्यादि तावडतोबीच्या हितासाठी लढ्याच्या मैदानांत उतरणाऱ्या कामगार वर्गाच्या सर्व विभागांना मदत करणाऱ्या कार्याचाहि त्यांत अंतर्भाव असतो. या लढ्यांतून कामगारांना पुष्कळदां सवलती मिळतात, पण त्या कायम स्वरूपाच्या नसतात. **"लढ्याचें मुख्य यश तावडतोबीच्या परिणामांनी दिसत नसते, तें काम-गारांच्या वाढत्या एकजुटीत असते.** लढ्याच्या मैदानांत कामगारांना समूजन येते कीं त्यांचा एक वर्ग आहे आणि भांडवलदार वर्गाच्या विरुद्ध त्यांचें एकत्र हितसंबंध आहेत. ही त्यांची जाणीव अधिक वाढविण्यासाठीं कामगार वर्गाचा राजकीय पक्ष त्यांना मदत करतो आणि भांडवलदारी उत्पादन पद्धत चालू असेंपर्यंत वर्ग-संघर्ष सतत कां चालू राहतात हें त्यांना समजावून देतो, आर्थिक अरिष्टें व महायुद्धें यांच्या यमयातनांतून त्यावेळीं कामगार जात असतात; त्यांना हेंहि सांगण्यात येते कीं, संघर्ष व हालअपेष्टा यांचा शेवट उत्पादनाची पद्धत बदलून करतां येतो आणि हा बदल जबरदस्तीनें राजसत्ता उलथून पाडूनच करतां येतो.

इतिहासावरून मार्क्सनें काढलेल्या या सर्वसाधारण निष्कर्षांना त्याच्या राज्य संस्थेसंबंधीच्या अध्ययनानें दुजोरा मिळाला.

पुष्कळदां राज्यसंस्था म्हणजे पार्लमेंट असा अर्थ केला जातो. परंतु मार्क्सनें दाखवून दिलें कीं, इतिहासाच्या दाखल्यावरून प्रातिनिधिक संस्था व राज्यसंस्थेचा विकास यांच्यांत कोणताहि संबंध नाहीं; प्रथम-

पासूनच सर्व लोकांवर सत्ताधारी वर्गाच्या इच्छा लादण्याचे साधन, हेंच राज्यसंस्थेचे स्वरूप होतें. प्राथमिक समाजांत राज्यसंस्था नव्हती, परंतु जेव्हां मानवी समाजाची वर्गांत विभागणी झालीं, तेव्हां मालमत्ता वर्गाला स्वतःच्या नियंत्रणाखाली असलेल्या व स्वहिताचें रक्षण करणाऱ्या सशस्त्र फौजेशिवाय मालमत्ता टिकविणें अशक्य झाले. "प्रत्येक राज्यसंस्थेच्या हुकमतीखालीं अशा फौजा असतात; त्यांच्यांत केवळ शस्त्रधारी सैनिकांचाच नव्हें तर त्यांच्या मागे शेपटीप्रमाणें असलेल्या तुरूंगांचा व सर्व प्रकारच्या दडपशाहीच्या साधनांचा समावेश असतो" ("राज्यसंस्था व क्रांति"—ह्या पुस्तकांत, १ ल्या प्रकरणांत, लेनिननें दिलेलें एंगल्सचें अवतरण) सैन्य, तुरूंग व दडपशाहीच्यां यंत्रणेंचे कार्य प्रस्थापित व्यवस्था कायम टिकवून धरण्याचे असते; म्हणजे, प्रचलित वर्ग-भेद व वर्ग अधिकार सुरक्षित राखण्याचे असतें. राज्यसत्ता जणूं कांहीं समाजापासून अलग, वरच्या पातळीवर असते, "निपक्षपाती" असते, असा भास उत्पन्न करण्याचे प्रयत्न होतात, पण कायदा व सुव्यवस्था टिकविणें म्हणजेच प्रस्थापित समाज व्यवस्थाहि टिकविणें होय. समाज-पद्धती बदण्याचा जरा देखील प्रयत्न केला तरी तिचा दंडा उगारला जातो; "राजद्रोही" लोकांना पकडून तुरूंगात टाकण्यांत येते, "राजद्रोही" साहित्यावर बंदी घातली जाते. आणि हें सर्व वरकरणी शांततेच्या मार्गानें केले जाते, परंतु आंदोलनाला व्यापक स्वरूप प्राप्त होतांच पोलीस उघड उघड बळाचा उपयोग करतात आणि आवश्यक तर लष्करहि बोलाविलें जाते. **सत्ताधारी वर्गाच्या बाजूनें कार्य करणारी ही दडपशाहीची यंत्रणा हा राज्यसंस्थेचा एक आवश्यक भाग असतो.**

राज्यसंस्थेवर पार्लमेंटेचे अगर दुसऱ्या एखाद्या प्रातिनिधिक संस्थेचे नियंत्रण चालतें काय ? या प्रश्नाचा आतां विचार करूं या. जोपर्यंत देशाची प्रतिनिधिक संस्था सत्ताधारी वर्गाचेच प्रतिनिधित्व करते तो पर्यंत राज्ययंत्रणेंवर तिचे नियंत्रण असल्याचा भास होतो. परंतु ज्यावेळीं या संस्थेत सत्ताधारी वर्गाला पुरेसे प्रतिनिधित्व राहात नाहीं,

आणि सत्ताधारी वर्गाला त्रस्त बनविणारे कायदे ती पास करते, त्यावेळीं राज्ययंत्रणा तिच्या नियंत्रणाखालीं नसतें हें स्पष्ट होतें. सत्ताधारी वर्गापेक्षां निराळया वर्गाच्या हिताचें रक्षण करूं पाहणाऱ्या प्रतिनिधिक संस्थांची अनेक उदाहरणें इतिहासांत झाली आहेत. पण तशीच आवश्यकता उत्पन्न झाली तेव्हां त्या बरखास्त करण्यांत आल्या, अपार लष्कराच्या मदतीनें त्या उधळून लावण्यांत आल्या. ज्या वेळीं उगवत्या वर्गानें जुन्या पद्धतीवर विजय मिळविला उदा.—क्रॉमवेलच्या काळांतील ब्रिटननें—तो त्यानी केवळ पार्लमेंटमध्यें बहुमत मिळवून मिळविला नाहीं, तर राज्यसंस्थेविरुद्ध—म्हणजे जुन्या सत्ताधारी वर्गाच्या लष्करा विरुद्ध—आपलें नवें लष्कर उभारून मिळविला.

प्रतिनिधिक संस्थेत कांहीहि घडत असले तरी उत्पादन पद्धतींत वरचढ असलेला वर्ग राज्यसंस्थेवर अधिसत्ता चालवित असतो. आणि म्हणून सत्तांतर जर खरें व्हावयाचे असेल तर जुन्या राज्यनियंत्रणेंविरुद्ध बळाचा उपयोग करावाच लागतो, कारण समाज-पद्धति बदलूं इच्छिणाऱ्या नव्या वर्गाकार जुन्यां वर्गाची दमनशक्ति पूर्ण बलानें तुटून पडत असते.

मार्क्सच्या या विचारांना त्यानंतरच्या इतिहासांत घडलेल्या अनेक घटनांनी दुजोरा मिळाला आहे. सर्व तऱ्हेच्या प्रतिनिधिक संस्थांचा, लष्कराच्या जोरावर केलेला नाश, हा फॅसिझ्मचा आधार होता. त्या वेळी फॅसिस्ट संघटना ही नवी दमन शक्ति होती—राज्यसंस्थेची जुनीच शक्ति नव्हती, तरीसुद्धां वरील विवेचन तिला तंतोतंत लागूं झाल्याशिवाय राहात नाहीं. १९३६ मध्यें, स्पेनमध्यें, फ्रँकोनें केलेंल्या उठावावरून, सरकारी सशस्त्र दलांवर जनतेच्या घटनेंनुसार निवडलेल्या प्रातिनिधीक संस्थांचे किति थोडे नियंत्रण असतें, हें सिद्ध झालें आहे.

परंतु सत्ताधारी वर्गाला अशा रीतीनें, राज्ययंत्रणेवर आणि विशेषतः, वरवर पहातां घटनात्मक दृष्टीनें पार्लमेंटच्या नियंत्रणाखालीं असलेल्या सशस्त्रदलांवर नियंत्रण कसें चालवितां येतें ? या प्रश्नाचें

उत्तर राज्ययंत्रणेंच्या स्वरूपांतच सापडतें. प्रत्येक देशांत, सशस्त्र दल, न्याय खाते व राज्यकारभार खातें यांतील प्रमुख जगांवर सत्ताधारी वर्गातील व्यक्तिची अगर त्यांच्या विश्वासू नोकरांचींच नेमणूक होत असते. नेमणूकीच्या व नोकरांना बढती देण्यांच्या व्यवस्थेतून हें कार्य साधण्यांत येतें, **प्रातिनिधिक संस्था कितीहि लोकशाहीच्या तत्वानुसार चालल्या तरीं राज्य यंत्रणेंच्या पोलादी गाभ्यांत त्यांचा शिरकाव होत नाहीं.** जो पर्यंत कोणतेही गंभीर प्रश्न उपस्थित झालेले नसतात तो पर्यंत राज्ययंत्रणा व लोकशाही पद्धतीनें चालणारे पार्लमेंट या अलग अलग संघटना आहेत हें समजूनहि येत नाहीं. परंतु आपल्या समोर ब्रिटन मधीलच आणखी एक उदाहरण आहे; तें म्हणजे १९१४ मधील **कराघ बंडाचे,** त्या वेळीं आयर्लंडला स्वातंत्र्य देण्याच्या कायद्या विरूद्ध प्रतिगामी गट उठाव करण्याच्या धमक्या देत होतें, आणि त्यांच्या विरुद्ध उत्तर आयर्लंडमध्यें फौज पाठविण्यांत आली असतां सैन्याच्या अधिकाऱ्यांनी तो हुकूम मानण्यास नकार दिला.

तेव्हां, जुन्या सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधाची स्थिति कायम टिकविण्यासाठींच राज्ययंत्रणा काम करीत राहिली आणि तिच्या विरुद्ध नव्या वर्गानें पाऊल उचललें नाहीं तर, **राज्ययंत्रणेचा पराभव केल्याशिवाय उत्पादनाच्या नव्या पद्धतिचा जन्म होऊं शकत नाहीं**, मग **त्या काळांतील प्रातिनिधिक संस्था कशाहि असोत,**

आणि तरी सुद्धां लोकशाही संस्थाना मार्क्सनें नेहमीच पाठिंबा दिलेला आहे. ऐतिहासिक दृष्टया तें वर्गलढ्याचे एक रणक्षेत्र ठरले होते; पहिल्या चार्लस राजाच्या काळांत इंग्लंडमध्ये त्या उगवत्या भांडवलदार वर्गाचें व्यासपीठ बनल्या, त्यांच्या सहायानें एकीकडे भांडवलदार वर्गानें सवलती मिळविल्या आणि त्याचवेळीं सरंजामदारी राजेशाही विरुद्ध त्यानें जनमत जागृत केले. त्याच प्रमाणें काही सवलती मिळविण्यासाठीं, आणि त्याचवेळीं सत्ता काबीज करण्यांच्या निर्णायक लढ्यासाठीं कामगारांना तयार करण्यांचे एक साधन म्हणून, आजच्या

पार्लमेंटचाहि उपयोग होऊं शकतो. आणि म्हणून पार्लमेंटरी लोकशाही-साठीं चालणारा संघर्ष अर्थशून्य नसतो, तो संपूर्ण लढ्याचा एक भाग असतो. परंतु केवळ त्याच्याच सहायानें नवा समाज अस्तित्वांत येऊं शकत नाहीं इतकेंच ( या संदर्भात हेहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं, जनतेच्या विरोधाला अभिव्यक्ति मिळण्याची संधी या संस्थांमुळें मिळते, तो मिळूं नये म्हणूनच फॅसिझमखालीं सर्व पार्लमेंटरी संस्था नष्ट करण्यांत आल्या होत्या ).

आणि म्हणूनच गेल्या शतकांत, यूरोपांत जेथे जेथे हुकूमशाही प्रकाराच्या राजवटी होत्या तेथे तेथे त्यांच्या विरुद्ध पार्लमेंटरी लोकशाहीच्या लढ्याला मार्क्सनें अत्यंत महत्व दिलें; आणि जेथे हुकूमशाही राजवटींचा अंत झाला होता तेथे लोकशाहीं हक्कांच्या विस्ताराला त्यानें महत्त्व दिलें, परंतु त्यानें याही बाबीवर भर दिला की जो पर्यंत (प्रथम स्पष्टीकरण केलेल्या अर्थानें ) अनियंत्रित राजवट अगर भांडवलदार वर्ग अस्तित्वांत असतो तो पर्यंत लोकशाही सुरक्षितहि नसते, अगर परिणामकारकहि नसते. फक्त ज्या वेळीं कामगार वर्ग भांडवलदारी राज्ययंत्राचा पराजय करून तें मोडून तोडून टाकतो त्या वेळींच तो सत्ताधारी वर्गाच्या स्थानावर आरूढ होऊं शकतो आणि अशा रीतीनें "लोकशाहीचा लढा जिंकतात". दुसऱ्या शब्दांत लिहायचे म्हणजे, जनतेच्या मार्गात असलेला सशस्त्र कोट, म्हणजे भांडवलदारी राज्य-सत्तेची यंत्रणा, नष्ट केली जाते त्यावेळींच जनतेच्या इच्छेला खराखुरा मान मिळूं लागतो.

परंतु पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांच्या राज्ययंत्राचा पराजय करून तें मोडून तोडून टाकल्यानें कार्य समाप्त होत नाहीं. कामगार वर्गाला स्वतःच्या राज्ययंत्रणेंची स्थापना करावी लागते; आपल्या केंद्रिय, बलसंपन्न राज्य यंत्राची उभारणी करावी लागते, त्या वेळींच त्याला भांडवलदार वर्गाचा संपूर्ण पराभाव करतां येतो आणि अंतर्गत व बाह्य हल्ल्यांपासून स्वतःच्या नव्या पद्धतीच्या राज्याचें संरक्षण करतां येतें.

**त्याच प्रमाणें कामगार वर्गाला आपल्या स्वतःच्या पद्धतीचे सरकार स्थापन करावें लागतें; त्याचे स्वरूप भांडवलदारी समाजातील सरकारापेक्षां अनेक महत्वाच्या बाबतींत निराळे असतें कारण त्याचें ध्येय निराळें असते. १८७१ च्या पॅरिस कम्यूनच्या** अनुभवांनंतर मार्क्सचें त्या संबंधीचे विचार सुस्पष्ट झाले. त्यानें दाखवून दिल्याप्रमाणें पॅरिस कम्यूनची खास वैशिष्टें हीं होतीं की : "ते कार्य करणारें सरकार होतें, ती पार्लमेंटरी संस्था नव्हती; ती कायदे करणारी व ते अंमलात आणणारी एकत्र संस्था होती. कम्यूनच्या सभासदांची अदलाबदली मतदार कधींहि करूं शकत असत—कम्यूनच्या सभासदांपासून ते थेट लहानांतल्या लहान नोकरांपर्यंत सर्वांनां कामगारांच्या पगाराइतकाच पगार घेऊन काम करावें लागत असे. "मजिस्ट्रेट व न्यायाधिशांचीहि निवडणूक होत असे, आणि मतदार त्यांना केंव्हाही बदलूं शकत असत. पूर्वीच्या कायम लष्कराच्या जागीं—"राष्ट्रीय दलाची" योजना करण्यांत आलेली होती आणि त्यांत मुख्यत्वें-करून श्रमिक जनतेचा भरणा होता". या सर्व वैशिष्ट्यांचा उद्देश्य, राज्ययंत्रणा व दडपशाहीची यंत्रणा काममार वर्गाच्या अधिकांत अधिक जवळ आणण्याचा होता,—तोपर्यंत जुन्या यंत्रणेवर ताबा बसवून असलेल्या भांडवलदारी नियंत्रणाच्या जागीं कामगार वर्गाचे नियंत्रण बसविण्यांचा होता, नव्या प्रकारचें हें सरकार म्हणजेच "लोकशाहीचा लढा विजयी झाला" होता, याची साक्ष होतें, स्वतःच्या जीवनावर सामान्य जनतेनें मिळविलेल्या हक्कांचा तो एक विस्तारित भाग होता.

आणि तरीं सुद्धां पॅरिस कम्यूनचें वर्णन **एंगल्सनें, "ती कामगार वर्गाची सर्वाधिकारी सत्ता होती,"** या शब्दांनीं केले आहे. पॅरिस कम्यून मध्यें भांडवलशाही राजवटींतील पार्लमेंटरी लोकशाही पेक्षां जनतेच्या लोकशाही हक्कांचा अधिक विस्तार झालेला होता, हें मार्क्सचें विधान आणि, "तें कामगार वर्गाचे सर्वाधिकारी सरकार होतें;" हें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत
3328 दि: 1.29...

एंगल्सचे विधान यांत विसंगति आहे का ? नाहीं, ही एकाच राज्य-व्यवस्थेची दोन अंगे आहेत. बहुसंख्य जनतेच्या इच्छा-आकांक्षा प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं, एक नवें लोकशाही सरकार पॅरिस कम्यूनच्या रूपानें अस्तित्वांत आलें, परंतु जनतेची इच्छा अंमलांत आणतांना त्याला सर्वाधिकारित्व गाजवावें लागलें, पूर्वी हुकूमशाही गाजविणाऱ्या आणि कम्यूनच्या काळांत अर्थव्यवहारांतील मोडतोडी पासून, सशस्त्र प्रतिकारापर्यंत, सर्व मार्गांचा अवलंब करून, जनतेची इच्छा पायदळीं तुडविण्यासाठीं उठाव करणाऱ्या वर्गाविरूद्ध, अल्पसंख्य लोकांविरूद्ध, बलाचा व दडपशाहीचा वापर करावा लागला.

१८७१ मध्यें पॅरिस कम्यूनच्या अनुभवांवरून मार्क्स व एंगल्स यांनी काढलेल्या निष्कर्षांतील सत्य, त्यानंतरच्या कामगार क्रांत्यांच्या अनुभवांतहि प्रत्ययास आले आहे. रशियांतील १९०५ च्या क्रांतींत झार विरूद्धचा लढा पुढें चालविण्यांसाठीं कामगार वर्गाच्या संघटनांतील प्रतिनिधींची मंडळे ( सोविएत्स ) स्थापित करण्यांत आलीं. पुढें १९१७ च्या मार्च मधील क्रांती काळांतहि अशींच "सोविएत्स" ( म्हणजे मंडळें ) क्रांतीकारक परिस्थिति निर्माण होतांच स्थापन झालीं, पॅरिस कम्यूनच्या काळांनंतरच्या काळांत झालेल्या कामगार वर्गाचा महान विकास लक्षांत घेउन लेनिननें ओळखलें कीं, ह्या प्रतिनिधीं मंडळाच्या रूपानेंच नवें कामगार वर्गाचे सरकार राज्य करील. ह्या प्रतिनिधि मंडळांत प्रथम कारखान्यांतील कामगार प्रतिनिधित्व होते, पण क्रांतीच्या विस्ताराबरोबर त्यांत शेतकरी व सैनिक यांच्या प्रतिनिधीं-चाहि समावेश झाला होता. अशा रीतीनें हें प्रतिनिधि प्रत्यक्ष काम-गारांतील निवडण्यांत आलेले होते आणि मतदार, त्यांना कोणत्याहि क्षणीं परत बोलावू शकत असत. याचाच अर्थ असा कीं भांडवलदारी प्रभाव त्यांच्या निर्णयांवर पडू शकत नव्हता, आणि म्हणून कामगार वर्गाच्या खऱ्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यास तीं मंडळें समर्थ होतीं. त्या बरोबरच बळावर अधिष्टीत असलेल्या अधिसत्तेच्या मार्गानेंच

हें कार्य पार पाडतां येण्यांसारखें होतें, कारण नव्या सोवियत सत्तेला उलथून पाडून नष्ट करण्यांसाठीं हर तऱ्हेच्या साधनांचा उपयोग करणाऱ्या जुन्या सत्ताधारी वर्गाविरुद्ध अशा सत्तेची आवश्यकता होती.

कामगार वर्गाच्या सर्वाधिकारी सत्तेतील खऱ्या लोकशाहीच्या गाभ्याची कल्पनां मार्क्सनें १८४८ मध्यें लिहिलेल्या कम्युनिस्ट जाहिर-नाम्यांत पुढील प्रमाणें मांडली आहे. "इतिहासांतील पूर्वीची सर्व आंदोलनें अल्पसंख्यांकांची होती, अगर अल्पसंख्यांक लोकांच्या हितासाठीं करण्यांत आलेली होती, परंतु कामगार वर्गाची चळवळ ही मात्र विशाल बहुसंख्य जनतेची, आणि विशाल बहुसंख्य जनतेच्या हितासाठीं, चालणारी स्वतंत्र व जागृत चळवळ असते".

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होतें कीं, कामगार क्रांतीच्या विजया-बरोबर सर्व वर्ग-संघर्षांचा शेवट होतो असें मार्क्स मानीत नव्हता. उलट समाजाच्या इतिहासाला कलाटणी देणारी ती घटना असते. त्या नंतर प्रथमच सरकारी यंत्रणा पूर्वीप्रमाणें कामगार वर्गाच्या विरूद्ध न राहतां त्यांच्या हातात येते. १९१८ च्या जानेवारींत भरलेल्या सोविएतच्या कांग्रेस मध्यें लेनिननें हा मुद्दा स्पष्ट करतांना पुढील प्रसंग सांगितला. तो आगगाडीतून प्रवास करीत होता आणि आजूबाजुला काहीं बोलणे चालले होते, तें नीटसें त्याच्या लक्षांत येत नव्हतें. तित-क्यात एक माणूस त्याच्याकडे वळून म्हणाला, "ही म्हातारी बाई काय म्हणते समजलं कां ?" ती सांगत आहे, "आतां बंदूकवाल्या शिपायाला घाबरायचें कारण राहिलेलें नाहीं. एके दिवशीं मी जंगलात असतांना बंदुकवाला माणूस तेथे आला, पण नेहमीप्रमाणे मीं गोळा केलेला लाकूड फाटा माझ्या जवळून हिसकावून घेण्यांऐवजीं त्यानें मला आणखीं थोडी लाकडें गोळा करण्यांस मदत केली." तेंव्हा, दडपशा-हीची शक्ति सोवियत क्रांतीनंतर कामगारावर रोखलेली राहिली नाहीं, उलट त्यांना ती मदत करीत होती, ती फक्त जे कामगारांच्या प्रगतींत अडथळे आणतील त्यांच्या विरूद्धच वापरली जाणार होती".

आणि अर्थातच कामगार वर्गानें सत्ता हातांत घेतल्यानंतर असे लोक राहतातच. दुसऱ्या देशांतील सत्ताधाऱ्यांच्या मदतीनें जुना सत्ता-धारी वर्ग जमेल तितकी सशस्त्र ताकद जमा करतो आणि कामगार वर्गाच्या राज्यसत्तेविरुद्ध उघड युद्ध करू लागतो. १८७१ च्या पॅरिस कम्यूनचा पराभव असाच करण्यात आला. युद्धांत जिकलेल्या हजारों फ्रेंच कैद्यानां जर्मनीनें सोडून दिलें, आणि पॅरिस बाहेर व्हर्साय मध्यें असलेल्या प्रतिगाम्यांच्या फौजेंत त्यांची भरती झाली, त्या प्रतिगाम्यांच्या फौजेनें मग कम्यूनच्या हातातूनपॅरिस काढून घेतलें आणि कम्यूनला पाठिंबा देणाऱ्यांची अत्यंत क्रूर कत्तल केली. १९१८ ते १९२० च्या दरम्यांन रशियांतील सोवियत सरकारला फक्त झारच्या पाठिराख्यांच्या फौजेविरूद्ध नव्हे, तर ब्रिटन, फ्रांस व अमेरिकेसहित अनेक परकीय फौजांना तोंड द्यावे लागले. या वरून कामगार वर्गानें हातात सत्ता घेतल्यानंतर पुष्कळ काळपर्यंत, त्याला राज्यसत्ता टिकवून धरावी लागेल आणि तरच त्याला स्वतःचे संरक्षण करणें व समाजवादीपद्धतीचे उत्पादन सुरू करण्यांसाठीं तो पुनर्संघटना करीत असतो त्या काळांत स्वतःचें नियंत्रण बसविणें शक्य होईल, हा मार्क्सचा निष्कर्ष बरोबर असल्याचें इतिहासानें दाखवून दिलें आहे. १८७१ चे पॅरिस कम्यून आणि १९१७ त स्थापन झालेली रशियांतील सोविएत ची राज्यसत्ता हे कामगार वर्गाच्या राज्यसत्तेचे पहिले प्रकार होते. दुसऱ्या महा-युद्धाच्या अखेरीस कामगार चळवळीच्या वाढत्या ताकदीमुळें आणि सामर्थ्यशाली सोविएत सरकारच्या अस्तित्वामुळें कामगार वर्गाच्या सत्तेचा नवा प्रकार निर्माण झाला; त्याला "जनतेची लोकशाही" म्हणतात; त्याची चर्चा शेवटच्या प्रकरणांत येईल.

समाजवाद आणि समाजवादाची पुढची अवस्था साम्यवाद-याबद्द-लचे मार्क्सचे विचार पुढील प्रकरणांत दिलेले आहेत. परंतु वर्गसंघर्ष व राज्यसत्ता या विषयांवरील विवेचन पूर्ण करण्यापूर्वी मार्क्सवादी दृष्टीकोनांतून या सर्व प्रक्रियेचा शेवट कसा होईल हें सांगणे इष्ट होईल.

उत्पादनात विरोधी हितसंबंध असलेल्या वर्गात मानवी समाजाची विभागणी झाली. त्यानंतर वर्ग-संघर्ष आणि त्याबरोबर सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधाचें संरक्षण करणाऱ्या राज्ययंत्रणेचा जन्म झाला. **जोपर्यंत मानवी समाजाची वर्गामध्यें विभागणी कायम आहे, तोपर्यंत वर्ग-लढे व राज्यसंस्था इतिहासांत कायम राहतील;** परंतु वर्ग विभागणींचा अंत करण्यासाठीं. ज्या उत्पादन प्रकारांत दुसऱ्या वर्गाच्या श्रमावर जगणारा एकहि वर्ग अस्तित्वात नाहीं अशी उत्पादन पद्धति अस्तित्वात आणण्यांसाठीं, म्हणजे ज्यांत सर्वजण समाजासाठीं श्रम करतात; अशा वर्गविहीन समाजाच्या उभारणीं-साठीं कामगार वर्ग हातांत सत्ता घेतो; जेंव्हा जागतिक प्रमाणवर वर्गविहीन समाजाची स्थापना होईल त्या वेळी वर्ग-संघर्ष उरणार नाहीं. कारण त्या वेळीं निरनिराळें हितसंबंध असलेले वर्ग असणार नाहींत, आणि त्या वेळीं राज्यसंस्थेचीहि आवश्यकता राहणार नाहीं; कारण तेव्हां एका वर्गाच्या हितसंबंधाचे दुसऱ्या वर्गाकडून बळाच्या जोरावर रक्षण करण्यांचा प्रश्नच राहणार नाहीं. तेंव्हां मग राज्यसंस्था **"गळून, कोमेजून, नष्ट होऊन जाईल".** एका पाठोपाठ दुसऱ्या क्षेत्रांतून तिची आवश्यकता नाहींशी होत जाईल. आणि उत्पादन व त्याचे विभाजन संघटित करण्यांसाठीच केवळ मध्यवर्ती संघटनेंचीं गरज राहील एंगल्सनें म्हटल्या प्रमाणे, "त्यावेळीं व्यक्तिवर राज्य चालविणाऱ्या सरकारच्या जागीं, वस्तूंचीं व्यवस्था व उत्पादन क्रियेची दिशा ठरविणाऱ्या संघटना स्थापन होतील."

........

### प्रकरण ६ वें

# समाजवादी समाज

भांडवलशाही नंतर येणाऱ्या नव्या समाज व्यवस्थेचें सविस्तर वर्णन मार्क्सच्या कोणत्याहि लिखाणांत नाहीं. त्याच्या पूर्वीच्या लेखकांनी लिहलें त्या प्रमाणें "मनोराज्य वादी" लेखन मार्क्सनें कधींहि केले नाहीं, ज्यांतून सद्यःकालीन समाजांतील सर्व ठळक दोष नाहींसे झालेले आहेत, अशा समाजाचें चित्र मनोराज्यवाद्यांनीं रेखाटलें आणि त्याला "समाजवादी समाज" हें नांव दिलें, पण मार्क्सनें, समाजाच्या विकासाच्या सर्वसामान्य नियमांना धरूनच नव्या समाजाचें स्वरूप आणि त्याच्या विकसनाचा मार्ग यांचें विवेचन केलें हे मार्क्सच्या शास्त्रीय विचारसरणीचे वैशिष्ट्यआहे.

मार्क्सनें मांडलेला पहिला उल्लेखनोय व एका अर्थी अत्यंत सुस्पष्ट असलेला मुद्दा हा होता की नव्या संघटनेचा प्रारंभ कोऱ्या पाटीवर होणार नाहीं. आणि म्हणून स्वतःच्या पायावर विकास पावलेल्या समाज रचनेंचे चित्र रंगविणें निरर्थक आहे. सर्व चांगले गुण निवडून काढून त्यांचे मिश्रण बनवून समाजवादी समाजाच्या चित्राला रंग-चढविणें आणि असा समाज आपण शून्यांतून निर्माण करणार आहोंत असें समजणें चूक होईल. असा दृष्टीकोण पूर्णपणें अशास्त्रीय असून त्यांतून तयार होणारे विचार वस्तुस्थितीशीं न जुळणारे ठरण्याचा फारच संभव असतो.

याच्या उलट, पूर्वीच्या सर्व समाज प्रकारांप्रमाणेंच, प्रत्यक्ष समाजवादी समाजहि, त्याच्या पूर्वी जो समाज अस्तित्वांत होता त्याच्या

पायावर अस्तित्वांत येईल, "म्हणजे समाजवादी समाजपद्धती ही भांडवलदारी समाज पद्धतींतून बाहेर पडणारी समाज पद्धती असेल आणि म्हणून आर्थिक, नैतिक व वैचारिक या सर्व बाबतीत ज्या जुन्या समाजाच्या गर्भातून ती बाहेर येते, तिच्या जन्मखुणा तिच्यावर राहतीलच".

वस्तुतः, समाजवादाचा मार्ग भांडवलदारी समाजांतील प्रत्यक्ष विकासांतूनच तयार होतो आणि स्थित्यंतराचें स्वरूपहि तोच निदर्शित करतो. उत्पादन अधिकाधिक सामाजिक होत जाते, म्हणजे प्रत्येक वस्तू तयार करण्याच्या कामांत अधिकाधिक लोकांना भाग घ्यावा लागतो, कारखानें मोठमोठे होऊं लागतात, आणि कच्च्या मालांतून तयार जिन्नस बनविण्याच्या स्थित्यंतरांत उत्पादन क्रिया जनतेला फार मोठ्या प्रमाणावर एकत्रित आणते, आतां लोक एकमेकावर अधिकाधिक अवलंबून राहूं लागतात, भांडवलशाहीनें पुराणें सरंजामदारी स्थानिक संबंध व दुवे कधींच निखळून टाकलेले असतात परंतु त्यांच्या जागीं आतां भांडवलशाही फारच विस्तारित स्वरूपाचे संबंध निर्माण करते. तें इतकें व्यापक असतात कीं, सबंध समाजांत घडणाऱ्या घडामोडीवर प्रत्येक व्यक्ति कमीअधिक प्रमाणांत अवलंबून रहातो.

भांडवलदारी उत्पादनाची ही अखंड प्रवृत्ति आहे, तरीं सुद्धा वस्तुस्थिति ही आहे कीं समाजाच्या सहकार्यानें निर्माण झालेली संपत्ति एखाद्या व्यक्तिची, अगर गटाची मालमत्ता असते, सबंध समाजाची मालमत्ता नसते. म्हणून **समाजवादी समाजाच्या रचनेंतील पहिलें पाऊल समाजानें निर्माण केलेलें उत्पादन त्याला परत देणें हें असले पाहिजे. म्हणजे उत्पादनांची साधनें, खाणीं, यंत्रे, जहाजें इत्यादि सर्व—जी भांडवलदारी समाजांत खाजगीं मालकीचीं असतात तीं सर्व समाजाच्या मालकीची झाली पाहिजेत.**

परंतु उत्पादनांच्या साधनांचे हें सामायकीकरण सुद्धां जुन्या समाजाकडून नव्या समाजाला जो वारसा मिळतो त्याच्या आधारावरच होतें,

आणि त्यांतहि तुलनात्मकदृष्ट्या जे अवाढव्य कारखानें असतात तेंच या सदरांत येऊं शकतात; भांडवलदारी विकासानेंच त्यांना तसें तयार केलेले असते. अशा कारखान्यांतून मालक व उत्पादन क्रिया यांच्यांत पूर्ण फारकत झालेली असते, फक्त शेयर होल्डर्सना दिलें जाणारे डिव्हीडंड अगर व्याज हाच एक त्यांना जोडणारा दुवा असतो, कामगार व कारकून उत्पादनाचें सर्व कार्य पार पाडीत असतात, कारखान्याची मालकी सबंध समाजाकडे गेल्यानें त्यांच्या कामांत फरक होत नाहीं, आणि म्हणून, **मोठे कारखानें ताबडतोब समाजाला हातांत घेतां येतात.**

लहान उद्योगधंद्याच्या बाबतींत, विशेषतः जेथे स्वतः मालक उत्पादनाच्या कामांत महत्वाचे भाग घेतो त्यांच्या बाबतींत, परिस्थिति निराळी असते. अनेक लहान लहान व अलग अलग धंद्यांची व्यवस्था पाहणें कठीण असते आणि कामगार वर्गाच्या सरकारच्या सुरवातीच्या अव्यवस्थेत त्याला तें जवळ जवळ अशक्यच असतें. त्यांच्या बाबतींत महत्वाची गोष्ट ही असते कीं, शहरांतील हें छोटे उद्योग व खेड्यांतील लहान शेतें यांच्या केंद्रीय व्यवस्थेचा मार्ग तयार करावयाचा असतो.

या दिशेनें कोणती व्यावहारिक पावलें टाकतां येण्यासारखीं असतात ? सहकारी पद्धतीवर त्यांचे काम सुरू करण्याची सर्वसाधारण पद्धत असते, त्यांतून हें छोटे उत्पादक सामाजिक रीतीनें उत्पादन करावयास शिकतात आणि अनेक लहान लहान उत्पादक घटकांच्या जागीं एक मोठें उत्पादन केंद्र तयार होतें. अशा लहान मालकांबद्दल एंगल्सनें म्हटलें आहे : "त्यांचे वैयक्तिक उत्पांदन व वैयक्तिक मालकी यांचे रूपांतर सहकारी उत्पादन व सहकारी मालकींत करणें हें आपलें पहिले कार्य आहे, अर्थात हें कार्य सक्तीनें करावयाचें नसतें तर उदाहरण घालून देऊन आणि त्या कार्यासाठीं सामाजिक मदत देऊन करावयाचें असतें".

**समाजवादी समाजाची उभारणी करण्याच्या मार्क्सवादी दृष्टीकोनाचा मूल-भूत पाया हाच आहे—"सक्तीनें नव्हें तर**

उदाहरणांच्या साह्यानें व सामाजिक मदतीनें घडवून आणलेले स्थित्यंतर" अर्थात, पूर्वीच्या प्रकरणांत स्पष्ट केल्या-प्रमाणें, मार्क्सला हें माहित होतें कीं, आधीचा सत्ताधारी वर्ग, हा बदल निमूटपणें मान्य करीत नाहीं, आणि शक्य होईल त्या मार्गानें व त्या काळपर्यंत तो जुनीं समाजव्यवस्था पुन्हां प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत राहतो आणि म्हणूनच त्याच्या या हल्याचा प्रतिकार करून, त्याचा पराभव करण्यासाठीं कामगार वर्गाला बलशाही राज्यसंस्थेची आवश्यकता वाटतें. परंतु नव्या समाजाची उभारणी ही मुख्यतः **आर्थिक व सामाजिक प्रतिक्रिया असून ती बळाच्या वापरावर अवलंबून नाहीं.**

तेव्हां निष्कर्ष हा निघतो कीं, कामगार वर्गानें एकदां पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांची बंडाळी मोडून काढली आणि आपली सत्ता प्रस्थापित केली कीं तो बँका, रेल्वे हीं उद्योगधंद्याची व व्यापाराची "सर्वोच्या शिखरें" आणि बडे कारखानें समाजाच्या मालकीचे करतो, परंतु एक-दमच तो सर्व उत्पादन व व्यापार हातांत घेत नाहीं आणि म्हणूनच क्रांति झाल्याबरोबर प्रत्येकावर तो समाजवाद मान्य करण्याची सक्ती करीत नाहीं. आणि या कारणांसाठीं, **क्रांतीची** तावडतोबीची **फलश्रुति समाजवाद नसते व असू शकत नाहीं, तर समाजवादाच्या उभा-रणीसाठीं कामगार सत्तेची स्थापना ही असते.** आणि ही उभारणी पूर्ण होण्यास पुष्कळ वर्षे लागतात, म्हणजे सर्व उत्पादन व विभाजन समाजवादी पायावर प्रस्थापित करण्यास बराच काळ जावा लागले.

समाजवादीचें पहिले महत्वाचें अंग हें, कीं, समाजवादी पद्धतींत उत्पादनाच्या साधनांवरची खाजगी मालकी काढून टाकून तीं सर्व समाजाच्या उपयोगासाठीं वापरलीं जातात. परंतु मार्क्सवादाप्रमाणें हें कोणत्याहि नैतिक "तत्वावर" आधारलेलें नाहीं, उत्पादन साधनावर खाजगीं मालकी राहीली तर उत्पादनांत खंड पडतो, मानवांनें विकसित केलेल्या निर्माण शक्तीचा पूर्ण उपयोग होऊं शकत नाहीं म्हणून त्यांचे

सामाजिकरण करावयाचें असते, तेंव्हां उत्पादन साधनें सबंध समाजाच्या मालकींचीं झालीं कीं पुढचा मार्ग मोकळा होतो. आणि मग नंतर उत्पादन शक्तीच्या नियमबद्ध, व हेतूपूर्ण विकासाला प्रारंभ होतो.

१९१७ मध्यें रशिया होता त्याप्रमाणें औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या देशांसाठींच अशा विकासाची आवश्यता असते, असें समजणें चूक आहे. सत्ता हातांत आल्यानंतर, "कामगार वर्ग आपलें राजकीय सामर्थ्य.......एकूण उत्पादन शक्तीचीं शक्य तितक्या वेगांनें वाढ करण्यांसाठीं वापरेल", हें जेव्हां मार्क्सनें लिहिलें, तेव्हां तो औद्यौगिकदृष्टीनें पुढारलेल्या देशाबद्दलच विचार करीत होता. आणि ब्रिटनचें उदाहरण घेतल्यास, आज तेथील उत्पादन सामुग्री मार्क्सच्या काळापेक्षां अवाढव्य प्रमाणांत वाढली असली तरीं, आजच्या शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर तिचीं जी वाढ होण्यांची शक्यता आहे तिच्या तुलनेने ती कुंठितच आहे. भांडवलशाही समाज पद्धतीमुळे ती मागासलेली राहिली आहे; आर्थिक अरिष्टामुळें उत्पादनावर सतत बांध बसतो म्हणून ती खुंटित राहते; उत्पादन बाजारपेठेसाठीं असते आणि भांडवलशाहींत बाजारपेठ मर्यादित असते म्हणून उत्पादन मर्यादित राहते, मक्तेदारी तांत्रिक शोधावर ताबा मिळवितात आणि त्यांना सार्वत्रिक उपयोग होऊं देत नाहींत म्हणून उत्पादन पद्धति मांगासलेली राहते; उत्पादनांत योजनाबद्धता नसते म्हणून त्याची पद्धतशीर वाढ होऊं शकत नाहीं; भांडवलदारी पद्धतींत शेती मागासलेली व अलग राहते; भांडवलशाही अवाढव्य संपत्ति स्वदेश बांधवावर नियंत्रण ठेवण्यासाठीं, व वसाहत देशाविरुद्ध लढाया करण्यांसाठी युद्ध-सामुग्रीं तयार करिण्याकरितां वापरते; भांडवलशाहींत बौद्धिक व शारीरिक श्रमांची फारकत केली जाते, म्हणून संशोधनाला महापूर येत नाहीं; वर्ग-लढ्यांत अमाप श्रम-शक्ति खर्ची पडते; भांडवलशाहींत लक्षावधीं लोक बेकार राहतात.......या सर्वांच्या परिणामीं उत्पादनांत अडथळे, येतात ते मागासलेले राहते.

आणि म्हणून समाजवादी समाजानें कारखानें व खाणीं, विद्युत्-केंद्रें

व रेल्वे, शेती व मच्छीमारी या सर्वांची पुनर्संघटना करून त्यांना अद्यावत बनविलें पाहिजे.

असें केलें म्हणजे उत्पादनाची फारच वरची पातळी गाठतां येईल. हें करण्याचा उद्देश काय ? **जनतेचें राहणीमान वाढविणें हा उत्पादन वाढीचा उद्देश असतो.**

समाजवादाच्या विरोधकांचा आवडता मुद्दा हा असें कीं, ब्रिटनमध्यें होणारे सर्व उत्पादन सर्वांना सारखें वाटलें तरी कामगारांच्या राहणीमानांत फारसा फरक पडणारच नाहीं. हें अर्थातच खरें नाहीं. परंतु खरें असतें तरीं, चालू उत्पादनाची वाटणीं करण्याच्या कल्पनेचा मार्क्सवादी समाजवादाच्या विचारांशीं कांहींच संबंध नाहीं. समाजवादांत उत्पादनाची पातळीं कल्पनातीत उंचीवर चढेल हें मार्क्सचें भाकित होतें. १९१३ पेक्षां १९५० मध्यें सोवियत युनियनचें औद्योगिक उत्पादन १५ पटीनें जास्ती होतें, याचें कारण त्या काळचा झारचा रशिया मागासलेला होता हेंच केवळ नाहीं. उद्योगप्रधान ब्रिटनमध्यें देखील समाजवादाच्या काळांत अमर्याद वाढ करतां येण्यासारखी आहे आणि केली जाईल.

**उत्पादन पातळीमधील ही वाढ आणि त्यामुळें जनतेच्या जीवनमानांत होणारी वाढ यांच्या भौतिक पायावर जनतेचा बौद्धिक व सांस्कृतिक विकास झपाट्यानें होतो.** परंतु या सर्व विकासासाठीं योजनाबद्ध उत्पादन लागतें. भांडवलदारी समाजांत एखाद्या धंद्यांत जर जादा नफा कमाविण्याची शक्यता निर्माण झाली तरच कारखाना उघडला जातो व विशिष्ट तऱ्हेच्या वस्तू तयार केल्या जातात. अर्थात अधिक नफा म्हणजे त्यासाठीं जनतेची अधिक मागणी असते असेंहि नसतें. मागणीं अत्यंत श्रीमंत लोकांच्या अगदीं छोट्याशा विभागाची असू शकते, अगर एखाद्या असामान्य परिस्थितींत त्या वस्तूंच्या किंमती एकाएकीं चढलेल्या असल्यामुळें जादा नफा मिळणार असतो; **ज्या ठिकाणीं नफा हीच प्रेरणा असते त्या ठिकाणीं उत्पादनांत**

अराजकता उत्पन्न होते. परिणामीं एका बाजूला सतत अति-उत्पादन होते, तर दुसऱ्या बाजूला कमीं उत्पादन होतें.

समाजवादी समाजांत उत्पादन नफ्यासाठीं नसतें, तर उपयोगासाठीं असतें, आणि म्हणून त्या ठिकाणीं योजनाबद्ध उत्पादन शक्य असतें. उद्योगधंद्यांचे संपूर्ण सामायिकीकरण करण्यापूर्वीच तें शक्य होतें. कांहीं मुख्य कारखाने समाजाच्या मालकीचे झाले, इतर कारखानें नियंत्रित झाले म्हणजे मग उत्पादनाची योजना आंखता येते—ही योजना वर्षानुवर्ष अधिकाधिक बिनचूक बनत जाते.

तेव्हां आर्थिक क्षेत्रांत समाजवादाचा मार्क्सनें सांगितलेला अर्थ हा कीं, उत्पादनाचीं साधनें सबंध समाजाच्या मालकीची होतात, उत्पादन-शक्तित विलक्षण वेगानें वाढ होते आणि उत्पादन योजनाबद्ध बनते. आणि या उत्पादनाच्या योजनेचें स्वरूपच असें असतें कीं, उत्पादनाची साधनें सतत वाढत असतांहि समाज अति-उत्पादनाच्या अरिष्टांत अडकत नाहीं.

उत्पादनाची राष्ट्रीय योजना दोन भागांची असते; इमारती, यंत्रे, कच्चा माल, इत्यादि उत्पादनाच्या नव्या साधनांच्या निर्मितीची योजना, आणि नित्योपयोगी वस्तुंच्या उत्पादनाची योजना—यांत केवळ अन्न व वस्त्र यांचाच समावेश होत नाहीं; तर शिक्षण, आरोग्य, करमणूक, खेळ, इत्यादिंचाहि होतो; त्याचप्रमाणें जोपर्यंत संरक्षण शक्तींची गरज असते तो पर्यंत योजनेंत त्यांचीहि सोय करावी लागते.

समाजवादी पद्धतींत अति-उत्पादन कधींच होत नांहीं, कारण नित्योपयोगी वस्तूंचे संपूर्ण उत्पादन ग्राहकांना बांधलेले असते, म्हणजे या वस्तूंच्या एकूण किंमतीच्या बरोबरीइतका पगार व इतर भत्ते देण्यांत येत असतात. कधीं कधीं योजनेंत चुका होऊं शकतात, उदा. लोकांना पाहिजेत त्यापेक्षां जास्त सायकली व कमी बूट एखाद्या वर्षी तयार होतात. परंतु अशा चुका योजनेच्या दुसऱ्या हप्त्यांत सहज

सुधारतां येतात व समतोल निर्माण होतो. या ठिकाणीं फक्त एका वस्तूचें दुसरी बरोबर प्रमाण जमवून घेण्याचाच प्रश्न असतो; एकूण उत्पादनांत कपात करण्याचा कधींच प्रश्न नसतो; कारण **नित्योपयोगी वस्तूंच्या एकूण उत्पादनापेक्षा त्यांचा वापर कधींच कमी होत नाहीं. वस्तूंच्या उत्पादनांत योजनाबद्धता दृढमूल होत जाते त्याप्रमाणेंच ती त्यांच्या वाटपांतहि होत जाते.**

परंतु वस्तूंच्या रूपांत उत्पादनाचें जनतेंत विभाजन होत नसते, त्यासाठीं पगाराच्या व भत्याच्या रूपानें मिळणारा पैसाच कामाला येतो. या वस्तूंच्या किंमती निश्चित केलेल्या असतात त्यामुळें या सर्व वस्तूंच्या एकूण किंमतीइतका पगार, वगैरे देतां येतो. अशा रीतीनें उत्पादन व त्यांचा उपयोग यांत कधीं अंतर पडत नाहीं, जेंजें उत्पादन केलें जातें तें सर्व लोक घेऊं शकतात. उत्पादन वाढलें कीं लोकांना मिळणाऱ्या वस्तूंत वाढ होते. समाजवादी समाजांत किंमतीचे हें जे कार्य आहे त्याबद्दल पुष्कळदां गैरसमज होतात. भांडवलदारी समाज पद्धतींत किंमतीच्या चढउतारावरून मागणी व पुरवठा यांच्यांतील संबंध समजून येतात. किंमती वाढल्या कीं पुरवठा अपुरा असल्याचे समजते. म्हणून भांडवलदारी समाजांत उत्पादनांचें नियंत्रण करण्याचे काम किंमती करतात. परंतु समाजवादी समाजांत किंमती केवळ वस्तूंच्या वापराचें नियंत्रण करतात, उत्पादन योजनेंप्रमाणें चालतें, किंमती आधींच निश्चितपणें ठरविलेल्या असतात आणि त्याही अशा रीतीनें की, जितकें उत्पादन झालेले असतें तितकें सर्व विकत घेतले जाते.

नित्योपयोगी वस्तूंच्या एकूण उत्पादनाचे जनतेंत वांटप कशा पद्धतीनें होते ? सर्वांना सर्व वस्तू सारख्याच मिळाल्या पाहिजेत असें मार्क्सचें म्हणणें होते, ही समजूत चुकीची आहे; असें होऊं शकत नाहीं; कारण समाजवादी समाज हा एक संपूर्णपणें नवा समाज नसतो, तो भांडवलशाहीकडून आलेल्या वारशाच्या पायावरच उभारला जात असतो. सर्वांना

सर्व वस्तू सारख्याच वाटून द्यावयाच्या म्हणजे ज्यांची राहणी सर्वसाधारण राहणींपेक्षां वरची असते अशा सर्वांना शिक्षा करणें होय; उत्पादन-वाढीला मोठी मदत करणाऱ्या आणि समाजाच्या दृष्टीनें अकुशल कामगारापेक्षां ज्यांच्या कामाला अधिक महत्व आहे अशा कुशल कामगारांना शिक्षा देणें होय; म्हणून भांडवलशाहीनें मागे ठेवलेल्या विषम परिस्थितीवर आधारलेली समानता न्याय ठरणार नाहीं, तर अन्यायाची ठरेल. या बाबतींत मार्क्सचें विचार अगदीं स्पष्ट होते; त्यानें लिहिलें आहे : "या प्रारंभीच्या काळांत, हक्क समान नसतील तर असमान असतील...... समाजाच्या आर्थिक परिस्थितीपेक्षां आणि तिनें निर्माण केलेल्या सांस्कृतिक विकासापेक्षा अधिक वरच्या दर्ज्याचा न्याय या विशिष्ट परिस्थितींत उदय पावं शकत नाहीं".

भांडवदारी समाजाच्या शृंखलांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या माणासांत विषमताच असते, आणि त्यांना योग्य रीतीची वागणूक देण्यासाठी असमानतेची वागणूक समर्थनीय ठरते. अर्थात त्यांनीं समाजाची सेवा केली तरच त्यांच्या बातींतील हें कार्य पार पाडण्याची जबाबदारी समाजावर राहते. आणि म्हणून, **"जो काम करणार नाहीं त्याला खायला मिळणार नाहीं,"** हें तत्व पुढे येतें. यावरून पुढचा निष्कर्ष हा निघतो कीं, **जो समाजासाठीं जास्त काम करील त्याला समाज अधिक वरच्या दर्ज्याचें राहणीमान देईल. आणि म्हणून समाजांत वापरासाठीं तयार झालेल्या नित्योपयोगी वस्तूंची वाटणी "प्रत्येकाकडून त्याच्या शक्तिनुसार काम करून घेतलें जाईल, आणि प्रत्येकाला त्याच्या कामाच्या प्रमाणांत दिलें जाईल," या तत्त्वावर होते.**

परंतु समाजवादी समाज भांडवलशाहीकडून मिळालेल्या वारशाच्या पातळीवरच राहत नाहीं, तो प्रत्येक वर्षी उत्पादन वाढवीत जातो, आणि त्या बरोबरच जनतेचें तांत्रिक कौशल्य व संस्कृतीचाहि विकास करतो.

सुसंस्कृत श्रमिकांना अकुशल श्रमिकांपेक्षा अधिक पगार मिळत असल्यामुळें प्रत्येक व्यक्ति आपली गुणवत्ता वाढविण्यासाठीं पराकाष्ठेचे प्रयत्न करते. यामुळें वाढत जाणाऱ्या कुशलतेबरोबर उत्पादन अधिक होते. वाटपासाठीं-अधिक वस्तू तयार होतात आणि त्यामुळें प्रत्येकाचें राहणीमान सुधारते. अशा रीतीनें, **समाजवादी समाजांत विषमतेमुळें सबंध समाजाची पातळी उंचावण्यास टेकू मिळतो, भांडवलदारी समाजाप्रमाणें ती मूठभर श्रीमंतांची श्रीमंती वाढविण्याचे व असंख्य गरिबांचें दारिद्र्य वाढविण्याचे साधन ठरत नाहीं.**

भावी समाजाचें कायमचें अंग म्हणून ही विषमता राहील, असें मार्क्सला वाटत होतें कां ? नाहीं. कारण, पुढें समाजाच्या विकासांत अशी अवस्था निर्माण होईल कीं, जेव्हां प्रत्येक जण समाजाची जितकी कामगिरी पार पाडतो त्या प्रमाणांतच त्याला वाटा देण्याची आवश्यकता उरणार नाहीं.

कामाप्रमाणें उत्पादनांतील वाटा देणें-या अगर अशाच दुसऱ्या तत्वाप्रमाणें उत्पादनाची वांटणी करणें याचा अर्थ अखेरीस हाच असतो कीं, सर्वांच्या गरजा पूर्ण करण्याइतकें उत्पादन समाजांत होत नसतें. भांडवलदारी समाजांत, ज्या कुटुंबांत सर्व व्यक्तींना पुरेल इतकें अन्न मिळू शकतें, तीं कोणत्याहि तत्वावर अन्नाची वांटणी करीत नाहींत, कुटुंबातील प्रत्येक व्यक्ति तिला जितकें लागेल तितकें अन्न खात असते. त्याचप्रमाणें, समाजवादी समाजांत, सर्व नागरिकांनी गरजेइतकें स्वतःसाठीं घेतलें, तरी कोणालाही कमी पडणार नाहीं, इतक्या पातळीवर उत्पादन गेलें तर त्यांतून वांटणी काढण्याचा अगर वांट्यावर नियंत्रण घालण्याचा प्रश्नच कोठे येतो ? ही अवस्था प्राप्त होते त्या वेळीं, उत्पादन व त्याची वाटणीं, **"प्रत्येकाकडून त्याच्या शक्तिनुसार, आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार"** या तत्वावर चालू होते.

समाज अवस्थेच्या याच काळांत समाजवादी समाजाचा साम्यवादी

समाजांत विकास होतो. मार्क्सनें मांडणी केल्याप्रमाणें, समाजवाद ही पहिली पायरी असते; त्या वेळी उत्पादनाचीं साधनें जनतेच्या मालकीची असतात; आणि म्हणून त्या अवस्थेंत माणसाची माणसाकडून पिळवणूक होत नसते; परंतु प्रत्येक व्यक्तीला पाहिजे तितकें मुक्तपणें मिळू शकेल, इतक्या उंचीवर समाजवादी योजनाबद्ध उत्पादन पोहोंचण्यापूर्वीची ही अवस्था असते.

आणि तरीसुद्धां, साम्यवादी समाजांत केवळ भौतिक सुबत्तेखरीज आणखीहि बरेंच कांहीं असते. कामगार वर्गानें सत्ता हातांत घेऊन समाजवादाचा मार्ग आक्रमण करण्यास प्रारंभ केल्यापासून, जनतेच्या दृष्टिकोनांतहि बदल घडू लागतो. भांडवलशाहींत अनुल्लंघनीय भासणारे अडथळे निर्बल बनून अखेर नाहींसे होतात. शिक्षण व विकासाच्या इतर सर्व वाटा सर्व मुलांना मोकळया होतात; मग त्यांच्या पालकांचा सामाजिक दर्जा अगर आर्थिक परिस्थिति कशीही असो. "जाती" भेदांचा प्रभाव नष्ट होतो. मुलें बुद्धिप्रमाणेंच हातांचाही उपयोग करायला शिकतात, आणि बौद्धिक व शारिरिक श्रमांची ही समानता हळूहळू सर्व समाजांत पसरूं लागते. प्रत्येक जण "बुद्धिजीवी" बनतो आणि बुद्धिजीवी लोक स्वतःला शारिरीक मेहनतीपासून अलिप्त ठेवीनासे होतात.

स्त्रियांना कमी दर्ज्याचे मानण्यांत येत नाहीं अगर समाजांतील कोणत्याही क्षेत्रांतील कामाला त्यांना नालायक समजले जात नाहीं. काम करणें त्यांना सोपे व्हावे म्हणून खास सोई करण्यांत येतात. शिशु-संगोपनाची व्यवस्था कारखान्यांतून, रहात्या घरांतून वगैरे करण्यांत येते आणि अशा रीतीनें मातांना अधिक मोकळीक मिळवून देण्यात येते. सामायिक स्वयंपाक-गृहांच्या, धोबीखान्यांच्या, व भोजन गृहांच्या सहाय्यानें स्त्रियांचे घरांतील काम कमी करण्यात येते. सार्वजनिक काम करण्याची सक्ति त्यांच्यावर करण्यात येत नाहीं; परंतु काम करणें त्यांना सोपें होईल अशी अनुकूल परिस्थिति निर्माण करण्यांत येते.

दर पांच वर्षांनी पार्लमेंटसाठीं प्रतिनिधि निवडून देण्याच्या स्वातंत्र्या-पेक्षां लोकशाहीची कल्पना अधिक विस्तृत केली जाते. प्रत्येक कारखान्यांत, रहात्या घराच्या प्रत्येक ब्लॉकमध्यें, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत स्त्रियां व पुरुष आपले व आपल्या देशाचे भवितव्य घडवूं लागतात. अधिकाधिक लोकांना सार्वजनिक कामांत ओढले जाते, स्वतःच्या व दुसऱ्याच्या कल्याणाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यांत येते. कोणत्याहि दुसऱ्या प्रकारच्या लोकशाहीपेक्षां ही लोकशाही अधिक भरीव व अधिक सत्य असते.

**शहरें व खेडीं यांच्यांतील फरक नष्ट केला जातो.** खेड्यांतील कामगार यंत्रांचा उपयोग करायला शिकतात आणि आपल्या तंत्र कौशल्याची वाढ शहरांतील कामगारांच्या बरोबरीनें करतात. पूर्वी फक्त शहरांतच मिळणाऱ्या शिक्षणाच्या व सांस्कृतिक विकासाच्या सोई खेडे विभागांतहि मिळू लागतात.

थोडक्यांत म्हणजे, समाजवादानें अस्तित्वांत आणलेल्या भौतिक परिस्थितींतील परिवर्तनामुळें स्त्री-पुरुषांच्या दृष्टिकोनांत व व्यक्तित्वांत विलक्षण बदल घडून येतो. ज्यांचा सर्वांगीण विकास झालेला आहे, ज्यांना सर्वांगीण शिक्षण मिळालेले आहे, जे जगांत कोणतीही कामगिरी पार पाडण्यास समर्थ बनले आहेत, असे लोक तयार होतात.

**भांडवलशाही समाजांत परिपुष्ट झालेल्या स्वार्थी व व्यक्ति-निष्ठ दृष्टिकोनाच्या जागी खराखुरा सामाजिक दृष्टिकोन, समाजा-बद्दलच्या जबाबदारीचा दृष्टिकोन निर्माण होतो.** मार्क्सनें म्हटल्या-प्रमाणें, "श्रम हे केवळ उपजीवीकेचें साधन रहात नाहींत, तर त्यांना जीवनांत प्रथम श्रेणीचें स्थान प्राप्त होते" ( जीवनांतील ती सर्वांत आवश्यक बाब बनते ). समाज विकासाच्या या अवस्थेत, साम्यवादी समाजांत, काम करण्यासाठीं कोणत्याहि प्रलोभनाची गरज उरत नाहीं, कारण त्या काळांताल स्त्री-पुरूषांना समाजाच्या विकासाला हातभार

लावण्याचें कार्य पार पाडण्याशिवाय दुसरा निराळा दृष्टिकोन उरतच नाहीं.

हें मनोराज्य आहे कां ? नाहीं. पण ज्यांना मार्क्सवादाचा भौतिक पाया समजलेला नाहीं, त्यांना हे सर्व केवळ मनोराज्यावादीच वाटेल. मार्क्सवादी भौतिकवादासंबंधीचे विचार या पुस्तकांतील दुसऱ्या प्रकरणांत मांडलेले आहेत, त्यांचे सार असे : माणसाचा अनादि अनंत असा स्वभाव-धर्म अगर दृष्टिकोन नसतो; प्राथमिक अवस्थेंतील जमातीच्या समाजांत जबाबदारीची जाणीव—( त्या जमातीपुरती मर्यादित असली तरी )—फारच मोठी असते. अशा समाजांच्या आजच्या अवशेषांतही ती आढळून येते. त्यानंतरच्या समाजांत, वर्गभेद निर्माण झाल्यानंतर, सामाजिक जबाबदारीची जाणीव कमी झाली; केवळ आपल्या वर्गापुरती ती कांही प्रमाणांत शिल्लक राहिली. भांडवलशाही समाजांत सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेचा संपूर्ण विध्वंस झाला, "ज्यानें त्याने स्वतः पुरतें पहावे" हें या समाजांत जीवनाचें तत्वज्ञान बनलें.

पण भांडवलदारी समाजांत सुद्धां कामगारांत 'ऐक्याची भावना" असते; ही समान हित-संवर्धनाची, समान जबाबदारी भावना असते. ही ऐक्याची कल्पना कोणाच्या तरी मनांत स्फुरली, आणि ती त्यानें कामगारांच्या डोक्यांत भरली, असे होत नाहीं; ती कामगार वर्गाच्या जीवनाच्या भौतिक परिस्थितीतून, ते एकत्र काम करतात आणि एकाच मार्गानें जीवनावश्यक वस्तू मिळवितात, या परिस्थितीतून निर्माण होते. त्यांच्या उलट, सामाजिक अगर सामुदायिक जबाबदारीचा अंशहिज्याच्यामध्ये उरलेला नाहीं असा नमुनेदार स्वार्थी, व्यक्तिनिष्ठ माणूस म्हणजे भांडवलदार. त्याच्याभोंवतो दुसऱ्याला मारून, स्वतः गब्बर बनण्यासाठीं धड्पडणाऱ्या, स्पर्धा करणाऱ्या, भांडवलदारांचें कडे असतें. अर्थात सत्ताधारी वर्गाचे, हे प्रतिस्पर्धी बनून स्पर्धा करण्याचे, गूण कामगार वर्गातहि उतरतात आणि त्यांच्यांतील ऐक्याच्या भावनेवर ताबा मिळवितात; विशेषतः ज्यांना मालक खास सबलती देऊन आर्थिक विकासाची संधी देतात त्यांच्यात विशेष

करून या स्वभाव-दोषाचा प्रादुर्भाव होतो. आणि तरीसुद्धां, [ व्यक्ति म्हणून नव्हे ], वर्ग म्हणून, प्रत्येक वर्गाचा एक खास दृष्टिकोन असतो आणि त्या वर्गाच्या जीवनाची भौतिक परिस्थिती, त्याच्या जीवनाच्या उपजीविकेची पद्धत, त्या दृष्टिकोनाचा मूलभूत पाया असते.

यावरून निष्कर्ष निघतो तो हा कीं, **जीवनाच्या भौतिक परिस्थितींत बदल घडवून आणला, म्हणजे उपजीविका करण्याच्या पद्धतींत बदल घडवून आणला कीं. जनतेच्या दृष्टिकोनांत बदल घडवून आणतां येतो.** सोविएत युनियनमधील शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनांत जो बदल झालेला आहे त्यापेक्षां अधिक उत्तम उदाहरण या बाबतींत दुसरे मिळणार नाहीं. प्रत्येक लेखकानें झारशाहींतील रशियन शेतकऱ्यांच्या स्वार्थसाधू व हांवरट व्यक्तिनिष्ठेचें वर्णन केलेलें आहे. क्रांतिच्या विरोधकांचा हा दावा होता कीं, शेतकऱ्यांना कधींही समाजवाद पटवून देतां येणार नाहीं; शेतकरीच क्रांतीचा धुव्वा उडवतील. आणि हे अगदी खरेच होतें की, जीवनाच्या परिस्थितीमुळें शेतकऱ्यांचा दृष्टीकोन इतका संकुचित, इतका दृढमूल झालेला होता, कीं, वादविवादानें त्यांना समाजवाद पटवून देणें, अगर सक्तीनें त्यांच्यावर समाजवाद लादणें अशक्यच होतें; पण हे टीकाकार मार्क्सवादी नसल्यामुळें, एखादें आदर्श शेतकी-केन्द्र, जवळपास असलेले ट्रॅक्टर स्टेशन, यांचा शेतकऱ्यांवर किती परिणाम होतो, आणि मोठ्या प्रमाणावर शेती करण्यांतील फायदे त्यांना व्यवहारांत कसे समजतात, हें त्यांच्या लक्ष्यांत आले नाहीं. सोविएत सरकारनें यांत्रिक शेती व मोठ्या प्रमाणावरील मशागत या कार्यक्रमांसाठी त्यांना तयार केले; परंतु छोट्या छोट्या शेतांच्या सीमारेषा पुसल्याशिवाय व सामुदायिक पद्धतीनें शेती केल्याशिवाय हे करणें शक्य नव्हतें. तसें झाल्यानंतर त्यांच्या दृष्टीकोनांतील विभक्तपणाही नाहींसा झाला. त्यांनी सामुदायिक जीवन जगण्यास प्रारंभ केला आणि ते एका नव्या प्रकारचे शेतकरी बनले, सामुदायिक शेतकरी बनले, त्यांच्यांत सामुदायिक जबाबदारीची भावना निर्माण झाली आणि ही भावना त्यांना सामाजिक

दृष्टिकोनाच्या मार्गावर बऱ्याच पुढच्या टप्प्यापर्यंत घेऊन जाणारी होती व आहे.

आणि म्हणून कोणत्याहि देशाचा भौतिक पाया जेव्हां समाजवादी उत्पादन व वांटप असतो, जेव्हां संबंध समाजासाठीं काम करून सर्व लोकांना उपजीविका करता येते, तेव्हां एका अर्थी अगदीं स्वाभाविकपणें सामाजिक जबाबदारीची भावना वाढीला लागते; त्यानंतर लोकांना हें पटवूनहि द्यावे लागत नाहीं कीं, सामाजिक तत्वच बरोबर असते. 'मानवी-स्वभावाच्या' सहज प्रवृत्तींवर ही अमूर्त, नैतिक, कर्तव्याची भावना कलाम करण्याचा प्रश्नच नसतो. **मानवी स्वभावच व्यवहारांतून, संबंधींतून बदलत असतो.**

समाजवादी अगर साम्यवादी समाज पद्धती सर्व जगभर पसरल्यानंतर काय परिणाम होतील याचा अद्याप आपण विचार केला नाहीं. मार्क्सच्या लेखनावरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं, त्या काळांत युद्धें नाहींशीं होतील; कारण, प्रत्येक देशांत उत्पादन व वांटप समाजवादी पायावर होऊं लागल्यानंतर, कोणत्याहि देशांत इतर देश जिंकण्याची महत्वाकांक्षा बाळगणारे गट अस्तित्वांत रहाणार नाहींत. भांडवलशाहीचा विस्तार करण्यासाठीं, बँकभांडवलदारांच्या गटांना भांडवल गुंतविण्यास नवे प्रदेश मिळविण्यासाठीं, रेल्वे, डॉक्स व खाणींना नवी यंत्रें पुरविण्याची कॉन्टक्टें मिळविण्यासाठीं, खरत व कच्च्या मालाचीं नवीं कुरणें मिळविण्यासाठीं आणि बाजारपेठा मिळविण्यासाठीं, तौलनिक दृष्टीनें मागासलेल्या देशांना भांडवलदारी राष्ट्रें गुलाम बनवतात. समाजवादी देश युद्धें पेटविणार नाहींत कारण त्यांना अगर त्यांच्यांतील कोणत्यादि गटांना युद्धांतून कसलाहि फायदा मिळणार नसतो.

याच कारणासाठीं, **कोणत्याहि समाजवादी राष्ट्राला, जगांतील कोणताहि देश मागासलेला रहावा अशी यत्किंचितहि इच्छा नसतें.** उलट प्रत्येक देशाची औद्योगिक प्रगति झाल्यास आणि त्यांची सांस्कृतिक

उन्नति झाल्यास, सर्व समाजवादी राष्ट्रांचा फायदाच होईल, कारण जगांत सर्वांचेंच रहाणीमान वाढलें कीं जीवन समृद्ध होईल. आणि म्हणून औद्योगिकदृष्टीनें पुढारलेले समाजवादी देश मागासलेल्या देशांच्या विकासाला मदत करतील, त्यांचा विकास थांबवून धरणार नाहींत, आणि अर्थातच त्यांची पिळवणूक कधींच करणार नाहींत.

अशा जागतिक समाजवादी पद्धतींत मानवाची आणखी किती प्रगति होईल याची कल्पना करणें अशक्य आहे. प्रत्येक देशांतील आर्थिक जीवन योजनाबद्ध असल्यानंतर, आणि प्रत्येक देशांतील योजनांना सूत्रबद्ध करणारें जागतिक नियोजन असल्यानंतर, सर्व देश तांत्रिक व यांत्रिक शोधांचा लाभ एकाच वेळीं करून घेत असतांना आणि सर्व तऱ्हेच्या सांस्कृतिक प्रगतीची मुक्त देवाण-घेवाण चालूं असल्यानंतर माणसाची प्रगति अतिवेगानें होईल, यांत कोणतीच शंका नाहीं.

भरधांव वेगानें पुढें जाणारी ही प्रगति माणसाला कोठें घेऊन जाईल या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न मार्क्सनें कधीं केला नाहीं, कारण शास्त्रीय भविष्य सांगण्याच्या दृष्टिनें परिस्थिति फारच अज्ञात होती व आजही आहे. परंतु, जगभर साम्यवादाची स्थापना झाल्यानंतर मानवी इतिहासांतील वर्गभेद व वर्गलढे यांचे दीर्घ पर्व संपुष्टांत आलेले असेल, ही गोष्ट स्पष्ट आहे. त्यानंतर समाजांत नवें वर्गभेद व वर्गलढे निर्माण होणार नाहींत, कारण समाम्यवादी समाजांत त्यांना जन्म देणारी परिस्थितीच नसेल. माणसाची उत्पादन शक्ति कमी होती त्या वेळीं वर्गविभागणीमुळें उच्च उत्पादन शक्तिच्या आविष्काराला व संघटनकर्त्यांना मदत झाली, पुढेंही तिनें ही कामागिरी पार पाडली, आणि भांडवलशाहींत वर्गविभागणी मुळें उत्पादनाच्या केंद्रिकरणाला व तंत्र-कौशल्याच्या अवाढव्य विस्ताराला सहाय्य झालें.

परंतु साम्यवादी अवस्थेंत माणसानें प्रगत केलेल्या उत्पादन

शक्तिंनी स्वतःला इतकें सुसंपन्न बनविलेले असेल की, दिवसाला दोन तास काम केलें तरी तें पुरेसें होऊं शकेल. अशा अवस्थेंत वर्गभेद नष्ट होऊं शकतात व झालेंच पाहिजेत. त्यानंतर मानवाचा निसर्गाशीं लढा पुढें चालू राहील पण विजयाची संपूर्ण हमी त्याच्याच बाजूला राहील. त्याला जादूटोण्यानें निसर्गावर जय मिळविण्याचें कारण उरणार नाहीं, नैसर्गिक आपत्तिंना रोंखण्यासाठीं प्रार्थना म्हणाव्या लागणार नाहींत, वर्गलढे व युद्धाच्या खाईतून आंधळेपणानें धडपडण्याची गरज उरणार नाहीं, तर आत्मविश्वासानें, निसर्गशक्तिंना स्वतःसाठीं राबविण्याच्या निश्चयानें, तो सतत पुढें पुढें जात राहील······ साम्यवादी समाजांतील मानवाचें मार्क्सनें रेखाटलेलें चित्र हें असें आहे.

········

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा[illegible]
अनुक्र 339 [illegible] वि: [illegible]
93e८ नों: दि: [illegible]

## प्रकरण ७ वें

# निसर्गासंबंधी मार्क्सवादी दृष्टिकोन

मार्क्सवाद मानवाला आणि म्हणून मानवी समाजाला निसर्गाचा एक भाग मानतो, हा मुद्दा पूर्वी आलेला आहे. म्हणून जगाच्या विकासांत मानवाची उत्पत्ति सांपडते. जीवावस्थेच्या पूर्वीच्या प्रकारांतून माणसाची उत्क्रांति झाली. या उत्क्रांतिच्या क्रियेत विचार-शक्तिचा व सहेतूक कार्यांचा विकास झाला. याचा अर्थ असा कीं, सचेतन मन अस्तित्वांत येण्यापूर्वी अचेतन पदार्थ अस्तित्वांत होते. याचाच दूसरा अर्थ असा होतो कीं बाह्य जगाचें अस्तित्व स्वतंत्र असते, तें मानवी मनावर अवलंबून नसतें. निसर्गासंबंधीच्या या दृष्टिकोनाला "भौतिक-वादी" दृष्टिकोन म्हणतात.

याच्या विरोधी असलेला दृष्टिकोन, बाह्य जग असत्य मानतो, बाह्य जगाचें अस्तित्व फक्त मनांत असतें, निदान एखाद्या सर्वश्रेष्ठ शक्तिच्या मनांत असतें, असें समजतो. या दृष्टिकोनाला ' अध्यात्मवादी" विचारसरणी म्हणतात. अध्यात्मवादाचें अनेक प्रकार आहेत. पण त्या सर्वांचा मुख्य आशय हाच आहे कीं, मानवी अगर "दैवी" मनच सर्वश्रेष्ठ सत्य असून, जड वस्तूंना खरेखुरें अस्तित्व असलेंच तर तें दुय्यम असतें.

मार्क्सवादी विचारांच्या लोकांच्या दृष्टिनें मात्र, एंगल्सनें म्हटल्या-प्रमाणें, **"जगासंबंधीचा भौतिकवादी दृष्टिकोन म्हणजे दुसरे तिसरे कांहीं नसून, निसर्ग जसा आहे तसा तो मानणें होय."** बाह्य जगत् सत्य आहे, आपल्याला त्याची जाणीव असों अगर नसों तें अस्तित्वांत असतेंच, आणि त्याची गति व विकास निश्चित स्वरूपाच्या

नियमानुसार चालतात, तें आपण शोधून काढून त्यांचा उपयोग करूं शकतो, परंतु त्यांच्यावर कोणत्याहि मनाची सत्ता चालत नाहीं, असा हा दृष्टिकोन आहे.

बाह्य जगत् अगर वस्तुमात्र केवळ दुय्यम सत्य आहे. असें मानणारा आध्यात्मवाद असें ही समजतो कीं, आपल्याला सत्य कधींच समजून येणार नाहीं; जगाचें "अद्‌भुत चमत्कार" अनाकलनीय आहेत, असें तो मानतो.

भौतिकवाद व अध्यात्मवाद यांच्यातील वादाला कां महत्व आहे? महत्व यासाठीं आहे कीं, हा केवळ कल्पनेचा अगर अमूर्त विचारांचा प्रश्न नाहीं, हा व्यावहारिक प्रश्न आहे. **माणूस केवळ निसर्गाचें निरीक्षणच करीत नाहीं, तो निसर्गाला बदलतो आणि त्याच्या बरोबर स्वतःहि बदलतो.**

दुसरा मुद्दा हा की, भौतिकवादी दृष्टिकोनाप्रमाणें, माणसाच्या मनांत जें असतें, म्हणजे माणसाला ज्याची जाणीव असतें, तें बाह्य जग खरें असतें, माणसाच्या मनांतील कल्पना सत्याचें प्रतिबिंब असतात, त्यांचा उगम बाह्य जगांत होतो. याचा अर्थ असा नव्हें कीं सर्वच कल्पना व विचार खरेंच असतात, अगर सत्याचीं खरीं प्रतिबिंबें असतात, सत्याच्या अनुभवावरून त्यांच्या खरेपणाची परीक्षा होत असतें.

याच्या उलट, सनातनी अध्यात्मवादी "चिरंतन तत्वावर" विश्वास ठेवतात आणि ती सत्याशीं जुळतात कीं नाहीं याची पर्वा करीत नाहींत. सध्यांच्या परिस्थितींतील उदाहरण द्यावयाचें तर शुद्ध शांततावादी अगर अहिंसावादी दृष्टिकोनाचें देतां येईल. अशीं माणसें आपल्या सभोंवतालच्या जगाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करतात, वस्तुस्थितींत, आजच्या जगाच्या अनुभवाच्या दृष्टिनें, जुलूमजबरदस्ती इच्छा-शक्तिच्या जोरावर नष्ट करता येत नाहीं; वस्तुस्थितींत, आपल्या जीवनाच्या अनुभवाच्या दृष्टिनें, जुलूमजबरदस्तीचा प्रतिकार केला नाहीं तर अधिक जबरदस्ती, अधिक आक्रमण व अधिक पशुता जन्माला येते या गोष्टींना

तें महत्वच देत नाहींत. अशा व्यक्तींचा मूलभूत दृष्टिकोन अध्यात्मवादी असतो, बाह्य जगाला असत्य मानण्याचा असतो, अर्थात् कधीं कधीं आपला तात्विक दृष्टिकोन असा आहे याची त्यांना जाणीव नसतें.

मार्क्सवाद मात्र, आपले सर्व सिद्धांत जगाबद्दलच्या भौतिकवादी विचारांवर आधारतों, या दृष्टिकोनांतून तो जगाचें निरीक्षण करतो, जग ज्यानुसार चालतें ते नियम शोधून काढण्याचा प्रयत्न करतो, आणि मानव याच सत्याचा आविष्कार असल्यामुळें मानवी समाजाची हालचाल ज्या नियमानुसार चालतें ते शोधण्याचा प्रयत्न करतो. आणि मग तो आपले सर्व निष्कर्ष प्रत्यक्ष अनुभवांच्या निकषावर घासून पहातों, आणि त्यांतील जे सिद्धांत अगर जे निष्कर्ष वस्तुस्थितीशीं जुळत नाहींत ते सुधारण्याचा प्रयत्न करतो, किंवा टाकून देतो.

जगाबद्दलच्या ( यांत नेहमींच मानवी समाजाचा अंतर्भाव असतो ) या दृष्टिकोनांत अशी सर्वसाधारण स्वरूपाचीं वैशिष्टयें आहेत कीं जीं सत्य आहेत, मनानें निर्माण केलेलीं अगर लादलेली नाहींत. हा मार्क्सवादी दृष्टिकोन संपूर्णपणें शास्त्रीय आहे, सत्यावर आधारलेला आहे, कोणीही बुद्धिमान व्यक्तिनें शोधून काढलेलें तें तत्त्वज्ञान नाहीं. आणि म्हणून जग केवळ भौतिक आहे एवढेंच पाहून तो थांबत नाहीं, तर त्याची दुसरीहि अंगें आहेत हें त्याच्या लक्ष्यांत येतें. त्याचें वर्णन तो ' विरोधविकासात्मक'' या शब्दानें करतो. जगाबद्दलचा हा ' विरोधविकासात्मक भौतिकवादी'' दृष्टिकोन बहुधा गूढ समजला जातो. पण तो जरादेखील गूढवादी नाहीं, कारण तो सत्याचें प्रतिबिंब आहे आणि प्रत्येकाला माहित असलेल्या सामान्य वस्तूंच्या आधारावर "विरोधविकासात्मक" या शब्दाची फोड करून दाखवितां येतें.

पहिला मुद्दा हा कीं, **मानवी समाजाचा ज्यांत अंतर्भाव आहे तें हें जग, अगर निसर्ग एकमेकापासून वेगळया व संपूर्णपणें स्वतंत्र अशा वस्तूंचा संग्रह नाहीं.** प्रत्येक शास्त्रज्ञाला हे माहीत

असतें, आणि एखाद्या लहानशा घटकाचा अभ्यास करतांनाहि त्याला या वस्तुस्थितीची दखल घ्यावी लागतें. उदा :—पाणी हें पाणीच असतें, परंतु त्याचें तापमान विशिष्ट अंशापर्यंत वाढविण्यांत आलें ( किती तें हवेच्या दाबावर अवलंबून रहातें ) कीं त्याची वाफ होतें; त्याचें तापमान कमी करण्यात आलें तर त्याचा बर्फ होतो, अशा प्रकारें इतर सर्व परिस्थितिचा त्याच्यावर परिणाम होतो. सर्वसामान्य माणसालाहि जाणीव असतें कीं, कोणत्याहि वस्तुचा अभ्यास करावयाचा झाला तर जगांत एकहि वस्तु संपूर्णपणे स्वतंत्र अस्तित्व असलेली नाहीं, प्रत्येक दुसरीवर अवलंबून आहें. खरें पहातां, वस्तुंचें हें परस्परावलंबित्व इतकें स्वाभाविक वाटतें कीं त्याचा खास उल्लेख करण्याची कांहीं आवश्यकता दिसत नाहीं, पण त्याची दखलमात्र नेहमींच घेतली जात नाहीं. एका परिस्थतींत जें खरें आहें तें निराळ्या परिस्थितीत खरें असेलच असें नाहीं, हें लोकांच्या लक्ष्यांत येत नाहीं. ते एका परिस्थितीत बनलेले विचार सतत दुसऱ्या परिस्थितिला लागू करीत असतात. भाषण-स्वातंत्र्याचा मुद्दा उदाहरणादाखल घेऊं या. सर्वसाधारणपणें, भाषण-स्वातंत्र्यामुळें लोकशाहीला मदत मिळतें त्याच्यामुळें निरनिराळ्या विषयांवर सर्वांना आपली मतें व्यक्त करतां येतात, आणि म्हणून तें समाजाच्या विकासाला सहाय्यकारी असतें, परंतु फॅसिस्टांना भाषण-स्वातंत्र्य देणें म्हणजे जें मूलतः लोकशाहीला विरोधी आहे त्याला स्वातंत्र्य देणें ठरतें, त्यानें समाजाची प्रगति खुंटून जातें. आणि म्हणून ‘ भाषण-स्वातंत्र्याच्या” मंत्राचा कितीहि जयघोष केला तरी नित्याच्या परिस्थितीत जें खरें आहें, ज्याची उभारणी लोकशाहीवर आहे, अशा पक्षांच्या बाबतीत जें खरें आहें, तें ज्यांचें ध्येय लोकशाहीला बदनाम करून अखेरीस ती नष्ट करण्याचें आहें त्यांच्या बाबतींत बरोबर नाहीं.

दुसरा मुद्दा हा कीं, “विरोधविकास”वादाप्रमाणें जगांत कांहींही गतिहीन नाहीं, सर्व काहीं गतिमान असतें, बदलत असतें; पढ़ें येत असते, विकास पावत असतें, अगर अधोगतिला जात

असतें व नष्ट होत असतें, सर्व शास्त्रीय ज्ञानाचा या सिद्धांताला पाठिंबा आहे. खुद्द पृथ्वीही सतत बदलत आहे. जीवंत प्राणिमात्रांच्या बाबतींत तर ही क्रिया फारच स्पष्टपणें दिसणारी आहे. आणि म्हणून प्रत्येक शास्त्रानें ही बाब लक्ष्यांत घेतली पाहिजे आणि कांहीहि अनादि, अनंत, व नित्य आहे असें मानतां कामा नयें.

सत्याचें हें स्वरूप इतकें स्पष्ट आहे कीं तें सांगण्याची काय आवश्यकता आहे ? असेंहि विचारण्यांत येईल. हें पुन्हां सांगण्याचें कारण इतकेंच कीं, माणसें जगाकडे, आणि विशेषतः मानवी समजाकडे व व्यक्तिच्याकडे या दृष्टिकोनांतून पहात नाहींत. नफ्यासाठीं उत्पादन मानवी समाजाचें नित्य स्वरूप नाहीं, तें विशिष्ट काळीं अस्तित्वांत आलें, वाढलें, आणि आतां विनाश पावत आहे, हें ज्यांना पटत नाहीं, असें लोक सत्यासंबंधी वर वर्णन केलेला व अत्यंत स्पष्ट असा दृष्टिकोन व्यवहाराला लागू करीत नाहींत. "आजपर्यंत होतें, तसेंच चालणार", असें म्हणाणारे सर्वत्र भेटतात आणि व्यक्तिच्या व समाजाच्या विकासाला अशा विचारसरणींतून फार मोठे अडथळें येतात.

प्रत्येक घटक बदलत असतो, विकास पावत असतो, अगर विनाश पावत असतो, या मुद्याचें नीटपणें आकलन झालें म्हणजे आणखीन् एक मुद्दा स्पष्ट होतो; तो हा कीं, हें असें असल्यामुळें, आपल्याशीं संबंध येणाऱ्या प्रत्येकांची चालू अवस्था लक्ष्यांत घेतली पाहिजे. गाय विकत घेणाऱ्या शेतकऱ्याला या गोष्टीची पूर्ण जाणीव असतें; घर विकत घेणारा माणुसहि नीट पाहून घेतो; वास्तविक जीवनाच्या छोट्या व्यवहारांत हा नियम कोणीच उल्लंघित नाहीं. परंतु दुर्दैवानें मानवी समाजसंस्थांना व विशेषतः उत्पादन पद्धतींना व त्याच्या अनुषगानें येण्याऱ्या विचाराना मात्र हा नियम लावला जात नाहीं. ( या मुद्याची सविस्तर चर्चा पुढे करण्यांत येणार आहे ).

तेंव्हा, पहिल्या विषयाकडे पुन्हां वळावयाचें म्हणजे, वस्तुमात्राचें

परस्परावलंबित्व व गतिमानता ही सत्याची अत्यंत स्पष्ट अंगें आहेत. "विरोध-विकासवादी" विचारसरणीत अंतर्भूत असलेले तिसरें अंग इतकें सुस्पष्ट नसलें तरी तें अगदी खरें आहें, हें त्याची मांडणी होतांच ताबडतोब समजून येते.

हा तिसरा मुद्दा असा : वस्तुमात्रांत होणारा विकास सरळ, संथ होत नाहीं, तो कांहीं विशिष्ट बिंदूवर खटकन तुटतो. सरळ व संथ विकास पुष्कळ काळपर्यंत होत रहातो, त्या काळांत त्यांत होणारा बदल म्हणजे विशिष्ट परिमाणाचें आधिक्य वाढत जातें. पुन्हां एकदां पाण्याचें उदाहरण घेऊं या. पाण्याचें तापमान वाढत असतांना पाणी हें पाणीच रहातें. पाण्याचें सर्व गुणधर्म तेंच रहातात, फक्त त्यांतील उष्णता वाढत जाते. त्याचप्रमाणें, पाण्याचें तापमान कमी करीत नेल्यास त्याचें इतर सर्व गुणधर्म तेंच रहातात, फक्त त्यांतील उष्णता कमी होत जातें.

परंतु ही क्रिया तशीच चालू असतांना, एका विशिष्ट बिंदूवर, म्हणजे पाणी उकळण्याच्या अगर गोठण्याच्या बिंदूवर, एकाएकी चालू क्रियेंत खंड पडतो, पाण्याचें गुणधर्म पूर्णपणें बदलतात, पाणी पाणी रहात नाहीं, तें वाफ अगर बर्फ बनतें. सत्याचें हें स्वरूप रसायनाच्या बाबतीत अधिक स्पष्टपणें दिसून येतें, तेथें एखादा घटक कमी अगर अधिक घेतल्यास ताबडतोब महान फरक पडतो.

मानवी समाजांत, अनेक वर्षेंपर्यंत, क्रमशः बदल होत रहातो; या काळांत समाजाच्या स्वरूपांत कोणताहि मूलभूत बदल होत नाहीं. मग एकाएकीं या क्रियेंत खंड पडतो. क्रांति होते. समाजाचा जुना प्रकार विलयाला जातो, नवा प्रकार जन्माला येतो आणि तो अपल्या विकासाचा मार्ग आक्रमूं लागतो. अशा रीतीनें, सरंजामदारी समाजांत, उत्पादन स्थानिक गरजेसाठीं होत असतांना, अधिक उत्पादन बाजारांत जाऊं लागतांच त्यांतून बाजारपेठेसाठीं उत्पादन सुरुं झालें, आणि होतां होतां, त्यांतून भांडवलदारी उत्पादनाचा उगम झाला.

ही एक सम्पूर्णपणें क्रमशः होत जाणाऱ्या विकासाची क्रिया होती, परंतु एका विशिष्ट वेळीं उगवता भांडवलदार वर्ग व सरंजामदारी व्यवस्था यांच्यांत विरोध वाढीस लागला, त्यानें सरंजामदारी व्यवस्थेचा पराजय केला, उत्पादनाचें स्वरूप संपूर्णपणें बदललें, भांडवलशाहीनें सरंजामशाहीची जागा घेतली आणि उत्पादनाची विलक्षण भरभराट केली.

विरोधविकासी तत्वाचा चवथा मुद्दा, ( पूर्वी आपण पहिल्या प्रमाणें ) विश्वव्यापी असलेल्या या विकासाचें कारण शोधून काढण्या-संबंधीचा आहे. विरोधविकासवादाप्रमाणें कोणतीही वस्तु एकसंघ नसतें, एकाच स्वरूपाची नसतें, प्रत्येक वस्तुंत भावात्मक व अभावात्मक गुण असतात, त्यांच्यांत विकास पावणारे अगर अधिक प्रबल होणारे गुण असतात, आणि त्याच बरोबर विलयास जाणारे, निर्बल होणारे गुण अतसात. एका गुणाचा विस्तार होत असतो दुसरे त्याला प्रतिबंध घालीत असतात. आणि विरोधी गुणांच्या या संघर्षातून, पहिल्याचा प्रभाव नष्ट होण्यासाठीं उगवता घटक करीत असलेल्या लाढ्यांतून, आणि प्रथम प्रबळ असलेला घटक नव्या घटकाच्या विकासाला करीत असलेल्या अडथळयांतून, बदल घडून येत असतो आणि अखेरीस तो स्फोटक स्वरूपांत बाहेर फुटतो.

मानवी समाजांत ही क्रिया स्पष्टपणें पहावयास मिळतें. प्रत्येक ऐतिहासिक अवस्थेंत, समाजाची विभागणी निरनिराळया दोन वर्गांत झालेली होती; त्यांतील एक विकास पावणारा होता आणि दुसरा विनाशा-कडे जाणारा होता. सरंजामदारी समाजांत बीजरूपानें भांडवलदारी वाढत होती आणि जशी जशी ती वाढत गेली तसें तिचें सरंजामशाहीशीं मोठेमोठे संघर्ष होऊं लागले. भांडवलदारी समाजांत हेंच चालू आहे. "भविष्य काळची किल्ली हाताच्या मुठींत बाळगणारा" कामगार वर्ग उगवता वर्ग आहे. भांडवलदारी समाज एकसंघ नाहीं, जसें भांडवलदार वाढतात, तसें कामगारही वाढतात. या दोन वर्गांतील संघर्ष वाढतों. भांडवलशाहींतील हा संघर्ष, हा "विरोध" आणि वर्गभेदामुळें निर्माण होणारे प्रत्यक्ष लढे,

यांतून अखेरीस तीव्र प्रस्फोट, म्हणजे क्रांति ( किंवा, समाजाचा विकास ) होतो.

आतां इतकें स्पष्टीकरण झाल्यानंतर "विरोधविकासी भौतिकवाद" या शब्दसमुच्चयानें अभिप्रेत असलेले विचार एकत्र मांडता येतील. हा दृष्टिकोन असें मानतों कीं, वस्तुमात्राचें अस्तित्व आपल्या मनावर अवलंबून नाहीं. आपल्याला त्याच्या अस्तित्वाविषयीं जाणीव नसलीं तरी तें असतेंच. तें अलग, अलग व स्वतंत्र नसतें तर परस्परावलंबी असतें. तें गतिहीन नसतें, सदोदित गतिमान असतें, विकास व विनाश पावत असतें. हा विकास विशिष्ट बिंदूपर्यंत हळूं हळूं होतो, त्या बिंदूला पोहोंचताच एकाएकीं परिस्फोट होतो, आणि कांहीं तरी नवें जन्माला येतें. हा विकास अंतर्गत विरोधांमुळें होतो, आणि अखेरचा स्फोट, म्हणजे उगवत्या घटकानें मावळत्यावर मिळविलेल्या विजयाची नांदी असतें.

मानवी समाजासहित सर्व जगाबद्दलचा हा मार्क्सवादी दृष्टिकोन इतर सर्व दृष्टिकोनाहून निराळा आहे, याचा अर्थ असा नव्हें कीं, विरोध-विकासी भौतिकवाद सत्य घटनांच्या पलीकडचा आहे, कोणातरी प्रतिभा-वंताचा तो शोध आहे, आणि त्याला अनुसरून जगाचा अर्थ लावण्यांत आलेला आहे. उलट त्याचा असा दावा आहे कीं, तो सत्याचें व जगाचें सर्वांत उत्कृष्ट प्रतिनिधित्व करतो आणि मानवाच्या संचित ज्ञानांतून व अनुभवांतून त्याचा जन्म झाला आहे. बाह्य जग असें आहें, म्हणून मार्क्सवादी लोकांच्या विचारांत त्याचें असें रूप दिसत आहें, "वस्तु-मात्राच्या स्थितीचा तो खरा आकार आहे."

हा दृष्टिकोन खरा आहे याचा विज्ञानांत अधिकाधिक पुरावा मिळूं लागला आहें. निसर्गाचें विरोधविकासी दृष्टिकोनांतून निरीक्षण करणारांना अधिकाधिक नवी माहिती मिळत असल्याचें आढळून येतें; पूर्वी अनाक-लनीय वाटणारे स्पष्ट करतां येऊं लागतें. त्यामुळें आजच्या मानवी

समाजाच्या विकासाच्या अवस्थेंत, विरोधविकासी भौतिकवादी दृष्टिकोनाला मानवी समाजाच्या दृष्टिनें फारच मोठें महत्व प्राप्त झालेले आहें.

मानवी समाजाचा विकास अणि या विकासातून निर्माण होणारे विचार यांच्या संबंधी मार्क्सवादी दृष्टिकोन व मार्क्सवाद न मानणारांचा दृष्टिकोन याबद्दलचीं उदाहरणें या प्रकरणांत प्रारंभीं दिलेलीं आहेत, आणखी कांहीं उदाहरणें इतर प्रकरणांतहि आलेली आहेत; परंतु सत्याच्या स्वरूपाचा प्रश्न स्त्री-पुरुषांच्या जीवनांत व कार्यात इतक्या महत्वाचा आहें कीं त्याचा अधिक खोलवर अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणें, भौतिकवादी दृष्टिकोन म्हणजे, जडपदार्थ, अगर बाह्य जगत् , प्रथम निर्माण झालेलें असून, मन ( दुय्यम-अगर-गौण-म्हणजे ) त्याच्या आधारानें नंतर निर्माण झाले आहें, असें मानणें होय. यावरून पुढें असा निष्कर्ष निघतो कीं, माणसाचें शारिरीक जीवन, अणि तें टिकवून धरण्याचें मार्ग प्रथम अस्तित्वांत येतात आणि नंतर स्वतःच्या जीवनाबद्दल व जीवनक्रमाबद्दल तो ज्या कल्पना व विचार करतों त्यांचा जन्म होतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, सिद्धांतापूर्वीं व्यवहार निर्माण होतो. जीवनपोषणासंबंधी विचार निर्माण होण्यापूर्वीं कितीतरी आधींपासून माणूस आपलें जीवन-पोषण करीत होता. परंतु विचारांचा विकास होतांच ते त्याच्या व्यवहाराचे अंग बनलें, म्हणजे सिद्धांत व व्यवहार यांची जोडी जमली. सुरवातीच्या अवस्थेपासून आतापर्यंत ती कायम आहें. माणसाला ज्या व्यावहारिक मार्गानें जीवनावश्यक वस्तु मिळतात तो त्याच्या विचारांचा आधार असतो; त्याच्या राजकीय विचारांचा पायाहि तोच असतो; त्याच्या राजकीय संस्था त्या त्या वेळेचे उत्पादन प्रकार टिकवून धरण्यासाठीं निर्माण करण्यांत आलेल्या असतात; कोणत्याहि अमूर्त तत्त्वांच्या पायांवर उभारलेल्या नसतात. कोणत्याहि युगांतील विचार व संस्था-संघटना त्या युगाच्या आर्थिक व्यवहाराचीं प्रतिबिंबें असतात; त्यांना

स्वतंत्र अस्तित्व व इतिहास नसतो. विचारांतून विचारांचा विकास होत रहात नाहीं; तर जेव्हां उत्पादनाचा भौतिक प्रकार बदलतो तेव्हां विचार बदलतात. जुन्या चालिरीतींच्या जागीं नव्या चालीरीती येतात आणि त्यांच्यातून नवे विचार निर्माण होतात. परंतु, नव्याच्या जोडीनें जुनें विचार व संस्थाहि टिकून रहातात. सरंजामदारी उत्पादनांतून निर्माण झालेले विचार, [ उदा : राजेरजवाडे ] आजच्या ब्रिटनमध्येही अस्तित्वांत आहेत. तेथें भांडवलदारी उत्पादनांतून निर्माण झालेले विचार आहेत; कांहीं विचार जुन्यांची सुधारून काढलेली नवी आवृत्ति आहेत; ( उदा:—जन्मानें उमराव घराण्यांतील नसलेल्या श्रीमंताबद्दलही आदर बाळगणे वगैरे. ) त्यानंतर समाजवादी विचारही तेथें निर्माण झालेले आहेत. हे विचार भांडवलशहीनें उत्पादन अधिकाधिक सामाजिक, अधिकाधिक सामुदायिक व परस्परावलंबी बनविल्यामुळें निर्माण झाले आहेत. आजच्या समाजांत हे तीन प्रकारचे विचार-प्रवाह वाहात आहेत, आणि त्यांच्यातील कोणताहि एक अंतिम सत्य, अनंत काळपर्यंत खरा ठरणारा व टिकणारा नाहीं.

याचा अर्थ, मार्क्सवाद या तीनहि प्रकारच्या विचारसरणींना सारख्याच अवास्तव मानतो असें नाहीं. उलट, तो सरंजामदारी कल्पनांना संपूर्णपणें जीर्ण समजतो, भांडवलदारी विचार नष्ट होत जाणरे आहेत असे मानतो, आणि समाजवादी विचार जगांत सत्य ठरणार आहेत असें समजतो. परन्तु त्याच्याबद्दल आतां केवळ अनुमान करण्याची गरज उरलेली नाहीं. नोव्हेंबर १९१७ च्या रशियन क्रांतिनंतर आतां समाजवादी विचारांना तावून सुलाखून घेणें आणि ते वस्तुस्थितीला जुळणारे आहेत, हे अनुभवानें सिद्ध करणें, शक्य झालें आहे. उत्पादनाची अत्यंत अवाढव्य व गुंतागुंतीची आधुनिक यंत्रणा नफ्याच्या दृष्टीनें नव्हें, तर समाजाच्यां उपयोगासाठीं संघटित करतां येतें, ही मुख्य बाब सिद्ध झाली आहें. अनुभवानें हेंहि सिद्ध झालें आहें कीं, समाजवाद म्हणजे उत्पादनांत कल्पनातीत वाढ, अरिष्टांचा अंत, आणि जनतेच्या रहाणी-

मानांत सतत होत जाणारी सुधारणा. म्हणजे, आर्थिक व सामाजिक विकासावरून मार्क्सनें शास्त्रीय पद्धतिनें विकसित केलेल्या समाजवादाच्या कल्पना १९१७ पर्यंत शास्त्रीय अनुमानें होती, तीं आतां अनुभवानें खरी असल्याचें सिद्ध केले आहें.

रशियन कम्युनिस्ट पार्टीनें मार्क्सवादी दृष्टिकोनांतून, जाणीवपूर्वक केलेल्या कार्यामुळें, जुनी समाज-पद्धती उलथून पडली आणि नव्या समाज-पद्धतीची स्थापना झाली. त्या वेळेपासून बहुसंख्येनें मार्क्सवादी नसलेली रशियन जनता, नव्या समाज पद्धतीचा अनुभव घेऊं लागली आणि व्यवहारांत समाजवादी होऊं लागली. त्या आधारावर समाजवाद्यांच्या जाणीवपूर्वक, सैद्धांतिक, व शैक्षणिक कार्याला उत्कृष्ट यश मिळालें आणि व्यवहार व शिक्षण यांच्या मिलाफ होऊन संपूर्ण जनतेच्या दृष्टिकोनांत परिवर्तन घडून आलें.

येथे ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं, विरोधविकासी भौतिकवादाचा, हा दृष्टिकोन, शास्त्रीय ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रांतील संशोधकांना, वस्तुस्थितीचें निरीक्षण व आकलन करण्यास मदत करतो, यापेक्षां अधिक श्रेय मार्क्सवादी घेत नाहीत. तो कोणत्याहि शास्त्राचा तपशील सांगत नाहीं, तें काम प्रत्येक क्षेत्रांतील सखोल अध्ययनानेंच व्हावें लागतें. विशिष्ट वस्तुस्थितीचा अलगपणें अभ्यास केला असतांहि शास्त्रीय ज्ञान प्राप्त होऊँ शकतें, हें सुद्धां मार्क्सवाद अमान्य करीत नाहींत; मात्र ते आग्रहपूर्वक सांगतात कीं, वस्तुस्थितीचा अभ्यास, संबंधित घटकांच्या परस्परावलंबित्वाच्या आधारानें, विकासाच्या प्रक्रियेंत, संख्येच्या अधिक्याचें परिवर्तन नव्या गुणांत होत असतांना, अंतर्गत विरोध लक्ष्यांत घेऊन केला असतां, जें शास्त्रीय ज्ञान उपलब्ध होते तें अनंत पटीनें अधिक मुल्यवान, अधिक सत्य असतें.

आणि समाजशास्त्राबद्दलही हेंच खरें आहें. व्यक्तिशः स्त्री पुरुषांच्या निरीक्षणावरून, अगर विशिष्ट काळच्या व ठिकाणच्या समाजाच्या

अभ्यासावरून, जें निष्कर्ष निघतात ते अत्यंत मर्यादित स्वरूपाचें असतात. ते इतर समाज गटांना अगर त्याच समाजाला दुसऱ्या परिस्थितींत लागू पडत नाहींत. समाजाच्या मार्क्सवादी अध्ययनाला जें महत्व प्राप्त झाले आहे त्याचें मुख्य कारण हेंच आहे कीं, तें आजच्या समाजाचाच केवळ अभ्यास करीत नाहीं, अर्थात् [ त्यालाहि कमी महत्व नाहीं ] तर हा समाज पूर्वी कसा होता, आणि त्याच्या आंतर्गत विरोधामुळे तो कसा विकास पावत आहे, याचाहि अभ्यास करतो. यामुळें आज प्रत्यक्षपणें घडत असलेल्या परिवर्तनाच्या क्रियेंत, मार्क्सनें म्हटल्याप्रमाणें, "आपल्या डोळयादेखत घडत असलेल्या" आंदोलनांत, जाणीवपूर्वक कार्य करून, सहभागी होण्याची संधि, प्रथमच स्त्री-पुरूषांना प्राप्त झाली आहे". वास्तविक जुन्या काळांतील विचारांचें प्रतिबिंब असलेल्या दुसऱ्या कोणत्याही अमूर्त विचारांमुळें अगर तत्त्वामुळे, सध्यःस्थितींत योग्य कार्याच्या शोधांत असणाऱ्यांना जें मार्गदर्शन मिळू शकत नाहीं, तें मार्क्सवादामुळें मिळू शकतें.

.........

## प्रकरण ८ वें

# कार्याला मार्गदर्शन करणारें तत्वज्ञान :-

मार्क्सनें प्रारंभीच्या एका ग्रंथांत म्हटलें आहे :—"तत्त्ववेत्त्यांनीं निरनिराळ्या प्रकारांनी जगाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु महत्वाचें कार्य जग बदलण्याचें आहे." जगाबद्दलच्या मार्क्सच्या संपूर्ण दृष्टिकोनांत या मुद्याला अत्यंत महत्व आहें.

"मार्क्सवाद" हें केवळ पुस्तकी शास्त्र नाहीं. तर जग बदलण्यासाठीं माणसानें उपयोगांत आणावयाचें ज्ञान आहे.

भांडवलशाही ही विलयाला जात चाललेली समाज-अवस्था असून, तिच्या मागोमाग, समाजवादाचा उदय होणार आहे, हें नुसतें माहीत असून उपयोग नाहीं. केवळ आर्थिक कारणांमुळें हा बद्दल आपोआप घडून येणार नाहीं, हें स्पष्टच आहें. कितीही अरिष्टें आली, भांडवलशाही-मुळे कितीही हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, तरी ज्याप्रमाणें ३२ अंश ( फारनहीट ) वर तापमान उतरले कीं, पाण्याचें आपोआप बर्फ बनतें त्या प्रमाणेंभांडवलशाहीचें रूपांतर आपोआप समाजवादांत होण्याचा बिंदू येत नाहीं. उत्पादनाच्या एका पद्धतीमधून दुसरीमध्यें मानवजातीची उडी पडण्यासाठीं, मानवी प्रयत्नांची व कार्याची आवश्यकता असते. या ध्येयाकडे जाण्यासाठीं, करावयाच्या कार्याला मार्गदर्शन देईल, असें ज्ञान मानव जातीच्या अनुभवावरून, निष्कर्ष-रूपानें वेचून काढण्याचें काम, मार्क्सवाद अगर शास्त्रीय समाजवाद करतो.

समाज बदलण्याच्या कार्याच्या स्वरूपाबद्दलची कल्पना दुसऱ्या प्रकरणांत देण्यांत आलेली आहे, वर्गसंघर्ष ( आजच्या अवस्थेंत, भांडवलशाही विरुद्ध चाललेला कामगार वर्गाचा लढा ) हें कार्य पार पाडीत असतो. परंतु या सर्वसाधारण सिद्धांतांत प्रत्यक्ष अनुभवाची भर घालावी लागते आणि विकासाच्या विशिष्ट अवस्थेंत असलेल्या निरनिराळया देशांतील परिस्थितीला तो लावावा लागतो.

या प्रश्नाचा मार्क्स सतत विचार करीत होता, केवळ अनुमानानें नव्हे, तर आजुबाजूला जें प्रत्यक्ष घडत होतें त्याचा अभ्यास करून, आणि ( त्याच्या मतानें सर्व भविष्यकालीन कार्याचा आधार असलेल्या ) कामगार संघटनांची उभारणी करण्यास मदत करीत असतांना तो या प्रश्नाचें उत्तर शोधीत होता. सन् १८४८, मध्यें प्रसिद्ध झालेला सुप्रसिद्ध **कमुनिस्ट जाहीरनामा हा कमुनिस्ट लीगचा** जाहीरनामा होता आणि या संस्थेंत मार्क्स प्रत्यक्षपणें काम करीत होता. **पहिली इंटरनॅशनल** या नांवानें ओळखली जाणारी "इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन" त्याच्याच प्रयत्नांनीं १८३४ मध्यें स्थापना झाली होती. त्याच्या काळांतील ब्रिटिश कामगार चळवळीशीं व इतर देशांतील कामगार चळवळीशीं मार्क्सचे निकटचें संबंध होते.

त्या काळांत, कामगार वर्गाचा एक अगदीं लहानसा विभागच ट्रेड युनियन्स व सहकारी संस्थांत संघटित झालेला होता आणि कोणत्याहि देशांत नांव घेण्यासारखा अगर वजनदार असा कामगार वर्गाचा पक्ष नव्हता. बहुतेक देशांत कामगार वर्गच उदयास आलेला नव्हता. ब्रिटनबाहेर भांडवलदारी उद्योगधंदे अगदींच प्रथमावस्थेत होते, आणि अनेक देशांत उगवत्या भांडवलदारी वर्गाचें सरंजामदारी अमीरउमराव अगर त्यांचें वंशज यांच्या विरूद्ध स्वतःचें वर्चस्व प्रस्थापित करण्याचें लढे चालू होते. १८४८ मध्यें यूरोपांत सर्वत्र झालेल्या क्रांतिकारक उठावांत, मार्क्स व त्याचें समाजवादी सहकारी यांनी राजेशाहीविरूद्धच्या लढ्यांत भाग

घेतला; एंगल्सनें जर्मन लोकशाही सैन्यांत सामील होऊन प्रशियाच्या राजाविरूद्धचा युद्धांत भाग घेतला.

यापूर्वी कम्युनिस्ट जाहीरनामा प्रसिद्ध झालेला होता आणि त्यांत समाजवाद आणि समाजवाद अस्तित्वांत आणण्यासाठीं आवश्यक असलेल्या कामगार क्रान्तीची गरज प्रतिपादन करण्यांत आली होती. कामगार वर्गाच्या क्रान्तीचा सिद्धांत मांडणें, आणि त्या सिद्धांताच्या जन्मदात्यांनी भांडवलदार, छोटे भांडवलदार अगर मध्यम वर्ग यांच्या पुढाकाराखालील लोकशाही लढ्यांत सामील होणें, या दोन घटनांत सुसंगति नाहीं, असें मार्क्सवादाला ठोकळेबाज सिद्धांतांची मालिका मानणाऱ्यांना वाटतें; कारण त्या लढ्याचा उद्देश्य समाजवादाची स्थापना करण्याचा नव्हता, तर उगवत्या भांडवलदारांच्या ताबडतोबीच्या हितासाठी पार्लमेंटरी लोकशाहीचें कांही हक्क मिळविण्याचा होता.

मार्क्सलामात्र प्रश्न अगदीं स्पष्ट ठाऊक होता. ऐतिहासिक घडामोडींच्या त्या विशिष्ट अवस्थेंत, पुढील प्रगतिचा मार्ग मोकळा करण्यासाठीं, जनतेच्या इतर विभागाबरोबर हातमिळवणी करणें, हें कामगार वर्गाचें कार्य होतें. सरंजामदारी परिस्थितीवर आधारलेल्या राजेशाहीचा नाश करणें, हें कामगार वर्गाच्या व्यूहरचनेचें ताबडतोबीचें ध्येय होतें. या पहिल्या लढ्यांत मिळणाऱ्या यशावर, लढ्यांची पुढची अवस्था किती लवकर येईल हें अवलंबून होतें.

ब्रिटनमध्यें ट्रेड युनियन्स व सहकारी संघटना निर्माण झालेल्या होत्या, पण कामगार वर्गाचा राजकीय पक्ष अस्तित्वांत आलेला नव्हता. लहान लहान समाजवादी गट अस्तित्वांत होते, पण सर्वसामान्यतः कामगरांचें संबंध जहाल पक्षांबरोबर (म्हणजे भांडवलदाराच्या डाव्या गटाबरोबर होते) आणि म्हणून तेथें, भांडवलदारी पक्षांबरोबरचे कामगाराचे संबंध तोडून कामगार वर्गाच्या पक्षाची स्थापना करणें आवश्यक होते.

गेल्या शतकाच्या अखेरीस, युरोपांतील अनेक देशांत कामगार वर्गाचें राजकीय पक्ष स्थापन झाले, आणि त्यांनी पार्लमेंटमध्यें प्रतिनिधित्व मिळविले. ब्रिटनमध्यें नंतरच्या काळांत लेबर पार्टीचा ( मजूर पक्षाचा ) जन्म झाला; तिचे पुढारीमात्र समाजवादी दृष्टिकोनाचे नव्हते, जहाल ( भांडवलदारी ) विचारसरणीचे होतें.

चालू शतकांत प्रारंभी, ४ थ्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें, भांडवलशाहीनें साम्राज्यशाहीची अवस्था गाठली असता, "युद्धांचा व क्रांत्यांचा कालखंड" सुरू झाला. त्या वेळीं, मार्क्स-एंगल्सच्या काळापेक्षां, वर्ग लढ्यांचें डावपेंच व व्यूह-रचना यांचा विकास अधिक पुढच्या अवस्थेंपर्यंत नेऊन पोहोंचवण्याची आवश्यकता निर्माण झाली. साम्राज्यशाहीच्या या अवस्थेंत मार्क्सवाद परिस्थितीला लागू करण्याचें कार्य लेनिननें केलें.

या काळांत, लेनिननें दाखऊन दिलें कीं, फक्त पार्लमेंटरी व प्रचार-कार्य करणाऱ्या जुन्या धर्तीच्या कामगार वर्गीय पक्षांचें कार्य पुरेसें नव्हतें. **भांडवलशाहीचा शेवट करण्याचा प्रश्न इतिहासाच्या कार्यक्रमपत्रिकेवर आलेला होता. त्यासाठीं नव्या धर्तीच्या पक्षाची आवश्यकता होती. पार्लमेंटमध्ये चालणारा संघर्ष, व कारखान्यांत आणि रस्त्यारस्त्यांत लढविला जात असलेला संघर्ष यांचें एकीकरण करणाऱ्या, भांडवलशाही उलथून टाकून समाजवादाच्या रचनेसाठीं कामगार वर्गाचें नेतृत्व करण्याचें ध्येय बाळगणाऱ्या पक्षाच्या स्थापनेची आवश्यकता होती.**

आपल्या आधीच्या सत्ताधारी वर्गाचा पराभव करणारा आणि तिच्या जागीं सत्तेवर येणारा नवा वर्ग, जनतेच्या इतर विभागांना बरोबर घेऊनच लढ्यांत उतरतो, या मुद्यावर मार्क्सनें वारंवार भर दिलेला होता. कामगार वर्ग पोकळींत जगत नसतो; त्याच्या भोवतीं निश्चित स्वरूपाचें व जीवंत जग असतें. त्यांत देशकालमाना प्रमाणें निरनिराळे वर्ग

व वर्गांचें विभाग समाविष्ट होत असतात. नव्या धर्तीच्या कामगार वर्गाच्या पक्षाच्या व्यूहरचनेचा प्रश्न हा असतो कीं, त्याला फक्त कामगार वर्गालाच नव्हें तर जनतेच्या इतर विभागांनाही बरोबर घेऊन आपापल्या देशांत, सामाजिक प्रगतिचा जो मुख्य शत्रू असेल त्याविरुद्ध, एकजुटीचा लढा उभारण्याचा मार्ग शोधून काढावयाचा असतो.

१९१७ मधील मार्च क्रांतिच्या पूर्वीच्या झारशाही रशियाचेंच उदाहरण पहा. त्या काळांत, संख्येनें लहान असलेला कामगार वर्ग, शेतकरी समुदायांच्या महान सागरानें वेढला गेलेला होता; त्यांचाहि झारच्या हुकुमशाहीला विरोध होता आणि त्यांना जमीन पाहिजे होती. आणि म्हणून रशियन सोशल डेमोक्रेटिक पार्टीच्या बोल्शेविक ( बहुमतवाल्याविभागाला ), लेनिनच्या नेतृत्वाखालीं, कामगार वर्गाचें संपूर्ण शेतकरी समाजाबरोबर ऐक्य घडवून आणणें शक्य झालें. शेतकरी समाजांत कांहीं शेतकरी श्रीमंत व कांहीं त्यांच्याशीं तुलना करतां गरीब होते, तरी ही गोष्ट घडून आली, शहरी व ग्रामीण विभागांच्या ऐक्याच्या सामर्थ्यानें १९१७ च्या मार्चमध्ये झारचा पराभव केला, आणि सामाजिक प्रगतीला अडथळा आणणाऱ्या मुख्य शत्रूचा पाडाव झाला, परंतु झारच्या पाडावानंतर जें तात्पुरतें सरकार स्थापन करण्यांत आले तें भांडवलदारी हितसंबंधांचें प्रतिनिधीत्व करणारें होतें. त्या काळांत, सामाजिक प्रगतींतील मुख्य अडथळा, मुख्य शत्रू, भांडवलदार वर्ग बनला होता, पण सर्व शेतकरी भांडवलदार वर्गाला शत्रू मानावयाला तयार नव्हतें. त्यांच्यातले श्रीमंत शेतकरी, ( म्हणजे कुलक ) स्वतः शेतमजूरांना कामावर ठेवीत होते; व्यापार करीत होते; सट्टेबाजी करीत होते आणि वास्तवांत स्वतंत्र भांडवलदार होते. आणि म्हणून त्या काळांत, सर्व शेतकऱ्यांच्या बरोबर कामगार वर्गाचें ऐक्य होणें शक्य नव्हतें. फक्त गरीब शेतकरी व भूमिहीन शेत-मजूराबरोबर ऐक्य होणें शक्य होतें. या ऐक्यांतून १९१७ च्या नोव्हेंबरमध्यें शहरांतील व ग्रामीण विभागांतील क्रांति यशस्वी झाली.

परंतु मार्च क्रांतीपूर्वकाळांत कामगार-शेतकऱ्याचें व्यापक ऐक्य झालें नसतें, तर मार्चमध्यें झारचा पराभव झाला नसता, आणि नोव्हेंबर क्रांतिला अनुकूल परिस्थिती निर्माण झाली नसती.

समाजांतील इतर सर्व विभागांबरोबर, कामगार वर्गानें, मुख्य शत्रुविरूद्ध करावयाच्या ऐक्याच्या सिद्धांताची लेनिननें रशियाच्या परिस्थितींतून-म्हणजें व्यवहारांतून-मांडणी केली, आणि तो सिद्धांत प्रत्यक्ष-पणें तेथील परिस्थितील लागू केला. आणि त्यानंतरच्या काळांत, कामगार वर्गाच्या कार्याचें मार्गदर्शक तत्व या नात्यानें, मार्क्सवादी विचारसरणीच्या विकासांत त्याला महत्वाचें स्थान प्राप्त झालें.

भांडवलशाहीविरुद्ध सुसंगतपणें अखेरपर्यन्त फक्त कामगार वर्गच लढतो; कारण भांडवलशाहीच्या विस्ताराबरोबर त्याची वाढ होते आणि भांडवलदार वर्गाकडून त्याची प्रत्यक्षपणें पिळवणूक होते. उलट, शेतकऱ्यांचा जमीनदारांविरुद्ध सतत संघर्ष चालू असतो आणि भांडवल-शाहीच्या विकासाबरोबर ते वर्गभ्रष्ट होतात; गरीब शेतकरी ( शेतमजूर बनून ) कामगार वर्गात सामील होतात आणि श्रीमंत शेतकरी शेत-मजूर कामाला ठेवणारे भांडवलदार बनतात. आणि म्हणून, भांडवलदार वर्गाविरुद्धच्या एकजुटीचा गाभा कामगार वर्ग असतो. ऐक्य-दलाची ती नेतृत्व करणारी शक्ति असते. परंतु कामगार वर्गाला ऐक्याची आवश्यकता मात्र जरूर असते, कारण ज्या वेळेला भांडवलदारीविरुद्ध लढा चालू होतो, तेव्हां इतर विभाग एकतर कामगार वर्गाकडे, नाहीं तर भांडवलदार वर्गाकडे, ओढले जातात, आणि एखादा विभाग कामगार वर्गाबरोबरच्या ऐक्यांत सामील होणें म्हणजे भांडवलदार वर्गाला त्या विभागाच्या पाठिंब्यापासून वंचित करणें असते.

मुख्य शत्रूविरुद्ध, कामगार वर्गाचा व इतर विभागांचा संयुक्त मोर्चा, भांडवलशाहीच्या मक्तेदारी अवस्थेंत अधिकच सहजपणें बनतो, कारण त्या वेळीं आर्थिक (व म्हणून राजकीय) सत्ता अगदीं

लहान व अत्यंत श्रीमंत गटाच्या हातांत केंद्रीत झालेली असतें. भांडवलदार वर्गांत कमी-अधिक श्रीमंत लोक नेहमींच असतात, पण, जगव्यापी मक्तेदारीच्या अवस्थेंत, मक्तेदार भांडवलदार आणि इतर छोटे भांडवलदार यांच्यात फार मोठी दरी निर्माण झालेली असते. उद्योग व व्यापार यावरील आपली पकड वाढवितांना, पिळवणूकींसाठीं नवे प्रदेश जिंकतांना, आणि दुसऱ्या देशांतील प्रतिस्पर्धी भांडवलदार गटांबरोबर व्यवहार करतांना, मक्तेदार भांडवलदार, लहान व्यापारी व लहान भांडवलदार यांच्या हितसंबंधांना गोत्यांत आणतात; लहान व्यापारी व भांडवलदार यांना ते आपलें अस्तित्व नष्ट करावयाला निघाले आहेत, असें वाटते. एकामागून दुसरा असे प्रश्न निर्माण होतात आणि हे लहान दुकानदार व भांडवलदार प्रथम व्यक्तिशः आणि नंतर त्यांचा संपूर्ण विभाग मक्तेदार भांडवलदारांना आपला "मुख्य शत्रू" मानूं लागतों.

हा संघर्ष एकदम आर्थिक कारणावरूनच सुरूं होतो असे नाहीं. आर्थिक मक्तेदारीतून निर्माण होणाऱ्या कामगार वर्ग, वसाहत राष्ट्रें व लहान भांडवलदार यांच्याविरूद्धच्या मोंहिमेंत मक्तेदार वर्ग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत प्रतिगामी धोरणांचा अंगीकार करतो. लहान भांडवलदार व मध्यमवर्ग, व्यावसायिक मंडळी व बुद्धिजीवी, यांच्यावर भांडवलशाहीच्या प्रारंभीच्या काळांतील उदार व लोकशाहीवादी परंपरेचे संस्कार असतात; त्यांच्यामुळे ते या परंपरा पायाखालीं तुडविणाऱ्या मक्तेदारांच्या विरुद्ध जातात. कांहीं देशांत मक्तेदार उघड रीतीनें अनियंत्रित हुकुमशाहीचा, (फासिस्ट पद्धतीचा) स्वीकार करून सर्व लोकशाही संस्था-संघटनांचा नाश करतात आणि जगभर मान्य असलेल्या माणुसकीच्या साध्या तत्वांनाहि हरताळ फासतात; त्या वेळीं हा विरोध फारच प्रभावी होतो.

अशा परिस्थितींत, जनतेचे अत्यंत विस्तृत विभाग, जेव्हां फासिस्टांना, शांतता व सामाजिक प्रगतीच्या आड येणारा मुख्य शत्रू मानतात त्या वेळीं, कामगार वर्गाचे व मधल्या विभागांचे हितसंबंध एकच होतात आणि

त्या वेळीं फासिस्टांविरुद्ध फारच व्यापक संयुक्त मोर्चा ( जनतेची संयुक्त-आघाडी ) उभारणें शक्य होते.

कामगार वर्गाचे व जनतेच्या इतर विभागांचें हितसंबंध जुळत असले, तर त्या प्रश्नावरच खरा संयुक्त मोर्चा बनू शकतो. अशा मोर्च्यात कामगार वर्ग अगर त्याचे दोस्त, आपले खास हितसंबंध सोडून देत नाहींत, अगर आपलीं ध्येयें लपवून ठेऊन, एकमेकाला फसवीत नाहींत. ( फासिस्टच फक्त या दृष्टिकोनांतून संयुक्त मोर्चा उभारतात. ) वर्गीय दोस्तीचा अर्थ हाच असतो कीं, विशिष्ट परिस्थितींत, काहीं काळापुरते, दोस्तांचे हित-संबंध एकच झालेले असतात. याच दृष्टिकोनांतून, १९३६ मध्ये जनरल फ्रँकोविरुद्ध, स्पेनमधील कामगार, शेतकरी, मध्यम वर्ग, लहान भांडवलदार व राष्ट्रवादी गट यांचा संयुक्त मोर्चा उभारला गेला होता.

असेंहि नाहीं कीं, असा संयुक्त मोर्चा फासिझमच्या विरुद्धच फक्त उभारता येतो. परकीय राजवट अगर परचक्राविरुद्ध जनतेच्या जवळ-जवळ संपूर्ण विभागांचा "राष्ट्रीय संयुक्त मोर्चा" उभारला गेल्याची अनेक उदाहरणें इतिहासांत नमूद आहेत; उदा : दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत, अनेक देशांत, राष्ट्रीय संयुक्त मोर्चे बनले होते. अशा संयुक्त आघाड्या परकीय सम्राज्यवादाविरुद्ध, वसाहत जनतेच्या स्वातंत्र्य लढ्यांत सर्व परतंत्र देशांतून आस्तित्वांत येतात. कारण तेथें बडे जमीनदार, बँक भांडवलदार व बडे भांडवलदार सोडून, इतर सर्वांच्या हिताच्या दृष्टिनें साम्राज्यशाहीची राजवट खलास होणें आवश्यक असते. फक्त वरील मूठभर लोकमात्र जनतेची पिळवणूक करण्याचा त्यांचा हक्क परके लोक अधिक सुरक्षित ठेवतील, असे समजून त्यांना पाठिंबा देतात. लढ्याच्या सुरवातीच्या काळांत, राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यांचें नेतृत्व उगवते भांडवलदार करतात. परंतु, वसाहत देशांत, भांडवलदारी उत्पादन पद्धतीचा विकास झाल्यामुळें, आणि साम्राज्यशाहीनें निर्माण केलेल्या विशिष्ट परिस्थितीमुळें, कामगार वर्गाचा उदय होतो. हा कामगार वर्ग जसा संख्येनें वाढत जातो आणि संघटित होतो, तसा स्वातंत्र्य लढ्याच्या

नेतृत्वांत तो वाढता हिस्सा मिळवितो. मार्क्सवादी विचार-सरणीच्या पक्षांची स्थापना होतांच हें कार्य अधिक जोरानें पुढें जाते, आणि ज्या वेळीं, स्वातंत्र्य लढायात सामील असलेला भांडवलदार वर्गाचा विभाग साम्राज्यवाद्यांबरोबर करारमदार करून, जनतेच्या विरुद्ध उभा रहातो, तेव्हां ही क्रिया अति वेगानें होऊ लागते.

या संदर्भात चीनचें उदाहरण योग्य आहे. तेथे परकीय साम्राज्यवाद्यांच्या पाठिंब्यानें राज्य करणाऱ्या सरंजामदारी राजवटीविरुद्धच्या भांडवलदारी क्रांतिनें सन् १९११ मध्यें निर्णायक अवस्था गांठली. औद्योगिक शहरांतील व बंदरांतील कामगारांचे सामर्थ्य व संघटना १९२० पर्यंत चांगल्याच वाढल्या. १९२१ मध्यें कम्यूनिस्ट पक्षाची स्थापना झाली. या काळांत राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यांतील मुख्य शक्ति सन-यत्-सेनने १९१२ मध्यें स्थापन केलेला पक्ष कुओमिन्टांग हाच होता. परंतु साम्राज्यवादाचे वार झेलण्याचें कार्य कामगार वर्ग अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर करू लागला होता. १९२४,१९२५ व १९२६, सालीं, साम्राज्यवादाविरूद्ध त्यानें औद्योगिक शहरांतूत फार मोठे संप व निदर्शनें घडवून आणली होती. १९२५ मध्यें सन्-यत्-सेचना मृत्यू झाल्यानंतर, कामगार वर्ग व कम्यूनिस्ट पक्षाच्या संपूर्ण सहकार्यानें कुओमिटांगच्या सैन्यानें चीनचे एकीकरण करण्यासाठीं व मूलगामी सामाजिक सुधारण घडवून आणण्याच्या उद्देशानें, कॅन्टनहून उत्तरेकडे मोर्चा काढ़ला. परंतु १९२७ च्या एप्रिल मध्ये, कुओमिन्टांगच्या लष्काराचा नेता, चिआंग कै-शेक याने परकीय साम्राज्यवाद्यांबरोबर संगनमत केलें, आणि तो कम्युनिस्ट पक्ष व कामगार वर्ग यांच्यावर उलटला. त्या वेळेपासून, राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयाचें नेतृत्व कुओमिटांगकडून निघून, कम्युनिस्ट पक्षाकडे आलें. पुढें कांहीं वेळां, जापानी परचक्राविरुद्ध राष्ट्रीय आघाडी उभारण्यात आली, तेव्हां देखील हीच परिस्थिति कायम राहिली. मुख्य शत्रूविरुद्ध कामगार वर्गानें जनतेबरोबर करावयाच्या ऐक्याचा सिद्धांत मार्क्सनें मांडला आणि लेनिननें व स्तालिननें भांडवलदारी, ब वसाहत-

देशांतील स्वातंत्र्य लढायांच्या अनुभवाच्या आधारावर त्याचा अधिक विस्तार केला. वास्तवांत, सर्वच मार्क्सवादी सिद्धांत, अनुभवांवरून काढलेले सर्वसामान्य निष्कर्ष असून, इतर शास्त्रीय सिद्धांताप्रमाणें त्यांच्यात पुढील अनुभवांच्या जोरावर सुधारणा अगर विस्तार करण्यांत येतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत, व विशेषतः त्याच्या शेवटानंतर, अनेक देशांतील नव्या अनुभवांच्या आधारावर, समाजवादाचा लढा विजयी करण्याच्या, कामगार वर्गाच्या संयुक्त मोर्च्याच्या व व्यूहरचनेंच्या सिद्धांतात अत्यंत मोलाची नवी भर पडली आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत, नाझी जर्मन फौजांनी व्यापलेल्या युरोपीयन राष्ट्रांत, कामगार वर्गावर आधारलेली व कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीं चालणारी राष्ट्रीय प्रतिकार चळवळ अस्तित्वांत आली. तिच्यांत त्या त्या देशांतील "क्विसलिंग" ( अगर राष्ट्रद्रोही ) सोडून जनतेचे सर्व विभाग सामील होते. या राष्ट्रद्रोहांत बडे जमीनदार व भांडवलदार प्रमुख होते; आपले नफे व हक्क टिकविण्यासाठीं त्यांनी नाझी जेत्यांशी संगनमत केलें होतें. उलट छोट्या भांडवलदारांचा मोठा विभाग व बहुतेक मधले विभाग नाझी आक्रमणाला तोंड देण्यासाठीं आणि देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठीं कामगार वर्ग व शेतकऱ्यांच्या बरोबर हात मिळवणी करून लढ्यांत उतरले.

नाझी लष्कराच्या पराभवानंतर त्यांनी व्याप्त केलेले प्रदेश मुक्त झाले, त्यानंतर या व्यापक राष्ट्रीय मोर्च्यावर आधारलेली तात्पुरती सरकारें त्या देशांतून स्थापन झालीं; त्यांत कम्युनिस्ट पक्ष व सोशल डेमोक्रेटिक पक्ष या कामगार वर्गाच्या पक्षांना महत्वाचें स्थान होते. राष्ट्रीय मोर्च्याच्या पायावर स्थापन झालेल्या, आणि श्रमिक जनतेशीं अत्यंत निकटचे संबंध असलेल्या, विस्तृत स्थानिक समित्यांमुळें कामगार वर्गाचें वजन वाढले आणि त्यामुळें पूर्वीच्या बड्या जमीनदारांचें व भांडवलदारांचें स्थानिक वजन नष्ट झालें. या परिस्थितिमुळें, या सरकारांचे सर्वसाधारण कार्यक्रम प्रगतिशील राहिले. पूर्व यूरोपांतील अशा सरकारांनीं जमीन-

दारांच्या मोठ्या मोठ्या इस्टेटी ताब्यांत घेतल्या आणि त्या शेतकऱ्यांना वाटून दिल्या आणि राष्ट्रीय व स्थानिक प्रमाणावर लोकशाही सरकारांची स्थापना केली. ही पूर्व यूरोपांतील "जनतेच्या लोकशाही सरकारां"ची पहिली अवस्था होती,

या देशांतील कम्युनिस्ट पक्षांच्या हें लक्षांत आलें कीं, या नव्या प्रकारच्या सरकारांच्या व राज्यसत्तांच्या सहाय्यानें भांडवलशाहीच्या जागीं समाजवाद आणणें शक्य होतें. एकीकडे, भांडवलदारी व शेतकारी पक्षांचें, त्याचप्रमाणें सोशल डेमोक्रेटिक पक्षांचें पुढारी, मूलभूत सामाजिक सुधारणांच्या बाजुचें नव्हतें, आणि जनतेच्या दबावामुळें त्यांना मान्य करावा लागलेला प्रारंभीचा सरकारी कार्यक्रम म्हणजे परिवर्तनाची परिसीमा झाली, अशा मतांचें होते. त्याच्या उलट, शहरांतील व ग्रामीण भागांतील बहुसंख्य जनता, फासिझमवर व पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांवर मिळविलेल्या विजयानें उत्साहित झालेली होती. इतिहासांत प्रथमच तिला पूर्ण राजकीय हक्क मिळालेले होते, आणि त्यामुळें, संयुक्त मोर्चा बांधला गेला त्यावेळीं ती दुसऱ्या पक्षांच्या बाजूनें त्यांत सामील झालेली असली तरी, नंतर कम्युनिस्ट पक्षानें आग्रह धरलेल्या, दूरगामी सुधारणांना ती संपूर्ण पांठिंबा देऊं लागली होती.

अशा रीतीनें, संयुक्त मोर्च्यांतील, कम्युनिस्ट पक्षांव्यतिरिक्त इतर पक्षांच्या पुढाऱ्यांचें त्या त्या पक्षांतील श्रमिक जनतेवरील वजन कमी झाल्यानंतर, त्यांनी परराष्ट्रांकडे धांव घेतली. अमेरिकन व ब्रिटिश लष्कराच्या व मुत्सद्यांच्या प्रतिनिधींच्या मदतीनें त्यांनी कारस्थानें रचली आणि पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांना परत सत्तेवर आणण्याचा व समाजवादाकडे होणारी समाजाची प्रगति थांबविण्याचा घाट घातला. ही कारस्थानें उघडकीस आल्यानंतर यांपैकीं अनेक पुढाऱ्यांची त्या त्या पक्षांच्या सभासदांत जास्तीच बदनामी झाली, आणि सर्व श्रमिक जनतेच्या हितासाठीं कम्युनिस्ट पक्षानें मांडलेल्या कार्यक्रमाला मान्यता देणाऱ्या नव्या पुढाऱ्यांची निवडणूक झाली. जनतेच्या लोकशाहीच्या विकासांतील

33986

ही नवी अवस्था समाजवादी रचनेंचा प्रारंभ बिन्दू ठरली, सोशल डेम्रोक्रेटिक पक्ष कम्युनिस्ट पक्षांत विलीन झाला, आणि अशा रीतीनें तयार झालेल्या श्रमिक वर्गाच्या एकमेंव पक्षाला इतर पक्षांचा संपूर्ण पाठिंबा मिळूं लागला; कारण तेही पक्ष आंतां श्रमिक वर्गाच्या हिताचेंच प्रतिनिधीत्व करुं लागले होते. जनतेच्या प्रचंड बहुमताच्या जोरावर, जनतेच्यां लोकशाही सरकारांनी यानंतर, पार्लमेंटमध्यें कायदे करून उद्योगधंदे व व्यापार सरकारी मालकीचा केला आणि योजनाबद्ध अर्थ-व्यवस्थेला प्रारंभ केला. त्यांनी राज्य कारभार व्यवस्थेंत अनेक सुधारणा घडवून आणल्या आणि सैन्य, नागरिक खातीं, राष्ट्राच्या मालकीचें उद्योगधंदे व व्यापार यातील प्रमुख स्थानीं असलेल्या भांडवलदारांच्या पाठीराख्यांच्या जागीं समाजवादाला पाठिंबा देणाऱ्यांच्या नेमणूका केल्या. सामुदायिक शेतीचा प्रारंभ केला. म्हणजे, तेथें कामगार वर्गाची सत्ता—जनतेच्या प्रचंड बहुसंख्येसाठीं अस्तित्वांत आलेली खरी-खुरी लोकशाही प्रस्थापित झाली, आणि नवव्या प्रकरणांत नमूद केल्याप्रमाणें, ही लोकशाही त्याच वेळीं जनतेच्या इच्छा आकांक्षांना विरोध करणाऱ्यांवर व तोडमोड करणाऱ्यांवर हुकूम-शाही गाजवू लागली. तिच्या प्रस्थापनेंसाठीं, वर वर्णन केल्याप्रमाणें, सोविएत रशियांत क्रांति यशस्वी करण्यासाठी करावे लागले तसे सशस्त्र संघर्ष करावे लागले नाहींत तरी, प्रत्येक पुढेंपडणाऱ्या पावलाच्या वेळीं जुन्या सत्ताधारी वर्गाच्या प्रतिकाराविरुद्ध आणि परकीय साम्राज्याच्या मदतीनें, देशाची प्रगति रोखण्यासाठीं त्यानी केलेल्या खाटाटोपाविरुद्ध संघर्ष करावाच लागला.

जनतेच्या लोकशाहीच्या मार्गानें समाजवादाकडे झालेले हें स्थित्यंतर समाजवादी सोविएत यूनियनच्या अस्तित्वामुळें आणि तिच्या सक्रीय मदतीमुळेंच शक्य झाले. सोविएत फौजांनी नाझी फौजांच्या धुव्वा उडविल्यानंतर, आणि त्या त्या देशांतील मुक्ति-आंदोलनांनीं तेथें त्यांच्या तात्पुरत्या सरकारांची प्रस्थापना केल्यानंतर त्यांना

ग्रं. क्र. ११४५९

सोविएत युनियनप्रमाणें परकीय साम्राज्यवाद्यांच्या हस्तक्षेपाला तोंड द्यावे लागले नाहीं, आणि समाज परिवर्तनाचा सर्वमान्य कार्यक्रम पार पाडतां आला. हीं सरकारें एकाकी नव्हती आणि सोविएत सरकाराप्रमाणें त्यांना संपूर्णपणें शत्रूनें वेढलेल्या जगांतही समाजवादाची उभारणी करावी लागली नाहीं. परकीय फौजाच्या हस्तक्षेपापासून त्यांचा बचाव झालेला होता, आणि त्यांना धन, धान्य व यंत्र-सामुग्रीची मदत सोविएत युनियननें दिली. या शिवाय, आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रश्नांची सोडवणूक समाजवादी पद्धतीनें करण्यासंबंधी सोविएत युनियननें संचित केलेल्या अनुभवाचा त्यांना अत्यंत उपयोग झाला.

जनतेच्या लोकशाही राष्ट्रांच्या विकासासारखाच जवळजवळ विकास दुसऱ्या महायुद्धांत जपानचा पराभव झाल्यानंतर चीनमध्ये झाला. चिआंग कैशेक व वायव्य चीनमध्ये स्थापित झालेले कम्युनिस्ट सरकार यांच्यांतील सशस्त्र संघर्ष युद्धाकाळांत कांहीं अंशीं स्थगित झाला होता, कारण जपान-विरोधी राष्ट्रीय एकजुटीची हांक कम्युनिस्ट पक्षानें दिली होती, आणि तिला साथ देणें चिझांग कै-शेकला भाग पडले होते. परंतु युद्ध समाप्तीनंतर चीनमध्ये संयुक्त लोकशाही सरकार स्थापन करण्याच्या कम्युनिस्ट पक्षाच्या प्रयत्नांना चिंआंग कै-शेकनें धुडकावून लावले आणि अमेरिकन सरकारनें पुरविलेल्या प्रचंड लष्करी व आर्थिक सामुग्रीच्या जोरावर त्यानें कम्युनिस्टांविरूद्ध सशस्त्र युद्ध जोरानें सुरूं केलें. पुढे १९४९ अखेर पराभूत व बदनाम झालेला चिआंग फोर्मोसांत पळून गेला आणि कम्युनिस्ट पक्षानें नवें सरकार स्थापन करण्यासाठीं "जनतेची सल्लागार समिति" बोलाविली. अशा रीतीनें, चीनी जनतेच्या लोकसत्ताकाची स्थापना झाली. कामगार वर्ग, शेतकरी, ग्रामीण विभागांतील छोटे भांडवलदार विभाग, [ आणि चिआंग कै-शैकशी संलग्न असलेल्या नोकरशाही मक्तेदारी-भांडवलदारी-गटाव्यक्तिरिक्त उरलेले राष्ट्रीय ( अगर देशाभिमानी ) भांडवलदार ] यांच्या संयुक्त मोर्च्यावर आधारलेले

सरकार तेथें निर्माण झालें. अशा प्रकारें, जनतेला बळी देऊन गब्बर बनलेल्या व अमेरिकन साम्राज्यावाद्यांचें, हस्तक झालेल्या देशद्रोह्यांच्या एका लहान गटाविरुद्ध सर्व राष्ट्राची एकजूट झाली; जमीनदारांची जमीन शेतकऱ्यांना वाटून देण्यांत आली; सरकारी नियंत्रणाखालीं, खाजगी मालकींच्या उद्योगधंद्यांची व व्यापाराची पुनर्स्थापना करण्यांत आली; नगरांत व गावांत लोकशाही संस्था निर्माण करण्यांत आल्या; संयुक्त व लोकशाहीवादी चीनमध्यें जनतेच्या लोकशाही प्रजासत्ताची सत्ता दृढमूल झाली; आणि समाजवादाच्या दिशेनें करावयाच्या प्रगतीच्या दृष्टीनें आधारभूत असलेले आर्थिक स्थित्यंतर सुरू झालें. कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील, राष्ट्रीय एकजुटीच्या विस्तृत पायावर उभारलेले सरकार हें कार्य पार पाडूं लागले.

पूर्व युरोपांतील देशांच्या आणि निमूवसाहती चीन देशाच्या अनुभवावरून हें दिसून येते कीं, समाजवादाकडे जाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं आतां नवी परिस्थिति तयार झाली आहे. भांडवलशाहीच्या या सर्वव्यापी अरिष्टाच्या काळांत, जनतेची लुटालूट करण्याच्या दृष्टीनें प्रेरित झालेले मक्तेदारी गट अधिकाधिक आतताई मार्गाचा अवलंब करतात, फॅसिझम, युद्ध, जनतेच्या रहाणीमानावर हल्ला, यांचा आधार घेतात—त्या जगाचें चित्र असें आहे. दुसऱ्या चित्रांत जगांत झालेली समाजवादी विभागाची वाढ, आणि कामगार व वसाहती जनतेचा वाढता प्रतिकार व मार्क्सवादी विचारसरणीनें काम करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांची मक्तेदारीविरोधी लढ्यांत ( कामगार वर्गाच्या बरोबर ) बहुसंख्य जनतेला सामील करून घेण्याची ताकद आहे. मक्तेदारांनी स्वीकार केलेल्या आतताई मार्गांनी प्रगतीचा मार्ग फार काळपर्यंत आडविला जात नाहीं; मक्तेदार अधिकाधिक प्रमाणवर अलग पडत जातात; उलट, शांतता, राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही व चांगल्या प्रतीचें जीवन यासाठीं चालणाऱ्या लढ्यांतून मक्तेदारांविरुद्धचा जनतेचा संयुक्त मोर्चा अधिक विस्तृत व बलशाली बनत जातो. त्यामुळें समाजवादाकडे समाजाचें

परिवर्तन करणारी जनतेची लोकशाही व जनतेची सरकारें अस्तित्वांत येतात.

परंतु मक्तेदारांविरुद्ध मिळविण्याच्या या विजयासाठीं कामगार वर्गीय आंदोलनांतील संधिसाधू पुढारीपणाचा अगर स्वतःला सोशल डेमोक्रेट्स म्हणून घेणाऱ्यांचा पराभव करावा लागतो. कारण, इतिहासाचा व कामगार वर्गाचा मूलभूत अनुभव-( जो मार्क्सवादी विचार-सरणींत घनीभूत झालेला असतो-तो ) हेंच सिद्ध करतो कीं, मानवी समाजाच्या नव्या अवस्थेचा मार्ग वर्ग संघर्षातून जातो; तो जीर्ण समाजाचें प्रतिनिधित्व करणाऱ्या सत्ताधाऱ्यां बरोबर वर्ग सहकार्य करून गांठता येत नाहीं. तो राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय धोरणांत "दुहेरी" धोरण ठेऊन आक्रमतां येत नाहीं; कामगार वर्गाचे धोरण अंमलांत आणलें, आणि मक्तेदारांच्या विरुद्ध सक्रीय लढाऊ धोरण स्वीकारलें, तरच कामगार वर्गाला आपली ऐतिहासिक जबाबदारी पार पाडण्याचें अप्रतिहत सामर्थ्य व निर्धार प्राप्त होऊं शकतो.

समाजवादाचा मार्ग आतां सुगम झाला असला तरी, पूर्वीच्या अनुभवावरून मार्क्स व लेनिन यांनी काढलेले मूलभूत निष्कर्ष निखालसपणें खरेच राहिलेले आहेत. आजहि भांडवलशाहीच्या व साम्राज्यशाहीच्या विरुद्ध लढा उभारूनच अधिक उच्च प्रकारच्या समाज-व्यवस्थेकडे प्रगति करतां येतें. जुन्या सत्तांच्या स्वदेशांतील अवशेषांविरुद्ध व परकीय साम्राज्यांविरुद्ध लढा पुढें चालू ठेवला तरच ही प्रगति टिकवून धरतां येतें. समाजाचें परिवर्तन राज्य सत्ता हातांत आली तरच घडवून आणता येते. यासाठीं, कामगार वर्गाच्या नेतृत्त्वाखालील श्रमिक जनतेच्या संयुक्त मोर्च्यांच्या आणि वर्गलढ्याच्या अनुभवावरून मार्क्स लेनिन व स्टालिन यांनी काढलेले निष्कर्ष आत्मसात केलेल्या, क्रांतिकारक पक्षांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असतें. सोविएत युनियनच्या दीर्घकालीन अनुभवावरून हे सिद्ध झालें असून, जनतेच्यालोकशाही

सरकारांच्या व चीनी जनतेच्या लोकसत्ताकाच्या दैनंदिन अनुभवांतून त्याला सतत दुजोरा मिळत आहे. युगोस्लावियाच्या अनुभवावरून त्याला नकारात्मक पाठिंबा मिळत आहे; तेथील पुढाऱ्यांनी समाजवादाचा मार्ग सोडून दिल्यामुळें व मार्क्सवाद टाकून दिल्यामुळें जनता यशापासून वंचित झाली आहे.

भांडवलदारी समाजांचें समाजवादी समाजांत परिवर्तन करण्याचा प्रकार या नात्यानें, जनतेच्या लोकशाही सरकारांचें अनुभव, भांडवलदारीं व परकीय साम्राज्यशाहीच्या जोखडाखालील सर्व देशांना उपयुक्त आहेत. आपल्या जागतिक परिस्थितींत हा प्रकार सर्वत्र लागू होणारा आहे; मात्र जनतेची लोकशाही प्रस्थापित करण्यासाठीं लागणाऱ्या संयुक्त लोकशाही मोर्च्यांचा खरा आधार, नव्या राज्यसत्तेचें स्वरूप, आणि परिवर्तनाची गति त्या त्या देशांतील परिस्थितीवर अवलंबून रहातील.

ब्रिटनमध्ये कम्युनिस्ट पक्षांनें, "समाजवादाचा ब्रिटिश मार्ग" या नांवाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. जनतेचें सरकार आस्तित्वांत आणण्यासाठीं उभारावयाच्या विस्तृत संयुक्त लढ्याचा पाया म्हणून लेबर पार्टी व कम्युनिस्टपार्टींच्या कामगार वर्गाच्या ऐक्याची हांक त्यांत देण्यांत आलेली आहे. आशा रीतीनें निर्माण झालेले हें जनतेचे सरकार, जनतेच्या पाठिंब्यानें उद्योगधंद्यांचे समाजवादी राष्ट्रीयकरण करून, मक्तेदारांची आर्थिक सत्ता उखडून टाकील; अधिकाराच्या सर्व जागांवर "जनतेच्या सत्तेचा निर्धारानें व निष्ठेनें पुरस्कार करणाऱ्या स्त्री-पुरूषांची" नेमणूक करून राज्ययंत्राचें स्वरूप बदलून टाकील; वसाहतींना राष्ट्रीय स्वातंत्र्य देऊन साम्राज्याचे रूपांतर समान दर्जाच्या राष्ट्रांच्या संघटनेंत करील, आणि समाजसुधारणेचा विशाल कार्यक्रम पार पाडील. बडे भांडवलदार संघटित करतील त्या सर्व प्रतिकारांना तोंड देऊन, संयुक्त आंदोलनाच्या जोरावर, हे सर्व हेतू सिद्धीस नेण्यांत येतील.

कामगार, शेतकरी आणि इतर जनेतेचे सरंजामशाही व साम्राज्यशाही

विरोधी सर्व विभाग यांच्या संयुक्त मोर्च्यावर आधारलेल्या, अशाच प्रकारचा एक कार्यक्रम भारतीय कम्युनिस्ट पक्षांनेंहि तयार केला आहे. जनतेच्या लोकशाही सरकारची स्थापना करून, "राष्ट्रीय स्वातंत्र्य, औद्योगिक प्रगति, व सांस्कृतिक विकास" यांच्या प्रशस्त मार्गावर देशाला नेण्याच्या हेतुनें हा कार्यक्रम मांडण्यांत आलेला आहे.

समाजवादाच्या मार्गावरील पहिलें पाऊल या नात्यानें, जनतेच्या लोकशाहीची स्थापना करण्याच्या ध्येयानें आखण्यांत आलेले कार्यक्रम इतरहि अनेक देशांच्या कम्युनिस्ट पक्षांनी तयार केले आहेत.

अशा रीतीनें, जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेली मार्क्सवादी विचारधारा कामगार वर्गाला अशा प्रकारच्या कार्याची प्रेरणा देण्यास समर्थ ठरली आहे कीं, तिच्या मुळें आमच्या जागतिक परिस्थितींत तो सहजतेनें व जलद गतिनें समाजवादो समाज अस्तित्वांत आणू शकतो.

परंतु साम्राज्यवादी देशांतील मक्तेदार भांडवलदारांच्या गटांनी तिसरे जागतिक महायुद्ध पेटविण्यासाठीं चालविलेल्या खटाटोपाला शह देण्यास कामगार वर्ग व त्याचे सहकारी यशस्वी झाले तरच वर निर्देश केलेल्या विकासाची शक्यता अस्तित्वांत राहील.

या युद्धाची तयारी करण्यासाठीं अमेरिकेच्या मक्तेदार भांडवलदारांनी आपली प्रचंड उत्पादन साधन-सामुग्री आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत व नंतर साठवलेला असा नफा उपयोगांत आणला आणि साम्राज्यवादी ब्रिटन व फ्रांन्ससहित सर्व भांडवलदारी देशांवर आपली आर्थिक व राजकीय पकड़ बसवली. संयुक्तराष्ट्रसंघांत हुकमी बहुमत प्रस्थापित करून कोरियांतील आक्रमक युद्धांत त्याचा हत्यार म्हणून उपयोग केला. त्यांनी पश्चिम युरोपांतील भांडवलदारी देशांना उत्तर अटलांटिक लष्करी करारात सामील करून घेतले, आणि अमेरिकन सुप्रीम कमांडर्सच्या अधिकाराखालीं त्यांची प्रचंड लष्करें एकत्रित केली. त्यांनी जर्मनीचें विभाजन केले आणि पश्चिम जर्मनी नाझींच्या हातांत व जापानमध्ये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ३३२/८ दि:

प्रतिगाम्यांच्या हातांत पुन्हां एकदां शस्त्र-संभार दिला. त्यांनी जगभर युद्ध-तळ आपल्या काबूंत आणले आणि ब्रिटनमध्येंही ते डझनावारी तयार ठेवले. त्यांनी त्यांच्या दोस्त राष्ट्रांतील अगतिक भागीदारांच्या बाजारपेठा नष्ट केल्या आणि समाजवादी देशांबरोबर व्यापार करण्यापासून त्यांना परावृत्त केले.

या परिस्थितीत अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या नियंत्रणाखालील सर्व देशांत. शांततेसाठीं चाललेले आंदोलन आणि अमेरिकन नियंत्रण व लष्करी-तळ यांविरुद्धचें आंदोलन हीं एकरूप झालीं; आणि अशा रीतीनें, स्वातंत्र्या-साठीं लढणाऱ्या अत्यंत विस्तृत राष्ट्रीय आघाडीच्या उभारणी-साठीं अनुकूल परिस्थिति निर्माण झाली.

मार्क्सवादी विचारसरणीच्या वर्गीय दृष्टिकोनामुळें कामगार वर्गाला, युद्ध प्रचाराच्या धुमधडाक्यांतहि युद्ध पेटविण्याऱ्या शक्ति कोणत्या व शांततेसाठी झगडणाऱ्या शक्ति कोणत्या यांचे बरोबर आकलन होते. एक बाजूला, साम्राज्यवादी गट व मुख्यतः अमेरिकन साम्राज्यवादी साम्राज्य-विस्तारासाठीं आणि समाजवादी राष्ट्रांत पुन्हां भांडवलशाही प्रस्थापित करण्यासाठीं आटापीट करीत आहेत. दुसऱ्या बाजूला, समाजाच्या प्रगतिसाठीं शांततेची इच्छा बाळगणारी समाजवादी राष्ट्रें स्वातंत्र्यासाठीं लढणारी वसाहत राष्ट्रें आणि ( अमेरिकेसहित ) सर्व भांडवलशाही राष्ट्रांतील बहुसंख्य जनता आहे. ( ही जनता नित्य केवळ युद्धाच्या यातनांची आणि युद्ध तयारीच्या आर्थिक राजकीय परिणामांची धनी बनते आणि म्हणून ती सतत युद्धाला विरोध करीत असते. )

साम्राज्यवाद्यांनी युद्ध पेटविण्यासाठीं चालविलेल्या कारवायांवरून हा निष्कर्ष निघतो कां कीं, भांडवलदारी व सामाजवादी राष्ट्रें यांचे सह-अस्तित्व अशक्य अहे ? नाहीं, असा निष्कर्ष निघत नाहीं, कारण दुसऱ्या जागतिक महायुद्धापूर्वींच्या २० वर्षांच्या अनुभवावरून हें दिसून आलें होतें कीं, तुलनात्मक दृष्ट्या कमजोर असलेले समाजवादी राष्ट्र भांडवल-

शाही जगाबरोबर शांततेनें अस्तित्वांत राहूं शकेल आणि नित्याचें व्यापारी संबंध ठेऊं शकेल. बरोबर हीच परिस्थिती आतांही आहे; कारण साम्राज्यवादी अमेरिका अधिक आक्रमक असली, पूर्वीच्या कोणत्याही भांडवलदारी देशांपेक्षा अधिक आततायी मार्गाचा अवलंबन करणारी असली, तरी आज समाजवादी राष्ट्रें अधिक बलशाली आहेत, शांतता--आंदोलन अधिक सामर्थ्यशाली आहे. युद्धखोरीचें धोरण व त्याचे परिणाम भांडवलदारी देशांतील जनतेला दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट दिसत असून, त्यामुळें पूर्व-पश्चिमेंमध्ये असलेला खराखुरा पोलादी पडदा ( खोट्या प्रचाराचें जाळे ) तुटून पडत आहे. जनता साम्राज्य-वाद्यांच्या युद्ध योजना हाणून पाडण्यास व शांतता टिकवून धरण्यास समर्थ ठरत आहे. आणि शांतता म्हणजेच जनतेच्या लोकशाहीसाठीं व समाजवादाच्या विकासासाठीं अनुकूल परिस्थिति हें तिला समजून येत आहे.

भांडवलदारांचें राज्य असलेल्या देशांवर आजही युद्धाचे ढग जमलेले आहेत. आर्थिक अडचणींनी ते गांजलेले आहेत. त्यांची सामाजिक प्रगति खुंटली आहे. भय व निराशा यांनी त्यांना ग्रासले आहे.

परंतु जेथे मार्क्सवादाप्रमाणे कार्य चालतें तेथें युद्धाला स्थान नाहीं; तेथे उद्योगधंदे व शेती उत्पादन द्रुत गतीनें पुढें धांवत आहेत; सामाजिक प्रगतीचा तों आधार आहेत. सोविएत युनियनमध्यें समाजवादाकडून साम्यवादाकडे होणाऱ्या परिवर्तनाच्या पहिल्या खुणा प्रचंड रचनात्मक-योजनांच्या रूपानें दिसत आहेत; सुखी व संपन्न भवितव्याच्या आशांनी व विश्वासानें जनता उत्साहित झाली आहे. जनतेचें मार्गदर्शक तत्व म्हणून मार्क्सवादाचा स्वीकार केला म्हणजे मग मार्क्सवादाचें विश्व-विजयी सामर्थ्य प्रत्ययास येते, या विधानाची सत्यता वरील दोन जगांच्या चित्रांतील विलक्षण विरोधातून प्रगट होत आहे.

•••••••••

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
33964 दि: ...

REFBK-0011491

REFBK-0011491